
श्रीगोकर्ण-पर्तगाळी-जीवोत्तम मठाधीश

## श्रीमदिन्दिराकान्ततीर्थ श्रीपाद वडेर स्वामी

यांच्या समर्थ देखरेखीखाली निर्मित

# श्रीमद्वैष्णव सन्ध्यार्थप्रकाश



# प्रस्तुत प्रतीविषयी...

“श्रीमद्वैष्णव सन्ध्यार्थप्रकाश” हा ग्रंथ जेव्हा पहिल्यांदा प्रकाशित झाला त्या वेळी मराठी भाषेत तत्सम इतर कोणतेच वाङ्मय सद्भक्तांच्या मार्गदर्शनार्थ उपलब्ध नसल्याचे प्रकाशकांनी लिहिले आहे. तेव्हा या ग्रंथाचे अनन्यसाधाराण महत्त्व वेगळे सांगण्यास कारण नाही.

या ग्रंथाची एक छायाप्रत (photocopy) श्री. विष्णु वेंकटदास शानभाग यांच्याकडे उपलब्ध आहे जिची छायाचित्रे वापरून प्रस्तुत क्रमवीक्षित (scanned) प्रत बनवली आहे. ही छायाचित्रे उपलब्ध करून दिल्यासाठी शानभागजींचे विशेष आभार. पीडीएफ् बनविण्या करिता Adobe Scan तसेच मुखपृष्ठ बनविण्यासाठी PicsArt या ॲण्ड्रॉईड् ॲप चा वापर केला आहे.

शाईचे अनावश्यक ठिपके, रेषा, इ., मुद्रणदोष जे मूळ पुस्तकात होते त्यांस वाचन सुलभतेसाठी इथे काही प्रमाणात हटवण्याचा प्रयत्न केला आहे. या पीडीएफ् ला छापता यावे यासाठी Autocolor रंगसंगती वापरली आहे तसेच पृष्ठांचा आकार A4 ठेवला आहे. रंगसंगतीच्या या निवडीमुळे काही ठिकाणी वाचन कठीण जाऊ शकते, त्यासाठी क्षमस्व.

पृष्ठ क्रमांक ३५ (पीडीएफ् पृ. क्र. ४५) वर गायत्री यंत्र मुद्रण चुकीने उलटे छापले गेले होते ज्याची सुधारणा विद्यमान गोकर्णमठाधीश श्रीमद्विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वाम्यांनी कानडी भाषेत केली आहे याची नोंद घ्यावी.

पृष्ठ क्रमांक १०२-१०६ (पीडीएफ् पृ. क्र. ११२-११६) हे उपलब्ध सर्व प्रतींमध्ये अस्पष्टच असल्या कारणे येथे तसेच दिले आहेत. वाचकांकडे याहून चांगली प्रत असल्यास संपर्क करावा अशी विनंती.

—विजयेन्द्र दुर्गादास आचार्य, मुम्बई

संपर्क : ९८९२८२३६९७ / vijayendraacharya1999@gmail.com

# वैष्णवसंध्यार्थप्रकाश.

## विषयानुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| पीठिका ( ग्रंथकर्त्याची प्रस्तावना ) | १ |
| संध्यापूर्वांगकर्तव्य– ( तुलसीमृत्तिकाधारण, स्नान, वस्त्रपरिधान, आसनोपवेशन वगैरे. ) | ९ |
| नाममुद्राधारणक्रम ( नामें लावण्याचा क्रम, नामाच्या आकृति वगैरे ) | ११ |
| मुद्राधारण–मुद्राप्रार्थना इ० | १४ |
| आवश्यक संध्याक्रम | १७ |
| संध्यावंदनकालनिर्णय | २० |
| आचमनक्रम | २१ |
| केशवादिनाममंत्रार्थ | २१ |
| दशप्रणवयुक्तप्राणायामक्रम | २३ |
| ॐभूरित्यादिमंत्रार्थ | २५ |
| मार्जनक्रम | २७ |
| मार्जनस्थानें | २८ |
| आपोहिष्ठादि तिन्ही ऋचांचा अर्थ | २९ |
| मंत्राचमन क्रम | २९ |
| ‘ शंनोदेवी० ’ इ. चा अर्थ | ३० |
| पापपुरुषविसर्जनक्रम | ३२ |
| ,, मंत्रार्थ | ३३ |
| अर्घ्यप्रदान | ३३ |
| देवतासिद्धिदायक गायत्र्यंत्र | ३५ |
| अर्घ्यप्रदानक्रम | ३५ |
| गायत्रीची उपासना | ३६ |
| जप करते वेळीं आसनविचार | ३७ |
| स्थानमाहात्म्यानुसार जपफल | ३८ |
| संध्या न केल्यानें नरकप्राप्ति व ती दररोज केल्यानें फलप्राप्ति | ३९ |
| जपशब्दार्थ तथा जपक्रमलक्षण | ३९ |
| **गायत्रीजपक्रम** | ४१ |
| न्यास व ध्यानाचें फळ | ४२ |
| ध्यान प्रकार | ४२ |
| गायत्रीप्रतिपाद्य परमात्म्याचें आवाहन | ४३ |
| गायत्रीअर्थविचार | ४४ |
| प्रातःसंध्योपस्थान | ४६ |
| **माध्यान्हसंध्या** | ५१ |
| माध्यान्हसंध्यार्थ | ५२ |
| द्वितीयार्घ्यमंत्रार्थ इ० | ५३ |
| **सायंसंध्या** | ५६ |
| ध्यानमंत्रार्थ | ,, |
| संध्या करणाकरणविषयनिर्णय | ५७ |
| सूतकांत संध्या कशी करावी | ५७ |
| **ब्रह्मयज्ञ** | ५९ |
| ब्रह्मयज्ञ करण्याचा प्रकार | ५९ |
| तर्पणक्रम | ६० |
| जीवत्पितृकांनीं करण्याचा तर्प.वि. | ६५ |
| **अग्निकार्य** | ६६ |
| अग्निकार्यक्रम | ६७ |
| **पुरुषसूक्त** [ विष्णुपूजाविषय ] | ६८ |
| सहस्रशीर्षेतिमंत्रार्थ | ७० |
| **मुख्यप्राणाभिषेकसंकल्प** | ७२ |
| मध्वावतारवर्णन | ७२ |

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| लघुवायुस्तुति | ७१ |
| लघुवायुस्तुतितात्पर्यार्थ | ७३ |
| अष्टाक्षरमंत्र [ पुरुषांचा ] | ७५ |
| " मंत्रार्थ | " |
| ध्यानश्लोकार्थ | ७७ |
| षडक्षरमंत्र [ स्त्रियांचा ] | ७८ |
| " मंत्रार्थ | " |
| लघुतारतम्यस्तोत्र | ७९ |
| ध्यानश्लोकार्थ | ८० |
| तारतम्यस्तोत्रार्थ | ८० |
| चतुःश्लोकी भारत मूल | ८१ |
| " " अर्थ | ८१ |
| चतुःश्लोकी भागवत मूल | ८२ |
| " " अर्थ | ८२ |
| अणुभाष्यार्थ | ८४ |
| अणुभाष्यमूल | ८५ |
| मध्वाष्टक मूल | ९० |
| " अर्थ | " |
| वैश्वदेव | ९२ |
| वैश्वदेवविधान | " |
| श्रीपरशुरामध्यान | ९७ |
| वैश्वदेवाधिकारी | " |
| श्रीमध्वगुरुपादपूजा | १०० |
| ब्रह्मार्पणविधि | १०२ |
| भूतबलिविधि | १०३ |
| शालिग्रामतीर्थसेवन व माहात्म्य | १०३ |
| प्राणाग्निहोत्र[चित्राहुतिक.] | १०५ |




# उपसंहार.

वैष्णवसंध्यार्थप्रकाश नांवाचा ग्रंथ श्रीस्वामी इंदिराकांततीर्थ जीवोत्तम मठाधीश गोकर्ण यांच्या देखरेखीखालीं तयार झालेला, त्यांचा परम शिष्य रा. रामचंद्र नरसिंह रेषवी बिणगेकर यांणीं स्वाभिमानपुरःसर छापण्याकरितां आह्मां- कडे आणून दिल्यास बरेच दिवस झाले. अनेक अडचणीमुळें आजपर्यंत छाप- ण्यास सवड झाली नाहीं; व सदरील ग्रंथांत आणखी कांहीं विषयांची भर घालून भाषाही ( विशेष रीतीनें ) शुद्ध करवून छापणेचा मनोदय होता; परंतु तशी सवड झाली नाहीं. तथापि ( अकरणान्मंदकरणंश्रेयः ) या न्यायानें आमचे महाराष्ट्रभाषाभिज्ञ वाचकांची जिज्ञासा अंशतः तरी तृप्त होण्याकरितां न छाप- पण्यापेक्षां छापणें बरें असा विचार करून प्रायः मूळ ग्रंथाप्रमाणेंच ( क्वचित् कि- चित फरक करून ) छापून प्रसिद्ध केला आहे. त्यांतील शब्द सौष्टवापेक्षां अर्थ- गांभीर्याकडे वाचकवर्ग विशेष लक्ष्य देऊन आपली धर्मजिज्ञासा अंशतः तृप्त करून घेतील असा भरंवसा आहे. आतां संध्या केल्यापासून काय पुण्य आहे व न केल्यापासून काय पाप आहे, याचा सदरीं ग्रंथाच्या आरंभीं व पूर्वपीठिकेंत विशेष विचार केला आहे. त्याबद्दल जास्त लिहिण्याची जरूरी दिसत नाहीं. तथापि संध्येच्याद्वारा आयुष्य व आरोग्य यांची वृद्धि, तसेंच संध्येच्याद्वारा सुख ( ऐहिक ) व मोक्ष यांची प्राप्ति कशी होते, याचें थोडक्यांत दिग्दर्शन करूं.

" **सुखमेव सदा मे स्याद्दुःखं माभून्मनागपि** "

या वचनांत सांगितल्याप्रमाणें निखिलापेक्षित मोक्षास मुख्य साधन पर- मात्मप्रसाद होय. तो प्रसाद ब्रह्मविद्येच्याद्वारा साध्य आहे. ब्रह्मविद्येच्या प्राप्तीस मुख्य साधनीभूत जी संध्या तिजपासून आह्मी पराङ्मुख झाल्याकारणानें आमची सर्व प्रकारें अव्यवस्था होऊन गेली आहे. संध्या हीच ब्रह्मविद्येस पोंच- विणारी असून तिचा योग्य मार्ग समजण्यासाठीं आह्मी उत्तम तऱ्हेनें यत्न केला पाहिजे. आतां संध्या केल्यानें वर सांगितल्याप्रमाणें आयुष्य आरोग्य, सुख व मोक्ष यांची प्राप्ति आह्मांस होते, तर ती योग्य रीतीनें होण्यासाठीं प्रयत्न करणें आपलें अवश्य कर्तव्य आहे.

## संध्येच्याद्वारा आयुष्याची वृद्धि.

आयुष्याची वृद्धि कशानें होईल, या प्रश्नानें उत्तर देण्यापूर्वी प्रथमतः

आयुष्य ही काय वस्तु आहे याचा विचार केला पाहिजे. सामान्य लोकांची अशी समजूत आहे कीं, अमुक मनुष्याचा अमुक वर्षाच्या अमुक महिन्याच्या अमुक तिथीस जन्म किंवा मृत्यु असा जो ईश्वर संकेत तें आयुष्य होय; परंतु विद्वानांच्या मतें तसें नाहीं. ज्या त्या प्राण्यास आपापल्या पापपुण्यानुसार एका जन्मांत जें सुखदुःखादि फल भोगावयाचें त्यास जितका काल लागणार तितकेच श्वासोच्छ्वास तो त्या प्राण्यांच्याठायीं ठेवितो, त्यास आयुष्य ह्मणतात. शास्त्रमतानें मनुष्य २४ तासांत किंवा ६० घटिकांत २१,६,०० श्वासोच्छ्वास करितो. या हिशोबानें ज्याच्या त्याच्या कर्मानुसार कोणांत १० कोट कोणांत दहा लक्ष, दोन लक्ष असे श्वासोच्छ्वास दिलेले असतात. श्वासांचें नैसर्गिकगतिप्रमाण ह्मटलें ह्मणजे बसलेल्या स्थितींत तो शरीराबाहेर नाकापासून बारा अंगुलें लांबपर्यंत संचार करितो; परंतु चालतांना त्याचें प्रमाण १८ अंगुलें लांब होतें, निजल्यावर ३६, क्रोधावेशांत ९७ व मैथूनप्रसंगीं त्याचें प्रमाण १०८ पर्यंत वाढतें. अर्थात् निरनिराळ्या स्थितींत निरनिराळ्या प्रमाणानें श्वासांचा खर्च होतो. तेव्हां ज्या स्थितींत जास्त खर्च होत असेल ती स्थिति जितकी टाळतां येईल तितकी आयुष्याची वृद्धि होईल हें उघड सिद्ध झालें. कल्पना करा कीं, परमेश्वरानें दररोजचे २१,६०० श्वास या हिशोबानें १०० वर्षांचें आयुष्य आपल्यास दिलें आहे, परंतु त्याचा आपण काटकसरीनें खर्च न करितां वाटेल तशी उधळपट्टी केली तर, त्यांत परमेश्वराचा काय दोष? परमेश्वरानें दिलेल्या श्वासांचा जितक्या काटकसरीनें आपल्यास खर्च करितां येईल तितकें आपलें आयुष्य वाढणार आहे. ह्मणजे दररोजच्या २१,६०० श्वासांपैकीं जर कांहीं कमी श्वास खर्च झाले तर तितके श्वास संग्रहीं पडून त्या प्रमाणानें आपलें आयुष्य १०० वर्षांपेक्षांही जास्त वाढेल हें उघड आहे. तेव्हां आतां साहजिकच प्रश्न येतो कीं, अशा तऱ्हेनें श्वासोच्छ्वास कमती भरण्यास कोणता उपाय आहे? तर त्यास उत्तम उपाय ह्मणजे प्राणायाम हा आहे. व तो प्राणायाम संध्येंत शिकवीत असल्यानें संध्या ही आयुष्यवृद्धीचें साधन आहे, हें स्पष्ट सिद्ध होतें.

आतां किती वेळ प्राणायाम केल्यानें किती आयुष्य वाढतें, याचा विशेष विचार करूं, अहोरात्रांत ह्मणजे २४ तासांत मनुष्याचे २१,६०० श्वासोच्छ्वास होतात असें मागें सांगितलेंच आहे. ज्यांस २४ कलाकपर्यंत प्राणनिरोध करितां येतो, त्यांस २१६०० श्वास २१६०० दिवसपर्यंत पुरतील ह्मणजे त्याचें १ दिवसाचें आयुष्य ६० वर्षेपर्यंत वाढेल हें उघड आहे. याचे निम्मे १२ तास

प्राणायाम करणाऱ्यांचें ३० वर्षे, १ तास किंवा १ मिनिटपर्यंत प्राणायाम करण्याची ज्याची शक्ति आहे त्यांचें एक दिवसाचें आयुष्य अनुक्रमें २५ वर्षे व व १९ दिवस वाढेल, हें वरील हिशोबानें सिद्ध होतें. कोणीही मनुष्य कितीही दुर्बळ असला तरी त्यास आरंभीं एक मिनिटाचा प्राणायाम करण्यास अडचण पडणार नाहीं.

प्राणायामाचे पूरक, कुंभक व रेचक, असे तीन प्रकार आहेत. बाहेर संचार करीत असलेल्या वायूस आंत आकर्षण करून घेणें यास **पूरक** ह्मणतात. आकर्षण केलेला वायु कांहीं नियमित वेळपर्यंत आंत कोंडून ठेवणें यास **कुंभक** ह्मणतात. व पोटांत सांठविलेला वायु हळुहळू बाहेर सोडणें यास **रेचक** ह्मणतात. गायत्रीचे ३ अंश आहेत. १ **व्याहृति**, २ रा **गायत्रीमंत्र**, ३ रा **शिरोभाग** पूरक, कुंभक व रेचक करितांना अनुक्रमें हे तिन्ही अंश एकेक वेळा ह्मणणें हा एकमात्रा प्राणायाम किंवा कनिष्ठ प्राणायाम होय. पूरक, कुंभक व रेचक करितांना ते अंश २ वेळां ह्मणणें हा मध्यम प्राणायाम होय. व अनुक्रमें ते अंश तीन वेळां ह्मणणें हा उत्तम प्राणायाम होय. आयुष्यवृद्धि होण्यास प्राणायाम यथाविधि झाला पाहिजे. तसा न झाल्यास उलट फायद्याऐवजीं तोटा मात्र होण्याचा संभव आहे. प्राणायामसंबंधीं माहिती योग—शास्त्रांत विस्तृत रीतीनें सांगितली आहे. श्रीमद्भगवद्गीतेंत

**' अपाने जुव्हति प्राणं प्राणेऽपानं तथाऽपरे '**

इत्यादि वचनांत प्राणायाम संक्षेपतः सांगितला आहे. प्राणायामविधि गुरुकडूनच समजून घेतला पाहिजे; गुरुवांचून केवल पुस्तकांतील वाचनानें खरा मार्ग कळत नाहीं. ह्मणूनच वेदांत

**' स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठं '**

असा उपदेश केला आहे. सारांश, आमची संध्या ही आयुष्यवृद्धीचें साधन कशी होते हें संक्षेपतः सांगितलें.

आतां, संध्येच्याद्वारा **आरोग्यवृद्धि** कशी होते याबद्दल थोडें विवेचन करूं. शरीर हें आत्म्याचें राहतें घर आहे, ' पचनक्रिया ' हा या घराचा पाया व ' शुक्रधातु '[1] ही तिजोरी होय. तिजोरी बळकट असली ह्मणजे फारशा व्यावहारीक अडचणी बाधक होत नाहींत. याचप्रमाणें शुक्रधातूची बळकटी असली ह्मणजे इतर धातु तरतरीत राहून जठराग्निही प्रदीप्त असतो. शुक्रधातु बिघडण्यास मुख्य कारण उष्णता होय. व ती उष्णता शरीराच्या आंतल्या

१. याप्रमाणें या शरीरांत सप्तधातु आहेत. त्यांत ' शुक्र ' ह्मा. वीर्य हा धातु अतिश्रेष्ठ आहे.

भागांत सांठलेल्या मलापासून उत्पन्न होते. एकाद्या मोरींत रोज अन्नांचा अंश जात असला व ती आपण धुवून स्वच्छ ठेविली नाहीं, तर कांहीं दिवसांनीं तेथें मलसंचय होऊन व उष्णता उत्पन्न होऊन सूक्ष्म क्रिमी दिसूं लागतील. त्याचप्रमाणें जठराग्नि दुर्बल असला ह्मणजे खाल्लेल्या अन्नापैकीं अपक्व राहिलेल्या अन्नरसाचे परमाणु त्या त्या नाड्यांत जागोजाग संचित होऊन त्यांपासून उष्णता उत्पन्न होते व पुढें कांहीं दिवसांनीं सूक्ष्म जंतु उत्पन्न होऊन निरनिराळे रोग होतात. यावरून रोगांचें बीज नाहींसें होण्यास शरीराच्या आंत जमत जाणारा मल समूळ नाहींसा झाला पाहिजे, हें उघड आहे. शरीराच्या आंतील कोण-त्याही अत्यंत सूक्ष्म भागांतून मलाचें निःसारण करण्यास प्राणायामावाचून रामबाण औषध नाहीं; आणि ह्मणूनच प्राणायाम हें आरोग्यवृद्धीचें मुख्य साधन होय. आतां प्राणायामानें मळाचें निस्सारण कसें होतें, तें थोडक्यांत सांगतों. एकाद्या सुगंधि पदार्थाचा सुगंध अथवा दुर्गंधि पदार्थाचा दुर्गंध येणें ह्मणजे त्या त्या पदार्थांतील अत्यंत सूक्ष्म अंश अर्थात् परमाणु हवेंतून आपल्या घ्राणेंद्रियापर्यंत येऊन पोंहचणें हें होय एकाद्या ठिकाणीं कापराची वडी ठेविली, तर ती कांहीं दिवसांनीं नाहींशी झाल्याचें आढळून येईल. एवढी मोठी वडी कोठें गेली असावी बरें? अर्थात् ती नष्ट झाली नाहीं, तर हवेंत परमाणु रूपानें उडून गेली. ही परमाणूची कल्पना शरीराच्या आंतील भागांसही लागू आहे. ह्मणजे जसें ब्रह्मांडांत लक्षावधि परमाणु खेळून राहिले आहेत, तसेंच पिंडांत ( शरीरांत ) ही खेळून राहिले आहेत. हे परमाणु एका ठिकाणाहून अन्य ठिकाणीं जाण्यास कारण वायु आहे. प्राणायाम करितांना, प्रथमतः ' मूल बंधानें ' अपान वायूची उर्ध्व गति झाली ह्मणजे त्या वायूबरोबर ' मूलधारा ' चे ठायीं व त्याच्या आजूबाजूच्या नाड्यांत सांठलेल्या मलाचे परमाणु वर षड्-दलचक्रांत येतात. तेथून ते परमाणु तेथल्या मलाच्या परमाणूसह वायूबरोबर त्याच्या वरच्या चक्रांत ह्मणजे दशदलचक्रांत दाखल होतात. या क्रमानें खालच्या भागांतील मलाचे परमाणू अपान वायूच्या बळानें ऊर्ध्वभागीं व वरील तमाम भागांतील मलाचे परमाणु प्राणवायूच्या बळानें अधोभागीं खेचले जाऊन व प्राणापान संयोगकाळीं ते एकवटून रेचकाच्या द्वारानें शरीराच्या बाहेर काढून दिले जातात. याप्रमाणें एकदां इडेनें ( डाव्या नाडीनें, नाकपुडीनें ) व एकदां पिंगलेनें ( उजव्या नाडीनें–नाकपुडीनें ) रेचक केला असतां अग्नींत तावून काढिलेल्या सोन्याप्रमाणें सर्व देहांतील नाड्यांची उत्तम शुद्धि होते. व अशी

वारंवार शुद्धि होत गेली ह्मणजे रोगाचा उद्भव होण्यास कारणच राहणार नाहीं. याप्रमाणें प्राणायामानें रोगाचा प्रतिबंध व परिहार कसा होतो, हें संक्षेपतः सांगितलें. ज्वर, गुल्म वगैरे विशेष रोगांच्या निवृत्तीसाठीं प्राणायाम कशाप्रकारें केला पाहिजे त्याबद्दलची सविस्तर माहिती योगग्रंथांतून सांगितली आहे; ती येथें स्थलसंकोच्यामुळें लिहिण्यास अवकाश नाहीं; तथापि पूर्वीं जे संक्षेपानें विवेचन केलें आहे, तेवढ्यावरून संध्या ही प्राणायामाच्याद्वारा आयुष्यवृद्धि व आरोग्यवृद्धि करण्यास किती उपयोगी आहे, याबद्दल वाचकांची खात्री होईलच.

संध्या केल्या पासून आयुष्य व आरोग्य यांची वृद्धि होते, असें सिद्ध झालें आहे, कारितां संध्येपासून ऐहिक सुखाची प्राप्ति कशी होते हें निराळें लिहिण्याची जरूरी राहिली नाहीं. ऐहिकसुखाचें सर्व मूळ आरोग्यामध्यें आहे, मनुष्यास पुष्कळ संपत्ति व संतति इत्यादिकांची अनुकूलता असुन शरीर व मन यांचे स्वास्थ्य नसेल तर सुखानुभव कदापि मिळणार नाहीं, हें स्वस्वानुभवावरून सर्वांस विदितच आहे शिवाय दुर्लभ अशा मनुष्य जन्मांत त्यांतही ब्राह्मणांत व वैष्णव कुलांत जन्म घेऊन केवळ ऐहिक सुखाची अपेक्षा करणें अत्यंत गर्ह्य होय. श्रीकृष्णपरमात्म्यानीं गीतेमध्यें अर्जुनास कर्मयोग सांगत असतां ' **मात्रास्पर्शास्तुकौंतेय शीतोष्णसुखदुःखदाः। आगमापायिनोनित्यांस्तांस्तितिक्षस्व भारत।। यंहि न व्यथयंत्येते पुरुषं पुरुषर्षभ ।। समदुःखसुखं धीरं सोमृतत्वाय कल्पते** ' असें सांगितले आहे याचा अर्थ—हे अर्जुना, पुत्रमित्र कलत्रादिकांवरील अभिमानाचा परित्याग करून विषय ( पंचज्ञानेंद्रियांचे विषय शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध ) संसर्गापासून उत्पन्न होणाऱ्या सुखदुःखादिकांप्रत सहनकर. ज्या पुरुषास यांची बाधा होत नाहीं, समदुःखसुखी ( दुःख जसें हेय आहे तसेंच सुखही अनित्य असल्यानें अनुपादेय आहे. ) असा तो पुरुष मोक्ष मिळविण्यास समर्थ होतो असा उपदेश केला आहे. अर्थात् व्यावहारिक सुख मिळविणेंच मनुष्याची इतिकर्तव्यता नव्हे तर आरंभीं लिहिल्या प्रमाणें निखिलापेक्षित जन्ममृत्युजराबंधादिरहित नैजसुखावाप्तिरूप मोक्ष प्राप्त करून घेणेंच मुख्य कर्तव्य आहे. श्रीकृष्णांनीं श्रीमद्भगवद्गीतेंत योगाचीच महती विशेष वर्णिली आहे—

**' तपस्विभ्योधिको योगी ज्ञानिभ्योपि मतोधिकः ॥ कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन॥ '**

भ. गी. अ. ६.

ही योगाची महती अनाधिकाऱ्यास एकाएकीं कळणार नाहीं. परंतु आमच्या शास्त्रकारांनीं दूर दृष्टीनें लहानपणापासूनच आमचा योगमार्गांत प्रवेश व्हावा अशी योजना करून ठेविली आहे. मुलगा आठ वर्षांचा होतांच त्याची मुंज करून त्याला संध्येंतच प्राणायामापर्यंत योगक्रियेचा मार्ग युक्तीनें शिकविला जातो तो पुढें त्यानें अभ्यासानें वाढवून अहिंसा ब्रह्मचर्यादि धर्म कडकडीत पाळून शेवटीं समाधीपर्यंत पोंचावें म्हणजे सर्व ऐहिक सुख भोगून अंतीं मोक्षाप्रत पावावें. असा सुंदर क्रम लावून दिला आहे. हें जाणून अभ्युदयपूर्वक निःश्रेयस प्राप्त करून घेण्याची इच्छा करणारांनीं आपापलीं वर्णाश्रमोचित धर्मकर्में निष्काम बुद्धीनें करून भगवदर्पण करावीं व कृतार्थ व्हावें.

परकीय मताचे अनेक लोकांनीं सार्थ संध्या छापलेली आहे तरी वैष्णव ( माध्व ) मतास अनुसरून महाराष्ट्र भाषेंत छापलेली हीच पहिली होय. या पुस्तकांत उपयुक्त अनेक विषय असले तरी मुख्य विषय संध्या असल्यानें संध्यार्थ प्रकाश हेंच नांव दिलें आहे. या पुस्तकांत नजर चुकीनें कांहीं ठिकाणीं अशुद्ध राहिलीं असल्यास तीं पुढील आवृत्तींत दुरस्त करून तसेंच यांत आणखी कांहीं उपयुक्त विषयांची भर घालून धर्मश्रद्धावान लोकांची सेवा करावी अशी आमची इच्छा आहे. ती त्या लोकांनीं पुस्तकास आश्रय देऊन पूर्ण करावी अशी आमची विनंती आहे. कोणास यासंबधानें कांहीं सूचना करावयाशा वाटतील त्यांनीं कराव्या त्यांचा पुढील खेपेस आम्हीं अवश्य विचार करूं.

शेवटीं ज्या निखिलजगदंतर्यामि निखिलजगन्नियामक जन्माद्यष्टकर्तृत्वादिलक्षणोपेत श्रीरामचंद्राच्या कृपेनें हा ग्रंथ पूर्ण झाला ' यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ॥ यत्तपस्यासि कौंतेय तत्कुरुष्वमदर्पणं ॥ या भगवंताचे वचनाप्रमाणें त्यांस हा ग्रंथ समर्पण करून त्याच दयाघन परमात्म्याच्या कृपेनें पुनरावृत्ति काढणेचा सुप्रसंग येवो अशी प्रार्थना करितों.

प्रकाशकनिदेशानुवर्ती,

पंडित रामाचार्य कौजलगी.

# पीठिका.

## ( प्रस्तावना. )

श्रीहरिगुरूंप्रत नमन—संध्यानामक अपूर्व औषध—ध्यान व मोक्षयोग्यता— 'संध्या' शब्दाचा धात्वर्थ—अर्थ न जाणतां केलेलें कर्म निरर्थक होतें याविषयीं श्रुतिस्मृतिप्रमाणें—वेद व धर्मशास्त्राध्ययन ब्राम्हणांनीं अवश्य करावें पण तें अर्थज्ञानपूर्वक झालें पाहिजे—त्रिकाल संध्योपासना हेंच ब्रम्होपासनात्मक कर्म आहे—संध्येविषयीं कांहीं प्रश्न ( रहस्याम्नाय ब्राम्हणश्रुति )—मूळरूपी विष्णु व श्रीकृष्ण इत्यादि वरिष्ठ देवांनींही संध्येचें आचरण केलें आहे, याविषयीं याज्ञवल्क्यस्मृति—संध्याकरणारास फल व न करणारास अनर्थ इत्यादि.

### आदौ मंगलं ।

**श्रीमध्वमाधवौ नत्वा गुरून्पूर्वगुरूंस्तथा ॥**
**कुर्मश्शिशुहितार्थाय संध्यादीपार्थमादरात् ॥ १ ॥**

**अर्थः**— ग्रंथारंभीं श्रीमद्वैष्णवसिद्धान्तप्रतिष्ठापक श्रीमन्मध्वगुरुवर्यांसहित श्रीलक्ष्मीनारायणांला, तसेंच, गुरु, पूर्वगुरु ( **श्री**मदिंदिराकांततीर्थ श्रीपादवडेर, पूर्वगुरुवर्य--**श्री**मत्पद्मनाथतीर्थ श्रीपादवडेर स्वामी, श्रीसंस्थान गोकर्णमठ पर्तगाळ ) व पूर्वपूर्वतर सद्वैष्णव गुर्वादिकांना नमस्कार करून अधिकारी द्विजबालकांच्या हिताकरितां आदरपूर्वक संध्यादीपार्थ प्रगट करीत आहों.

या संसारसागरांत सुखप्राप्तीकरितां जो यत्न करावा लागतो, तो बहुत कष्टकारकच असतो. त्याच्या निवृत्तीकरितां कोणतेंही कर्तव्यकर्म करण्यास आरंभिलें तरी त्याला दैव अनुकूल होई पर्यंत प्रायशः तें निष्फलच होतें. अशा दैवानुकूलतेसाठीं पूर्वींचे चतुर्मुख ब्रह्मादि शिष्ट जीवांनीं सदाग-

मभूत श्रुति--स्मृति--इतिहासादिकान्वयें, संध्यानामक एक अपूर्व औषधाचा प्रयोग स्वतः कल्पून, तें औषध आह्मां मंद जीवांलाही दाखविलें आहे. श्रीमन्माध्वसिद्धांतरीत्या वेदांत अवलोकन केला तर त्यावरून असें स्पष्ट होतें कीं, शाश्वत सुखप्राप्ति मोक्षावांचून इतरत्र होत नाहीं. तो मोक्ष, यथार्थ ज्ञान–ध्यान–सत्कर्माचरणादिकानें, या जीवास आवरणभूत होऊन असलेला अनादि प्रकृत्यादिकाचा जो बंध त्या बंधापासून मुक्त केल्यावांचून, होतच नाहीं. यासाठीं या जीवांनीं प्रकृत्यादि बंधापासून मुक्त होण्याकरितां कांहीं काल गुरुहरिपरमात्म्याची भक्ति, उपासना व वैष्णवी धर्मशास्त्रानुसार व्रतोपवासादि नियम संपादून, हा प्राकृत (प्रकृतिजन्य) देह पवित्र करून घेतल्यानंतर, ध्यानयोगजन्य ज्ञानद्वारा कालक्षेप करणें उचित आहे. अल्पमति जीवांना अभ्यासावांचून एकदम ज्ञान अथवा ध्यान संपादणें शक्य नाहीं. याकरितां तदाधारभूत श्रीहरीची भक्ति सर्वोत्तमत्वानें आणि श्रीलक्ष्मीची श्रीहरिपत्नित्वानें, तसेंच ब्रह्मा–वायु–रुद्रप्रभृतीपासून तृणापर्यंत स्वोत्तम जीववर्गाची भक्ति, भगवत्कार्यसाधक या नात्यानें अथवा हरिभृत्यत्वानें व स्वगुरुत्वानेंही, तारतम्यपूर्वक ( उपनिषदांत तरतमभाव सांगितला आहे त्या क्रमानुसार ) संपादणें सज्जीवमात्रांस उचित आहे. त्याचप्रमाणें, विष्णुभृत्यत्वसूचक श्रीवैष्णवचिन्हरूप, नाम–मुद्रादिधारण, तप्तमुद्रांकन व सच्छीलत्वादिकानें विशिष्ट असून ती भक्ति तारतम्यानुरूप अवश्य केली पाहिजे. ह्या सामान्य धर्माशिवाय परमपुरुषार्थरूप अंतिम मोक्षप्राप्तीकरितां मानवी अधिकारयोग्य प्राण्यांनीं ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व संन्यास अशा आश्रमचतुष्टयांत, उचित तो आश्रम स्वीकारून, भक्तिपूर्वक ज्ञानानें ध्यानयोग्यता संपादणें अवश्य आहे. योगाभ्यासादि प्रयत्नानें अतिश्रमसाध्य ध्यानयोग संपादण्यापेक्षां, कालानुरूप हळूहळू पूर्वीं सांगितल्याप्रमाणें ध्यानयोग्यता संपादणें अत्यंत श्रेयस्कर होय. आणि याकरितां सर्व वेदसाररूप गायत्रीमंत्रानें श्रीहरिध्यान करण्याचा अभ्यास क्रमानें वाढवून वर्णाश्रमानुरूप कर्महीं करीत असून, वानप्रस्थाश्रमयोग्यता असेपर्यंत ध्यान करीत असावें. तात्पर्य असें कीं, गायत्री ही सर्व वेदसार असल्यानें त्या गायत्रीजपानुष्ठानाकरितां पूर्वजांनीं श्रुतिस्मृतींच्या आधारावरून दाखविलेला संध्याक्रम, जीव प्रकृत्यादिबंधाधीन असेपर्यंत, विधिबद्धत्वानें अनुसरणें

हेंच सज्जीवांचें मुख्य कर्तव्यकर्म आहे. " संध्या "–सम्यक् हरिं ध्यायंति अस्यामिति–म्हणजे उत्तम रीतीनें हरीचें ध्यान करितात जिचे ठायीं, असा संध्याशब्दाचा धात्वर्थ आहे.

संध्येंत मुख्य विषय गायत्रीद्वारा श्रीहरिपरमात्म्याचें ध्यान आहे. तरी तत्साधनीभूत कांहीं कर्में पूर्वीं आणि कांहीं कर्में नंतरही आचरण्याचीं असतात; असें असुन ब्रह्मचर्य अल्पवयांत प्राप्त होत असल्यानें कांहीं कालपर्यंत अर्थज्ञानाशिवाय संध्यादि कर्में झालीं, तरी योग्य कालीं अर्थ न जाणतां कोणतेंही कर्म केल्यास तें निरर्थक होणार आहे. यास ऋग्वेदांत प्रमाणः–

स्थाणुरयं भारहारः किलाभूदधीत्य वेदं न विजानाति योऽर्थं ।
योऽर्थज्ञ इह सकलं भद्रमश्नुते नाकमेति ज्ञानविधूतपाप्मा ॥

अर्थ–वेदाध्ययन करून अर्थ न जाणतां असणारा केवल भारवाही स्तंभ अथवा गर्दभ समजावा. अर्थ जाणणारा आहे तो या लोकीं स्वोचित सकल भोग भोगून ज्ञानानें निरस्तपाप होत्साता दुःखरहित श्रीवैकुंठलोकीं गमन करितो. तसेंच—

यद्गृहीतमविज्ञातं निगदेनैव शब्द्यते ॥
अनग्नाविव शुष्कैधो नतज्ज्वलति कर्हिचित् ॥

अर्थ—जें अध्ययन करून अर्थ न जाणलेलें असें केवळ शब्दमात्रानें सांगितलें जातें, तें सर्व अग्निरहितस्थळीं शुष्क काष्ठें घातल्याप्रमाणें प्रकाशित होत नाहीं. व्यासस्मृतींत—

वेदस्याध्ययनं कार्यं धर्मशास्त्रस्य वापि यत् ॥ अजानतार्थं तत्सर्वं तुषाणां कंडनं यथा ॥ १ ॥ यथा पशुर्भारवाही न तस्य लभते फलं ॥ द्विजस्तथार्थानभिज्ञो न वेदफलमश्नुते ॥२॥ पाठमात्ररतान्नित्यं द्विजातींश्चापि वर्जयेत् ॥ पशूनिव च तान्प्राज्ञो वाग्मात्रेणापि नार्चयेत् ॥३॥

अर्थ—वेद व धर्मशास्त्राध्ययन ब्राह्मणांनीं अवश्य करावें पण तें अर्थज्ञानरहित झाल्यास तूस (कोंडा) कांडल्याप्रमाणें केवल त्रासावहच होय; जसा गहूं, हरबरे, मूग वगैरे धान्यांचा भार वाहणाऱ्या बैल गाढव वगैरे पशुजातीय प्राण्यांना तत्संबंधीं फल प्राप्त होत नसतें, तद्वत्, अर्थ न जाणणारास केवल वेदाध्ययनानें तत्प्राप्तव्य संपूर्ण फल प्राप्त होत नाहीं. याक-

रितां केवल पाठमात्रासक्त त्रैवर्णिकांस निरंतर दुरूनच त्यागिलें पाहिजे; ज्ञात्यांना ते पशूंप्रमाणें केवळ शब्दानें देखील पूज्य नव्हेत. याकरितां संध्यानुष्ठानासाठीं संध्यार्थ जाणणें हें सुज्ञांना अत्यंत अवश्यकच होय. याचप्रमाणें—

दक्षस्मृत्युक्ति—" वेदस्वीकरणंपूर्वं विचारोऽभ्यसनं जपः ॥ "

अर्थ—व्रतबंधनानें अधिकार येतांच आधीं वेदांचा स्वीकार करून, त्यानंतर अर्थविचार, अभ्यास व जप इत्यादि कर्म क्रमानुरूप करणें विहित आहे. असो.

ह्या पुस्तकांत संध्यार्थ प्रकट करण्याचा प्रयत्न केला आहे. संध्येची अवश्यकता सप्रमाण असल्यास तिचा उपयोग वाटणार आहे. याकरितां उपलब्ध प्रमाणें येथें दाखविलीं आहेत.

" अहरहःसंध्यामुपासीत । यःसंध्यामुपास्तेब्रह्मैव तदुपास्ते "

**अर्थ**—प्रत्येक दिवशीं त्रिकाल संध्योपासना केली पाहिजे; जो संध्योपासना करितो, त्याचें तेंच ब्रह्मोपासनात्मक कर्म होय.

तैत्तिरीयब्राह्मणश्रुतिः—" उद्यंतमस्तं यं तमादित्यमभिध्यायन्कुर्वन्ब्राह्मणो विद्वान्सकलं भद्रमश्नुते ।

**अर्थ**—सूर्योदय व सूर्यास्ताच्या संधींत सूर्यांतर्गत श्रीलक्ष्मीनारायणस्मरणपूर्वक संध्याकर्म करणारा मंत्रार्थज्ञ ब्राह्मण संपूर्ण मंगलकारक असा मोक्ष पावतो.

छांदोग्यश्रुति—" तस्माद्ब्राह्मणो अहोरात्रसंयोगे संध्यामुपास्ते स ज्योतिषोज्योतिषो दर्शनादिति ।"

**अर्थ**—रात्र संपून दिवस लागतेवेळीं व दिवस संपून रात्र लागतेवेळीं, प्रातःसंध्या नक्षत्रसहित व सायंसंध्या नक्षत्रोदयापूर्वीं अशा संधिकालीं, जो ब्राह्मण करितो, तो अनंत फल पावतो.

रहस्याम्नायब्राह्मणश्रुति—" आसूर्योदयात्पूर्वोत्तराशामुखस्त्ववरोत्तराशामुख आनक्षत्रोदयादिति, तदुहत्राप्ते ब्रह्मवादिनः पूर्वाभिमुखास्संध्यायां गायत्र्याअभिमंत्रिताऽऽपऊर्ध्वंविक्षिपंतीति, ब्रह्मवादिनो वदंति कस्माद्ब्राह्मणोऽहोरात्रे संध्यामुपास्ते, कस्माद्ब्राह्मणः सायमासीन संध्यामुपास्ते, कस्मात्प्रातास्तिष्ठन् का संध्या? कश्च संध्याकालः? किंच संध्यायाः संध्यात्वं? देवाश्चासुराश्च स्पर्धंत ते असुरा आदित्यमभिद्रवन् ॥

स आदित्यो बिभेत्तस्य हृदयं रूपेणातिष्ठत्स प्रजापतिमुपाधावत्तस्य प्रजापतिरेतद्भेषजमपश्यद्दतं च सत्यं च॥ब्रह्म चोंकारं च त्रिपदां गायत्रीं ब्रह्मणो मुखमपश्यन् ॥ तस्माद्ब्राह्मणोऽहोरात्रसंयोगे संध्यामुपास्ते ॥ स ज्योतिषोज्योतिषोदर्शनात्सोऽस्य संध्याकालः सा संध्या ॥ तत्संध्यायाः स्संध्यात्वं ॥ यत्सायमासीनस्संध्यामुपास्ते तया वीरस्थानं जयति ॥ यत्प्रातस्तिष्ठन् । तया स्वर्गलोकं जयति ॥ अथ यदपः प्रयुंक्ते ताविप्रुषो वज्री भवंति ॥ ताविप्रुषो वज्री भूत्वा असुरानपाघ्नंतीति ॥ ”

यांत ब्रम्हज्ञान्यांनीं, संध्या करण्याचें कारण काय, संध्या कोणत्या कालीं करावी, तो काल कोणता, संध्या कोणती, असे प्रश्न आल्याचें पाहून, सूर्यास प्राप्त झालेल्या असुरनिमत्तक आपत्तींस ब्रम्होक्तसंध्येचें आचरण हेंच औषधरूप महत्फल होय असें सांगितलें आहे. तसेंच जो प्रातःसंध्या यथायोग्यकालीं व विधिपूर्वक आचरितों तो स्वर्गलोकास जातो; जो सायंसंध्या तसीच निष्ठापूर्वक आचरितो, तो वीरस्थानाप्रत ( स्वर्गलोकांतील एक आनंदकारक वीरपुरुषांनीं मिळविणेची जागा तीप्रत ) गमन करितो, अशीही फलश्रुति सांगितली आहे.

तैत्तिरीयश्रुतिः—“रक्षांसि हवापुरोऽनुवाके तपोग्रमतिष्ठंत तान्प्रजापतिर्वरेणोपामंत्रयत तानिवरमवृणीतादित्यो नोयोद्धाइति ॥तान्प्रजापतिरब्रवीत् योधयध्वमिति ॥ तस्मादुत्तिष्ठं तं हवा तानि रक्षांस्यादित्यं योधयंति ॥ यावदस्तमन्वगात्तानि हवा एतानि रक्षांसीत्यादि ॥ मंदेहारुणे प्रक्षिपंति यत्प्रदक्षिणं प्रक्षिपंति तेन पाप्मानमवधुन्वंतीति ॥ ”

यांत, ब्रम्हवरानें असुर सूर्यापाशीं युद्धाला येतात, त्यांचें निरसन अर्घ्यदानानें होत असल्यानें तें आचरिल्यानें ज्ञानिजन सकल पापापासून मुक्त होतात, असें वर्णिलें आहे. संध्या, यापूर्वीं वरिष्ठ देवादिकांनीं आचरिल्याचा शिष्टाचार असल्याबद्दल—

याज्ञवल्क्यस्मृति—“ब्रह्मणोपासिता संध्या विष्णुना शंकरेण च ॥ कस्तांनोपासयेद्देवीं सिद्धिकामो द्विजोत्तमः ” ॥ १ ॥ तथाश्रीमद्भागवते—“अथाप्लुतोंभस्यमले यथाविधि क्रियाकलापं परिधाय वाससी ॥चकार संध्योपगमादिसत्तमो हुतानलो ब्रह्म जजाप वाग्यतः ॥ १ ॥ उपस्थायार्कमुद्यंतं तर्पयित्वात्मनः कलाः ॥ देवान् ऋषीन्पितॄन्वृद्धान्विप्रानभ्यर्च्य चात्मवान् ॥ २ ॥”

इत्यादि प्रमाणसिद्ध शिष्टाचार–'लोकसंग्रहाकरितां' मूळरूपी श्रीविष्णु व तद्वतारभूत श्रीकृष्ण यांनीं, आणि 'विधिबद्धत्वामुळें' ब्रम्हरुद्रादिकांनीं संध्यादि कर्मे केल्याचा संप्रदाय दिसून येतो. याकरितां संसारी, बद्ध, त्रैर्वाणकांनीं योग्यवेळीं विधिपूर्वक संध्या आचरणें अवश्यक आहे. म्हणूनच सर्व शिष्टजन सांप्रत योग्य वेळीं संध्या करितात. आतां—

## संध्या करणाऱ्यांस फल व न करणाऱ्यांस अनर्थ

स्मृतिवचनांनीं दाखविला जातो.

" विप्रो (मित्रो) वृक्षस्तस्य मूलं च संध्या वेदाःशाखाधर्मकर्माभिपत्रं॥
तस्मान्मूलं यत्नतो रक्षणीयं छिन्ने मूले नैव शाखा न पत्रं ॥ १ ॥

**अर्थ**—सूर्यदेव [ किंवा ब्राह्मण ] श्रौत स्मार्त कर्मानुष्ठानास आधारभूत वृक्ष होय; त्या वृक्षास मूलभूत म्हणजे संध्या; व वेद हे शाखा ( फांद्या ) आहेत; धर्मकर्म हीं त्याचीं पत्रें होत. याकरितां ज्यांला वेद व धर्मकर्मे संरक्षण करावयाचीं आहेत, त्या द्विजांकडून [ त्रिवर्णोद्भव नरांकडून ] संध्यारूप जें मूळ त्याचें प्रयत्नपूर्वक रक्षण झालें पाहिजे.

संध्या येन न विज्ञाता संध्या येनानुपासिता ॥
जीवमानो भवेच्छूद्रो मृतः श्वा चाभिजायते ॥ १ ॥

**अर्थ**--विप्रजन्मास येऊन उचित कालीं ज्याणें संध्या जाणली नाहीं व अनुष्ठिलीही नाहीं, तो जिवंत असेतोंपर्यंत शूद्रच राहून, मेल्यानंतर श्वानजन्माप्रत पावतो असें जाणावें.

यः संध्यां कालतः प्राप्तामालस्यादतिवर्तते ॥
सूर्यहत्यामवाप्नोति उलूकत्वमियात्स च ॥ १ ॥

**अर्थ**—जो कालतः प्राप्त झालेली संध्येची वेळ आलस्यानें अतिक्रमण करितो ( दवडतो, ) तो सूर्यहत्यारूप पापास प्राप्त होऊन जन्मांतरीं घूक–( घुबडाच्या ) योनींत जन्मास येतो.

संध्याहीनोऽशुचिर्नित्यमनर्हस्सर्वकर्मसु ॥
यदन्यत् कुरुते नित्यं न तस्य फलभाग्भवेत् ॥ १ ॥

**अर्थ**—जो संध्या न करितां राहतो, तो सर्वकाळ अशुचि व म्हणून इतर सर्व कर्माला अनधिकारी आहे, आणि त्यामुळेंच त्यानें केलेल्या इतर सत्कर्मांचेंही फळ त्यास मिळत नाहीं.

**नोपतिष्ठंति ये संध्यां स्वस्थावस्थाश्च ये द्विजाः ॥ हिंसंति च सदा ते च भगवंतं दिवाकरं ॥ १ ॥ अनार्तश्चोत्सृजेद्यस्तु स विप्रः शूद्रसंमितः ॥ प्रायश्चित्ती भवेच्चैव लोके भवति निंदितः ॥ २ ॥**

**अर्थ**—रोगादि उपद्रवरहित असून स्वस्थ असतेवेळीं, संध्या न करणारे द्विज सूर्यहत्येच्या पापास अधिकारी होतात; अत्यंत आर्त [ व्याधिग्रस्त ] नसुन संध्यात्याग केलेला द्विज शूद्राप्रमाणें निंद्य होऊन प्रायश्चित्तार्ह होतो.

इत्यादि अनेक प्रमाणांनीं—संध्या **कर्तव्यविधि** ( करणेची अवश्यकता ) व न केल्यास **प्रत्यवाय** ( दोष ) निर्विवाद सांगितला. यापेक्षां संध्येच्या कर्तव्यतेबद्दल विशेष प्रमाणभाग दाखवून ग्रंथ वाढविण्याची जरूरी दिसत नाहीं.

## ( इति पीठिका—प्रस्तावना—भागः संपूर्णः )



पृष्ठ क्रमांक ८ मूळ पुस्तकात प्रकाशकाने हेतुतः कोरे सोडले होते.

तरी या क्रमवीक्षित (scanned) पीडीएफ् प्रतीच्या वाचकांचा गोंधळ होऊ नये म्हणून येथे हे पृष्ठ घालीत आहे.

हरिः ॐ ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ श्रीमदानंदतीर्थभगवत्पादाचार्यगुरुभ्योनमः ॥ प्राङ्मुख उदङ्मुखोवा देवाग्निदीपेंदुगोविप्रजलसंनिधौ चैलाजिनकंबलकुशोत्तरआसने उपविश्य द्विराचमनं कुर्यात् तद्यथा ॥ ॐ श्रीकेशवायनमः ॥ ॐ श्रीनारायणायनमः ॥ ॐ श्रीमाधवायनमः ॥ ॐ श्रीगोविंदायनमः ॥ ॐ श्रीविष्णवेनमः ॥ ॐ श्रीमधुसूदनायनमः ॥ ॐ श्रीत्रिविक्रमायनमः ॥ ॐ श्रीवामनायनमः ॥ ॐ श्रीधरायनमः ॥ ॐ श्रीहृषीकेशायनमः ॥ ॐ श्रीपद्मनाभायनमः ॥ ॐ श्रीदामोदरायनमः ॐ श्रीसंकर्षणायनमः ॥ ॐ श्रीवासुदेवायनमः ॥ ॐ श्रीप्रद्युम्नायनमः ॐ श्रीअनिरुद्धायनमः ॥ ॐ श्रीपुरुषोत्तमायनमः ॥ ॐ श्रीअधोक्षजायनमः॥ ॐ श्रीनारसिंहायनमः ॥ ॐ श्रीअच्युतायनमः ॥ ॐ श्रीजनार्दनायनमः ॥ ॐ श्रीउपेंद्रायनमः ॥ ॐ श्रीहरयेनमः ॥ ॐ श्रीकृष्णायनमः ॥ पुनराचम्य ॥ अथप्राणायामः ॥

---

स्मृत्वा विष्णुं समुत्थाय कृतशौचो यथाविधि ॥
धौतदंतः समाचम्य स्नानं कुर्याद्विधानतः ॥ १ ॥

**अर्थ**–या श्रीमदाचार्यप्रणीत सदाचारस्मृतिवचनाप्रमाणें, उषःकालीं ह्मणजे पांच घटका रात्र असतेवेळीं उठून श्रीहरिस्मरण करून भूमीची प्रार्थना करावी व नंतर शौचमुखमार्जनादि यथाविधि करून तुलसीला पाणी घालून पुढील मंत्र ह्मणून तिच्या मुळांतील मृत्तिकेनें कपाळावर नाम लावावें.

ललाटे यस्य दृश्येत तुलसीमूलमृत्तिका ॥ यमस्तं नेक्षितुं शक्तः किमु दूता भयंकराः ॥ २ ॥ पापानि यानि रविसूनुपटस्थितानि ब्रह्मघ्नबालपितृमातृवधादिकानि ॥ नश्यंति तानि तुलसीवनदर्शनेन गोकोटिदानसदृशं फलमाप्नुवंति ॥ ३ ॥

प्रणवस्य परब्रह्मऋषिः ॥ परमात्मा देवता ॥ दैवी गायत्रीच्छंदः सप्तानां व्याहृतीनां विश्वामित्रजमदग्निभर-

**अर्थ**–ज्याच्या ललाटीं तुलसी मृत्तिकेचा उर्ध्वपुंड्र ह्मणजे नाम दिसते, त्याला पाहण्यास प्रत्यक्ष यमदेव समर्थ होत नाहीं, मग त्याचे भयंकर असे दूत पाहणार नाहींत ह्मणून काय सांगावे? प्रातःकालीं तुलसीचें दर्शन घेतल्यानें सूर्यपुत्र जो यम त्याच्या यादींत असलेलीं ब्राह्मण, बाल, पिता, माता, इत्यादिकांच्या वधापासून घडलेलीं जीं पातकें तीं सर्व नष्ट होऊन कोट्यावधी धेनुदानाचें फल मिळतें. याकरितां तुलसीस पाणी घालून, तन्मूलस्थित मृत्तिकेनें ललाटीं सच्छिद्र दंडाकार नामधारण करून श्रीदेव, गुरु, गायी, द्विज इत्यादिक श्रेष्ठांस वंदन करून आचमन व संकल्पादि पूर्वक जेथें शुद्धोदक शीत अथवा उष्ण असेल तेथें जाऊन स्नान करावें. तदंग अर्घ्यतर्पणादि करून पूर्वदिवशीं श्रीदेवाचे पूजेचें निर्माल्य ठेविलेलें तीर्थ त्रिवार प्राशन करावें. धौत वस्त्र परिधानपूर्वक योग्य आसनावर बसून नाममुद्रा धारण करावी. हेंही कर्म मुख्यच समजलें पाहिजे. याविषयीं ऋग्वेद श्रुतिप्रमाण.

" चमूषच्छ्येनः शकुनो विभृत्वा गोविंदुर्द्रप्स आयुधानि बिभ्रत् ॥
अपामूर्मिंसचमानः समुद्रं तुरीयं धाम महिषो विवक्ति ॥ ४ ॥ "

**अर्थ**–कर्मतरंगरूप या संसारसमुद्रांत असणारा प्राणी श्येन पक्ष्याप्रमाणें स्त्रीपुत्रादिरूप सैन्यांत आसक्तीनें राहिला असला तरी वेद प्रतिपादित गोविंद नामक श्रीनारायणाच्या शंखचक्रादि आयुधांनीं तप्ततनू होऊन गोपीचंदनानें प्रतिदिवशीं शंखचक्रादि आयुधें धारण करणारा होतो, त्यावेळीं तो पूज्य होत्साता चतुर्थरूप वासुदेव नामक श्रीहरीच्या वैकुंठलोकीं जातो. याविषयीं श्रुति, स्मृति, कौस्तुभ, कृष्णाचार्यस्मृति, वशिष्ठस्मृति, स्मृत्यर्थसागर, पंचरात्रागम, विष्णुरहस्य, वराहपुराण, युक्तिमल्लिकाफलसौरभ इत्यादि अनेक सद्ग्रंथांत बहु विस्तृत श्रुति स्मृति प्रमाणें दाखवून सयुक्तिक प्रतिपादन केलें आहे. विस्तारभयानें तो विषय येथें दिला नाहीं.

" यज्ञो दानं जपो होमः श्राद्धं स्वाध्यायतर्पणं ॥ भस्मीभवति तत्सर्वं उर्ध्वपुंड्रं विना कृतं ॥ १ ॥ धृतोर्ध्वपुंड्रदेहस्तु संध्योपासनमाचरेत् ॥ उपासीत द्विजः संध्यां प्राङ्मुखोदङ्मुखोपिवा ॥ २ ॥

**अर्थ**–ऊर्ध्वपुंड्र ( ह्मणजे नाममुद्रादि ) धारणांवांचून केलेलें यज्ञ, दान,

द्वाजगौतमात्रिवासिष्ठकश्यपाऋषयः ॥ अग्निवायुसूर्यबृहस्पतिवरुणेंद्राविश्वेदेवा देवताः ॥ गायत्र्युष्णिगनुष्टुब्बृहतीपं-

---

जप, होम, श्राद्ध, स्वाध्याय, तर्पण इत्यादि कर्म निष्फल होत असल्यानें, सर्वदा द्विजांनीं नाम मुद्रा धारणपूर्वक पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख होऊन संध्योपासना करावी.

" होमे त्रिकालसंध्यासु क्रियासु पठने तथा ॥
नैकवस्त्रःप्रवर्तेत द्विजोवाचमने जपे ॥ १ ॥

**अर्थ**—होमकालीं, त्रिकाल संध्यासमयीं, तसेंच कोणत्याही सत्क्रियेच्या वेळीं, वेद, वेदांत पुराण पठनादिकालीं, आचमन व जपसमयीं फक्त एक वस्त्रानें युक्त असूंनये.

" अथाचम्य कुशैर्युक्त आसने समुपस्थितः ॥
करसंपुटकं कृत्वा संध्यां नित्यं समाचरेत् ॥ १ ॥

**अर्थ**—स्नान धौतवस्त्र परिधान, ऊर्ध्वपुंड्र मुद्राधारणादि केल्यानंतर योग्य आसनावर बसून स्वर्णमय किंवा दर्भमय पवित्र धारणपूर्वक आचमन करून उभय हस्त जोडून संध्या करावी.

" दाने परिग्रहे होमे जपे संध्यात्रये तथा ॥
बलिकर्मणिचाचामेदादौ द्विःसकृदंततः ॥ १ ॥

**अर्थ**—दान कन्यापरिग्रहण, हवन, जप, त्रिकालसंध्या व बलिहरण इत्यादि कालीं आरंभीं दोनदा, अंतीं एकदा आचमन करावें.

" नजल्पंश्रहसंप्रेक्षन्नशब्दंस्पर्शयन्नृप ॥ नसंचरन्नचाक्रम्य नचान्यानवलोकयन ॥ न चलासनमाक्रम्य नापवित्रकरद्वयः ॥ उदये प्राङ्मुखास्तिष्ठन्संख्ययैवं जपेद्बुधः ॥ २ ॥

**अर्थ** जपकालीं, संभाषण करणें, हसणें, इतस्ततः पाहणें, शब्दकरणें, दुसऱ्याला स्पर्श करणें व फिरणें, ओंढणें, दुसऱ्यास पाहणें, हालणाऱ्या आसनावर बसणें, अशुद्धहस्त असणें इत्यादि कर्म वर्ज करून उदयकालीं प्राङ्मुख राहून संख्यापूर्वक जप करावा.

**अतां सत्प्रमाणाधारावरून नाममुद्रादि धारणक्रम प्रदर्शीत करितों**:—शुद्ध शीतजलानें आचमन व संकल्प करून नाममुद्राधारण करावी. तो क्रम, स्नानोत्तर वर सांगितल्याप्रमाणें योग्य आसनीं उपविष्ट

त्रिष्टुब्जगत्यश्छंदांसि ॥ गायत्र्या विश्वामित्रऋषिः सवितादेवता ॥ गायत्रीच्छंदः ॥ गायत्रीशिरसःप्रजापति-

होऊन आचमन प्राणायाम देशकालसंकल्पपूर्वक तिलकायुध धारण करितों, असा संकल्प करून, वामहस्तावर पळीनें शुद्ध शीतजल घेऊन तें जल गायत्री आणि श्रीनारायणाष्टाक्षर [ म्हणजे " ॐ नमो नारायणाय ] या मंत्रानें त्रिवार अभिमंत्रित करून गोपिचंदनाची प्रार्थना पुढील श्लोकांनीं करावी.

" गोपिचंदन पापघ्न विष्णोर्देहसमुद्भव ॥ चक्रांकित नमस्तुभ्यं धारणान्मुक्तिदं भव ॥ १ ॥ मृत्तिके धारयिष्यामि भक्त्या त्वां केशवप्रिये ॥ त्वया स्पृष्टो गमिष्यामि विष्णुलोकं सनातनं ॥ २ ॥

अर्थ श्रीविष्णूच्या देहापासून उत्पन्न झालेल्या, पापघ्न गोपिचंदना, सुदर्शनचक्रांकित अशा तुला नमस्कार असो. तुझ्या धारणानें तूं मला मुक्ति देणारें हो. श्रीहरिप्रिय मृत्तिके, मी तुला भक्तीनें धारण करितों, मी तुझ्या स्पर्शानें युक्तहोत्साता मी सनातन अशा श्रीविष्णुलोकीं जाईन. अशी प्रार्थना करून गोपिचंदनमृत्तिकेचा खडा उजव्या हातानें धरून " तद्विष्णोःपरमंपदं " या ऋचेनें डाव्याहातावर मर्दन करावे. " अतोदेवा अवंतुनो " या ऋचानीं तिलकायुधें धारण करावींत. नामें अंगुष्ठागुलीनें [ आंगठ्यानें ] लावल्यास पुष्टिदायक; तर्जनीनें लावल्यास मोक्षदायक; मध्यमेनें लावल्यास आयुष्यकारक; अनामिकेनें लावल्यास अन्नदायक, असें निरानिराळ्या अंगुलीनें नामधारण केल्याचें फळ आहे. यास प्रमाण

" अंगुष्ठः पुष्टिदः प्रोक्तः मध्यमायुष्करी भवेत् ॥
अनामिकाऽन्नदा नित्यं तर्जनी मोक्षदायिका ॥ १ ॥

## नामें लावण्याचा क्रम.

" ललाटे प्रथमं विद्यात्द्वितीयमुदरेतथा ॥ हृदयेतु तृतीयं स्यात् कंठेचैव चतुर्थकं ॥ कुक्षौ दक्षिणपार्श्वेतु पंचमं स्याद्विधानतः ॥ षष्टं दक्षिणबाहौ स्यात्सप्तमं कंठपार्श्वके ॥ कुक्षौ वामप्रदेशे स्यादष्टमं नवमं स्मृतं ॥ वामबाहौ तु तत्पार्श्वे कंठे तु दशमं स्मृतं ॥ एकादशं पृष्ठभागे द्वादशं ककुदि स्मृतं ॥ त्रयोदशं तथा मूर्ध्नि धारयेदूर्ध्वपुंड्रकं ॥ द्वादशेति च यः पक्षस्तास्मिन् शिरसि वर्जयेत् ॥

## नामाच्या आकृती.

" दंडकारं ललाटेतु पद्माकारं तु वक्षसि ॥ वेणुपत्राकृतिं बाह्वोरन्या

ऋषिः ॥ ब्रह्माग्निवाय्वादित्या देवताः ॥ यजुश्छंदः प्राणायामे विनियोगः ॥ ॐ भूः ॐ भुवः ॐ स्वः ॐ महः

---

दीपाकृतीर्न्यसेत् ॥ ऊर्ध्वपुंड्रं ललाटे तु दंडाकारं सुशोभनं ॥ मध्ये छिद्रेण संयुक्तं सच्छिद्रं हरिमंदिरं ॥ अच्छिद्रमूर्ध्वपुंड्रं तु यः कुर्यात् ब्राह्मणाधमः ॥ ललाटे विधृतस्तेन शुनःपादो न संशयः ॥ नासिकाया स्त्रिभागे तु नासामूलमुदाहृतं ॥ तदादि केशपर्यंतं दंडाकारं प्रकल्पयेत् ॥ भ्रुवोरधस्तादारभ्य दंडाकारं प्रकल्पयेत्

## आतां नामदेवता.

ललाटे केशवं ध्यायेन्नारायणमथोदरे ॥ वक्षस्थले माधवंच गोविंदं कंठकूबरे ॥ विष्णुंच दक्षिणे कुक्षौ बाहौच मधुसूदनं ॥ त्रिविक्रमं कंधरे तु वामनं वामपार्श्वके ॥ श्रीधरं वामके बाहौ हृषीकेशं तु कंधरे ॥ पृष्ठे च पद्मनाभं तु ककुद्दामोदरं न्यसेत् ॥ एवं स्यात् शुक्लपक्षे तु कृष्णे संकर्षणादिभिः ॥

## आतां परिमाण.

दंडाकारं ललाटेस्याच्चतुरंगुलमानकं ॥ बाह्वोर्दशांगुलं प्रोक्तं नवाष्ट हृदि वा भवेत् ॥ नाभ्यादौ सप्तषट्कं च फाले नासादिकेशतः ॥ नवांगुलं मध्यमाहुरष्टांगुलमतःपरं ॥ अधमं सप्तषट्कं च पुंड्राकारं यथाविधि ॥ शरं चापं तथा मूर्ध्नि स्तनयोः खडगचर्मणी ॥ कौस्तुभं हृदये दद्याच्छ्रीवत्सं दक्षिणस्तने ॥

**अर्थ**–हा प्रकार येथें सत्प्रमाणाधारानुरूप दाखवितों. तो असा, नासिका मुळापासून केशांपर्यंत, दंडाकार चार अंगुल परिमित मध्यें छिद्र असून ललाटावर सुशोभित नाम प्रथमतः धारण करून, त्यानंतर पोटावर दीपज्योती-प्रमाणें दहा अंगुल परिमित, तसेंच वक्षस्थळावर पद्माच्या कळीप्रमाणें सात किंवा आठ अंगुलें, त्यानंतर कंठावर दीपाकृतिवत चार अंगुलें, तसेंच उजव्या पार्श्व भागीं दीपाकृतिवत् दहा अंगुलें व उजव्या भुजावर वेळवाच्या पानाच्या आकृतीप्रमाणें आठ अंगुलें, नंतर उजव्या कंठ प्रदेशीं पूर्ववत् ( दीपवत् ) चार अंगुलें नंतर डाव्या बाजूस पार्श्व, भुज व कंठ प्रदेशीं उजव्याप्रमाणें नामें धारण करून नंतर पाठीच्या खालच्या प्रदेशीं, तसेंच वरच्या प्रदेशीं मानेवर दीप-वत् दोन अंगुल परिमित पूर्वोक्त क्रमानें द्वादश ( १२ ) नामें लावितांना ललाटा रभ्य शुक्लपक्षांत केशवादि दामोदरपर्यंत बारा नांवें, तथा कृष्णपक्षांत ललाटादि बारा नामें लाविते वेळीं संकर्षणादि श्रीकृष्णायनमः पर्यंत बारा नांवें उच्चार

**ॐ जनः ॐ तपः ॐ सत्यं। ॐ भूर्भुवः स्वः तत्सवितुर्वरेण्यंभर्गोदेवस्यधीमहि ॥ धियोयोनः प्रचोदयात् ॐ**

करून विधुक्त रीतीनें गोपीचंदनानें नामधारण करून, तदनंतर मस्तकावर धनुर्बाणाकृति दोन अंगुल परिमित ॐ श्रीवासुदेवायनमः अशा उच्चारानें लावून, नंतर दक्षिण स्तनाच्या ऊर्ध्वभागीं सुशोभित अग्र खालीं करून नाम लावावें. व त्याच्या डाव्या बाजूस त्याच स्तनावर खड्ग, ( तरवारीची आकृति ) व डाव्या स्तनावर पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें चर्म ( ढाल ) याची आकृति धारण करून, हृदयावरील नामावर कंठाच्या खालीं आवळयाप्रमाणें कौस्तुभरत्नाकर नाम धारण करावें. )

## आतां मुद्राधारणक्रम सप्रमाण दाखवितो.

" मम चक्रांककवचमभेद्यं देवदानवैः ॥ अजेयः सर्वभूतानां शत्रूणां रक्षसामपि ॥ मम चक्रांककवचं शरीरे यस्य तिष्ठति ॥ नाशुभं विद्यते तस्य गृहे पुत्रादिकस्यच ॥ मम चक्रांकिततनुर्म्रियते यत्र कुत्रचित् ॥ प्रयागे या गतिःप्रोक्ता सा गतिस्तस्य देहिनः ॥ चक्रांकितानां नामानि यो वदेद्भक्तिमान्नरः ॥ सर्वपापविनिर्मुक्तः स याति परमं पदं ॥ विष्णु चक्रांकितं विप्रं विष्णुमूर्तिमिव स्मरेत् ॥ सवै विष्णुमयो भूत्वा वैष्णवीं गतिमाप्नुयात् ॥ अचक्रधारिणं विप्रं यः श्राद्धे भोजयेन्नरः ॥ रेतोमूत्रपुरीषादि स पितृभ्यः प्रयछति ॥ शंखायुधांकितो भक्त्या श्राद्धं यः कुरुते सुत ॥ विधिहीनं तु संपूर्ण पितृणां दत्तमक्षयं ॥ शंखांकिततनुर्विप्रो भुंक्ते वै यस्यवेश्मनि ॥ तदन्नं स्वयमश्नाति पितृभिः सह पुत्रक ॥ कृष्णायुधांकितं दृष्ट्वा सन्मानं न करोति यः ॥ द्वादशाब्दार्जितं पुण्यं बाष्कल्यायोपगच्छति ॥ कृष्णायुधांकितो यस्तु श्मशाने म्रियते यदि ॥ प्रयागे या गतिः प्रोक्ता सागतिस्तस्यमानद ॥ धृता नारायणी मुद्रा प्रल्हादेन करे पुरा ॥ विभीषणेन बलिना ध्रुवेण जनकेनच ॥ मांधाता हयरोषेण मार्कंडेयमुखैर्द्विजैः ॥ उर्ध्वपुंड्रविना कर्मनिषेधः सर्व उच्यते ॥ कर्मादौ तिलकं कुर्याद्रूपं तद्वैष्णवं परं ॥ गोप्रदानं तथा होमः स्वाध्यायः पितृतर्पणं ॥ भस्मीभवति तत्सर्वमूर्ध्वपुंड्रंविनाकृतं ॥ नाशमायांति पुण्यानि स पिशाचो भवेन्नरः ॥ धृत्वा पुंड्राणि चाचम्य संध्याकर्म समाचरेत् ॥ चक्रशंखगदादीनि गोपीचंदनमृत्स्नया ॥ विष्णवायुधानि बिभृयात् ज्ञानमुक्तिप्रदानि वै ॥

आपोज्योतीरसोऽमृतं ब्रह्मभूर्भुवस्स्वरोम् ॥ अनेन मंत्रेण त्रिवारं प्राणानायम्य ॥ अथ संकल्पः ॥ कृते पापेऽनुतापो

इत्यादि, अनेक सदागमाधारावरून नाममुद्रा धारणावांचून द्विजांस कोणतेंही सत्कर्म करण्याचा अधिकार नाहीं; ह्मणून तें अवश्य केलेंच पाहिजे. हेंच वरील प्रमाणांचें तात्पर्य होय.

## आतां मुद्रा-प्रार्थना सांगतों

**प्रथमतः सुदर्शनचक्रप्रार्थना " सुदर्शन महाज्वाल कोटिसूर्यसमप्रभ ॥ अज्ञानांधस्य मे नित्यं विष्णोर्मार्गं प्रदर्शय ॥**

**अर्थ**—हे कोटि सूर्य प्रकाशक, जाज्वल्यमान सुदर्शन चक्रा ! अज्ञानांध अशा मला विष्णूचा मार्ग दाखीव. अशी प्रार्थना करून उजव्या कपोलावर एक, उदर मध्यावर पांच, हृदयावर तीन, कंठावर हनुवटीखालीं एक, दक्षिण पार्श्वभागीं दोन, दक्षिण स्तनमंडलावर तीन, दक्षिण बाहूवर वरच्या प्रदेशीं दोन, दक्षिण कर्णमूल कंठ प्रदेशीं एक, वाम बाहूच्या नामाच्या खालील अंगावर एक, याप्रमाणें धारण करावे.

## याविषयीं प्रमाण.

**एकं कपोले हृदये त्रीणि मध्योदरे तथा ॥ पंच पार्श्वे द्वयं त्रीणि दक्षिणस्तनमंडले ॥ चक्रद्वयं दक्षिणे तु बाहौ तिलकमूर्धनि ॥ न्यसे दधस्तादेकंतु तिलके वामबाहुके ॥ कर्णमूले तथा कंठे एकमेकं तु धारयेत् ॥ "**

## आतां शंख प्रार्थना.

**पांचजन्य निजध्वानध्वस्तपातकसंचय ॥**
**पाहि मां पापिनं घोरं संसारार्णवपातिनं ॥**

**अर्थ**—स्वशब्द मात्रानें निरस्तपापसमूह हे पांचजन्या ! संसारसमुद्रांत बुडलेल्या घोर व पापिष्ट अशा मातें रक्षण कर. ( अशी प्रार्थना करून ) डाव्या कानशिलावर एक, वामपार्श्वीं दोन, वामस्तनीं तीन, वाम भुजावर नामाच्या वरच्या प्रदेशीं दोन, वामकर्णमूलीं एक, दक्षिण बाहूच्या नामाच्या खालील अग्रावर एक.

## याविषयीं प्रमाण.

**वामे कपोले शंखं तु द्वयं पार्श्वे त्रयं स्तने ॥ शंखद्वयं तथा बाहौ**

वै यस्य पुंसः प्रजायते ॥ प्रायश्चित्तं तु तस्योक्तं हरिसंस्मरणं परं ॥ न जाने कर्म यत्किंचिन्नापि वैदिकलौकिके

---

विन्यसेत्पुंड्रमूर्धनि ॥ बाहौ तु तिलकाधस्ताद्दक्षिणे शंखमेककं ॥
कर्णमूले तथा वामे शंखमेकं तु धारयेत् ॥

## आतां गदा प्रार्थना.

दैत्यशोणितदिग्धांगे कौमोदाकि गदे हरेः ॥
च्छिदि भिंदि तमोंतस्थं त्वां नमामि पुनः पुनः ॥

**अर्थ**–हे, दैत्यरक्तानें भिजलेल्या अशा हरीच्या कौमोदकि गदे! माझें अंतस्थ अज्ञान छिन्नभिन्न कर. तुला पुनः पुनः नमस्कार करितों. ( अशी प्रार्थना करून ) ललाटावर एक, वामपार्श्वभागीं एक, वामस्तनावर एक, वाम बाहूवर दोन वामकर्णमूलावर एक, पृष्ठभागीं एक, याप्रमाणें धारण करावें.

## याविषयीं प्रमाण.

" ललाटेतु गदा धार्या वामे पार्श्वे तथा स्तने ॥ बाहौ च तिलके द्वे तु शंखाधोभागभेदतः ॥ गदामेकां पृष्ठतश्च धारयेत्सुसमाहितः ॥

## आतां पद्म प्रार्थना.

" संसारभयभीतानां योगिनामभयप्रद ॥
पद्म हस्तस्थितं विष्णोः पाहि मां सर्वतो भयात् "

**अर्थ**–संसार भयानें भीत अशा योग्यांना अभय देणारें व निरंतर विष्णूच्या हातांत असणारें, असें जें तूं पद्म, तें मला सर्व प्रकारच्या भयांपासून रक्षण कर. ( अशी प्रार्थना करून ) वक्षःस्थलावर दोहोंकडे दोन, दक्षिण पार्श्वीं एक, दक्षिण स्तनीं एक, दक्षिण बाहूवर चक्राच्याखालीं दोन, याप्रमाणें धारण करावें.

## याविषयीं प्रमाण.

पद्मं भागद्वये वक्षस्यधोपार्श्वे तथा स्तने ॥
एकैकं दक्षिणे बाहौ चक्राधस्ताद्द्वयं लिखेत् "

## आतां नारायण नाममुद्रा प्रार्थना.

" नाममुद्रे नमस्तुभ्यं त्वदंकिततनुर्हरेः ॥
प्रसादाद्विष्णुलोकेहं चिरं स्थास्यामि निर्वृतः "

**अर्थ**–हे नारायण नाममुद्रे, तुला नमस्कार असो. जो तुझ्या नामानें चिन्हित देह आहे तो, मी तुझ्या प्रसादानें वैकुंठाच्या ठाईं निर्भरानंदहोत्साता

न निषेधविधी विष्णो तव दासोस्मि केवलं ॥ श्रीरामकृष्ण गोविंद गोविंद श्रीमद्भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया

चिरकाल वास करीन, अशी प्रार्थना करून सर्व पुंड्रांच्या ठिकाणीं सर्व मुद्रांवर एकेक नाममुद्रा धारण करावी;

## याविषयीं प्रमाण.

**" नाम सर्वेषु पुंड्रेषु स्तनयोश्चकपोलयोः "**

याप्रमाणें यथा कर्मे पांचही मुद्रा निरंतर गोपीचंदनानें धारण करून शुद्धोदकानें त्या मुद्रा प्रक्षालन करून तें तीर्थ किंचित् स्वमस्तकावर प्रोक्षण करून घेऊन अभिवंदन पूर्वक पुसून ठेवाव्या, मुईवर ठेवूं नये, उर्ध्वपुंड्राऐवजीं तिर्यक् पुंड्र धारण करणाऱ्यांस अत्यंत भयंकर शासन शास्त्रानें दाखविलें आहे. तें असें.

**" तिर्यक् पुंड्रं न कर्तव्यं प्राप्तेपि प्राणसंकटे ॥ यदि कुर्याद्विमूढात्मा रौरवं नरकं व्रजेत् ॥ वैष्णवो नैव कुर्वीत तिर्यक्पुंड्रं कदाचन ॥ यदि कुर्वीत मोहेन तं वै घातयते यमः ॥ हेलया यः प्रकुर्वीत तिर्यक् पुंड्रं नराधमः ॥ तस्य हस्तंच्छिनत्त्येव यमः परमकोपनः ॥ यस्य फाले प्रदृश्येत तिर्यक्पुंड्रं द्विजन्मनः ॥ तं दृष्ट्वा पापकर्माणमादित्यमवलोकयेत्**

**अर्थ**—तिर्यक्पुंड्र ( अर्ध चंद्राकार उटी ) प्राण जाण्याची वेळ आली तरी सर्वथा धारण करूं नये. एखादा मूढमति अज्ञानानें करील तर तो देहावसानीं अत्यंत दुःखप्रद रौरव नरकीं जाईल. वैष्णवानें तर **तिर्यक्पुंड्र** स्वप्नीं देखील धारण करूं नये. असें असुन मोहानें करील तर यमदेव त्याचा समूल घात करील, अवज्ञेने क्रीडार्थ नाटक खेळ, इत्यादिकांत वेष धारण करितेवेळीं जो **मानवाधम तिर्यक्पुंड्र** धारण करितो, त्याचा हस्त क्रोधायमान असा यमदेव कापितो. व ज्या त्रैवर्णिकाच्या निटिलावर **तिर्यक्पुंड्र** असतो तशा त्या पापकर्मी मानवाला पाहिला असतां प्रायश्चित्तार्थ आदित्यावलोकन करून तदंतर्गत श्रीनारायणाचें स्मरण करावें. इतितिर्यक्पुंड्रनिषेधः ॥

## त्यांत प्रथमतः आवश्यक संध्याक्रम तो हा

**आदा वाचमनं कार्यं प्राणायामत्रयं ततः ॥ मार्जनं तु ततश्चैव मंत्राचा मस्ततो मतः ॥ पुनराचमनं चैव मार्जनं वै ततः परं ॥ पापं विसर्जयेत् पश्चात् पुनराचमनं तथा ॥ प्राणायामत्रयं प्रोक्तमर्घ्यदानं हरेस्ततः ॥ आचामस्तु ततः प्रोक्तो मंत्रोपविशनं ततः ॥ गायत्रीच ततो न्यासा वाहनध्यानसंयुता ॥ मंत्राणां परमा प्रोक्ता सेवनीया सदा बुधैः ॥**

प्रवर्तमाने अद्यास्मिन्ब्रह्मांडे भूर्लोके जंबुद्वीपे भरतखंडे भारतवर्षे श्रीपरशुरामक्षेत्रे सह्यावर्ते महामेरौ दक्षिणापथे नैमिषारण्ये दंडकारण्ये गौतमाश्रमे गोदावर्या दक्षिणे तीरे ब्रह्मणोऽस्य द्वितीयपरार्धे श्रीश्वेतवराहकल्पे वैवस्वतम-

---

उपस्थानोपसंहारौ ततः प्रोक्तौ हरिप्रियो ॥ अयं क्रमस्तु संध्यायाः सेवनीयः सदा द्विजैः ॥

**अर्थ**--आधीं आचमन, दोनदां करून संकल्पपूर्वक प्राणायामत्रय करावें, नंतर नवद्वारांतील कार्य देवतांच्या शुध्यर्थ नवमार्जनें, आणि मंत्राचमन करून पुनराचमन करावें, **तथा पुनः वीसमार्जनें** व पापपुरुष विसर्जन करून आचमन पूर्वक प्राणायामत्रय करून, सूर्यास अर्घ्य देऊन ह्मणजे सूर्यांतर्गत सवितृनामक श्रीलक्ष्मीनारायणास अर्घ्यत्रय देऊन, आचमन करावें, आणि मंत्रांग आसनप्राणायामपूर्वक **पापपुरुषध्यान, शोषण, दाहन, प्लावन तथा दक्षकुक्षिस्थ पुण्यपुरुषध्यान व तत्वन्यास, मातृकन्यासादि** करून, सर्व मंत्रांत परम श्रेष्ठ असा **गायत्री जप, न्यास, आवाहन, ध्यान यांनीं युक्त** करावा, व संध्येचें उपस्थानपूर्वक कृष्णार्पण करून आचमन करावें. वरील क्रमाप्रमाणें संध्या करिते वेळीं **प्राणायाम** [ वायु शरिरांत कोंडणें ] करणें जरूर आहे. त्यायोगें मनाचें चांचल्य दूर होऊन चित्तास **एकाग्रत्व** ( एक निष्ठता ) येतें. या प्राणायाम कालीं जिव्हाशोषणपरिहारार्थ आचमनविधि सांगितला आहे. त्यायोगें जिव्हा शुद्ध झाल्यानें देहास वक्ष्यमाण मंत्रस्नान वगैरे करणेस सुलभ होतें. करिता आचमन व प्राणायामाची आवश्यकता असते व **मार्जन** मंत्राचमनादि हें अज्ञान व पापविमोचनार्थच होय. **अर्घ्यप्रदान** हें सूर्यमंडल जड शरिर असून त्यांतील ईश्वरदत्त तेज सर्व प्राण्यांच्या हितासाठीं खळ न पडतां निरंतर राहो, असा भाव. सूर्य संरक्षणार्थ तदंतर्गत परमात्म्यास देण्याचें 'मंदेहनामक' राक्षस सूर्यास बाधा करितात, तत्च्छांत्यर्थ **ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्यांनीं** अर्घ्यप्रदान नियमित कालीं करावें, ह्मणून सांगितलेल्या विष्णुपुराण वचनास गरुडपुराण ज्ञानकांडांत "**मंदेह**" या पदाला सूर्यास दिनक्रमानें तेज क्षीण होतें. त्या क्षीणतेस **मंदेह** असें ह्मणतात. त्याचाच क्रूरपणा राक्षसतुल्य होय. तन्निमित्तक क्षीणता परिहारार्थ संध्याकालीं सूर्यमंडलस्थ नारायण आणि तोच अभ्यंतर्यामी श्रीपरशुरामरूपी हरी यांस अर्घ्यदान सांगितलें आहे. करितां तो विधि केलाच पाहिजे. सूर्यांतर्गत श्रीविष्णु आहे.

न्वंतरे अष्टाविंशातिमे युगचतुष्के अत्र कलियुगे प्रथमचरणे बौद्धावतारे, श्रीशालीवाहनशके वर्तमाने अमुकसंवत्सरे अमुकअयने अमुकऋतौ अमुकमासे अमुकपक्षे अमुक-

---

## याविषयीं प्रमाण.

" रविमध्ये स्थितः सोमः सोममध्ये हुताशनः ॥ तेजोमध्ये स्थितं सत्यं सत्यमध्ये स्थितोऽच्युत इति याज्ञवल्क्यस्मृतौ ॥

**अर्थ**–सुर्यामध्यें सोम ( चंद्र ) मंडल व त्यांत अग्निबिंब, तदंतर्गत वायुबिंब, त्या वायुबिंबांत चतुर्विध नाशरहित श्रीहरी असतो. अर्घ्यप्रदान झाल्यानंतर आसनावर बसून प्राणायामानें एकाग्रचित्तानें न्यासांनीं अज्ञान राहित्य संपादून ध्यानश्लोकानें गायत्रीशब्दवाच्य श्रीहरिचे गुण उत्तमप्रकारें स्मरून गायत्री जप करावा. याप्रमाणें ध्यानयोग झाल्यावर उपस्थानानें ईश्वरस्मरण करून सर्व विश्व त्या परमात्म्याधीन जाणावें. व यस्यस्मृत्या इत्यादि वक्ष्यमाणप्रकारें संध्या श्रीकृष्णाला अर्पण करावी. तात्पर्य उक्त आचमनादि उपसंहारांत व क्रमांत एकही सोडणें अनुकूल नसून सर्वांची जरूरी आहे. प्रातःकालीं निर्विचार स्वस्थ चित्त असतें. आणि माध्यान्हीं अति श्रमजनक वेळ असते. संध्याकालीं सर्व कामें समाप्त करून स्वस्थ राहण्याची वेळ असते. ह्मणून उक्तकालत्रयीं संध्यावंदन उत्तम ध्यानपूर्वक श्रीहरी वंदिला जावा. ह्मणून प्राचीन ऋषिवर्यांनीं संध्येस उचित असे कालादि नियम ठरविले. हे नियम संपूर्ण ब्रह्मचारी आणि गृहस्थाश्रमी यांस लागू आहेत. वानप्रस्थ आणि संन्यासी यांस तपश्चरणानें अपरोक्ष ज्ञान प्राप्त होत असल्यानें, हे सर्व नियम सांगितले नाहींत. ब्रह्मचारी बालपणामुळें अशक्त असल्यानें त्यानें तीन अंगुलींनीं व गृहस्थ हे मध्यवयस्क असून सशक्त असल्यानें त्यानें पांच अंगुलींनीं प्राणायाम करिते वेळीं त्यांस नासिकाग्र पीडन सांगितलें आहे.

याचंतोऽस्यां विकर्मस्थाः पृथिव्यां बालिशा द्विजाः ॥
तेषां पावित्र्यसिध्यर्थं संध्या सृष्टा स्वयंभुवा ॥

**अर्थ**–जितके या भूमीवर अज्ञ विप्र आहेत त्यांच्या पावित्र्याकरितां परमात्म्यानें संध्या निर्माण केली आहे.

" उपास्ते संधौ सूर्यस्य निशायां दिवसस्यच ॥
तामेव संध्यां तस्मात्तु प्रवदंति महर्षयः ॥

तिथौ अमुकवासरे अमुकदिवसनक्षत्रे विष्णुयोगे विष्णु-करणे अमुकराशिस्थिते चंद्रे अमुकमहानक्षत्रे अमुकरा-

---

अर्थ–सूर्याचा उदय आणि अस्तमान यांच्या संधिकालीं उपासना केली जाते, ह्मणून ज्ञानी असे महर्षि तिला संध्या ह्मणतात.

मौंजीबंधनमारभ्य सायं प्रातश्च कालयोः ॥
माध्यान्हेपिच कर्तव्या यावत्प्राणविमोक्षणं ॥

अर्थ–उपनयनारभ्य देहावसान होईपर्यंत प्रातःकालीं मध्यान्हीं आणि सायंकालीं अशा तीनही संध्या विप्रांनीं केल्याच पाहिजेत. येथें आधीं सायंकालीन संध्येला आरंभ होत असल्यानें तो क्रम वरील ग्रंथांत दाखविला.

## संध्यावंदन कालनिर्णयः

" उत्तमा तारकोपेता मध्यमा लुप्ततारका ॥
अधमा सूर्यसहिता प्रातःसंध्या त्रिधा मता ॥

अर्थ–प्रातःकालीन संध्या नक्षत्र प्रकाश असतांना करणें, उत्तम पक्ष. नक्षत्रें अप्रकाशित झाल्यानंतर करणें मध्यम पक्ष. व सूर्योदयानंतर करणें अधम पक्ष होय.

" उत्तमा सूर्यसहिता मध्यमास्तमिते रवौ ॥
अधमा तारकोपेता सायंसंध्या त्रिधा मता ॥

अर्थ–सायंकालीन संध्या सुर्य दिसत असतांना करणें उत्तम. सूर्यास्त झाल्यानंतर मध्यम, व नक्षत्रोदयानंतर करणें अधम पक्ष होय.

" अर्धयामादासायं संध्या माध्यान्हिकी मता ॥

अर्थ- माध्यान्हिक संध्या प्रातःकालच्या अर्धयामा ( दीड तासा ) पासून सायंकालपर्यंत करणेस काल सांगितला आहे.

" उपसीत द्विजः संध्यां प्राङ्मुखोदङ्मुखोपिवा ॥

अर्थ संध्या प्राङ्मुख ( पूर्वाभिमुख ) किंवा उदङ्मुख ( उत्तराभिमुख बसूनही करावी.

गृहे त्वेकगुणा संध्या गोष्ठे दशगुणा भवेत् ॥
सहस्त्रगुणिता नद्यां अनंता विष्णुसंनिधौ ॥

अर्थ–संध्या घरामध्यें केल्यास एक गुण फल, गोष्ठांत केल्यास दशगुण अधिक फल, नदीच्या तीरीं केल्यास त्याहूनी सहस्त्रगुण फल, आणि विष्णुसन्निध केल्यास अपरिमित फलदात्री होय.

शिस्थिते श्रीसूर्ये अमुकराशिस्थिते श्रीदेवगुरौ अमुक राशिस्थिते शनौ शेषेषु ग्रहेषु यथायथा राशिस्थितेषु

---

" अकालेतु कृता संध्या सातु वंध्या भविष्यति ॥

**अर्थ**—या वचनावरून अकालीं केलेली संध्या वांझेप्रमाणें निष्फल होते. करितां ज्याच्या प्राप्तीसाठीं संध्यादि कर्में करावयाचीं त्या विष्णु परमात्म्याच्या महोत्सवादि अत्यंत महत्कार्य ह्मणजे हरिदिनमहोत्सवांतीं द्वादशी पारणावांचून इतर प्रसंगीं संध्या करण्याविषयीं कालापकर्ष किंवा अतिक्रम करूं नये.

## यापुढें आचमनक्रम दाखवितों.

संध्या करणाऱ्या द्विजांनीं प्रातःकाळीं उठून शौचादि विधि झाल्यानंतर यथासांग स्नान करून धौतवस्त्रें परिधान करून पवित्र आणि उत्तरीय वस्त्रें धारण करून कृष्णाजिनादि योग्य आसनावर बसुन गायीच्या कानाप्रमाणें उजवें हस्ततल करून **माषमात्र** ( उडीद परिमित ) जल डाव्या हस्तानें पळीनें घेऊन अंगुष्ठ मूलांतून देवसंज्ञक तीर्थानें, ॐश्रीकेशवायनमः ॐश्रीनारायणायनमः ॐश्रीमाधवायनमः हीं तीन नांवें उच्चारून तीनदा प्रत्येकवेळीं माषपरिमित जलानें आचमन करावें, ह्मणजे तीन वेळ प्राशन करावें. नंतर "गोविंदायनमः" या नामोच्चारानें उदक खालीं सोडावें. पुढें **ॐश्रीकृष्णायनमः** पर्यंत हात जोडून उच्चार केल्यानें एक आचमन होतें; असें दोनदा करावें. दर्भपवित्र धारण केलें असेल तर आचमनांतीं त्यागून दुसरें घ्यावें; तें सुवर्णाचें असेल तर दोष नाहीं. आचमनादि सत्कर्म करितेवेळीं जांघेच्याबाहेर हात ठेवूं नये. पूर्वाभिमुख बसून आचमन केलें असतां अमृतप्राशनतुल्य फल, व उत्तराभिमुख बसून केल्यास यज्ञशेष सोमवल्ली रस प्राशन केल्याचें फल आणि पश्चिमाभिमुख आचमन केल्यास प्रायश्चितार्थ पुनराचमन करावें लागतें. दक्षिणाभिमुख आचमन केलें तर केवल रक्तप्राशन केल्याचें पातक आहे. होमकालीं भोजनोत्तर आणि संध्येच्यावेळीं दोनदां आचमन करावें. नखस्पर्श झालेलें जल संध्या, देवपूजादि सत्कर्माला निषिद्ध आहे. ह्मणून अंगुलीच्या अग्रानें उदकाचा उपयोग करूं नये असा भाव.

## आतां केशवादि नाममंत्रार्थ संक्षेपानें लिहितों.

" **ॐश्री** " याचा उच्चार प्रत्येक नामारंभी केवल अवश्य नमून आद्यंत नामोच्चाराच्यावेळीं उच्चार केल्यास पुरे आहे.

सत्सु एवंगुणविशिष्टायां शुभपुण्यातिथौ श्रीमन्मध्वाचार्याणां हृत्कमलमध्ये निवास्यनंतकल्याणगुणपरिपूर्णक्षीरा-

ॐश्रीकेशवायनमः " ॐ " ह्मणजे अनंत गुणपरिपूर्ण, लक्ष्मीयुक्त, ब्रह्मरुद्र प्रवर्तक श्रीकेशवरूपी श्रीहरीकारणें नमस्कार असो. ॥ १ ॥ ॐश्रीनारायणायनमः ॥ ह्म० निर्दोष आणि सर्वगुणाश्रय, अशा श्रीनारायणास नमस्कार असो. ॥ २ ॥ ॐश्रीमाधवायनमः ह्म० ज्ञानधर्मप्रवर्तक. अथवा लक्ष्मीपती अशाकारणें नमस्कार असो. ॥ ३ ॥ ॐश्रीगोविंदायनमः ह्म० वेदप्रतिपादित अशाकारणें नमस्कार असो. ॥ ४ ॥ ॐश्रीविष्णवेनमः ह्म० विश्वव्यापक व विशिष्टज्ञानवंत अशाकारणें नमस्कार असो. ॥ ५ ॥ ( या दोन नामांनीं दोन्हीं हस्ततलें प्रक्षालन करावीं. ) ॐश्रीमधुसूदनायनमः ॥ ह्म० मधुदैत्यसंहारक अशाकारणें नमस्कार असो. ॥ ६ ॥ ( या नामानें सर्व अंगुली एकत्र करून नासिकेच्या खालचा भाग स्पर्श करावा. ) ॐश्रीत्रिविक्रमायनमः ह्म० तीनही लोकांत विशिष्ट पराक्रमी अशाकारणें नमस्कार असो. ॥ ७ ॥ ( या नामानें संहतांगुलींनीं ( जोडलेल्या बोटांनीं ) ओंठाखालच्या प्रदेशाचा स्पर्श करावा. ) ॐश्रीवामनायनमः ॥ ह्म० लक्ष्मीस वामभागीं घेतलेला, अथवा मंगलरूपधारी अशाकारणें नमस्कार असो. ॥ ८ ॥ ॐश्रीश्रीधरायनमः ॥ ह्म० लक्ष्मीस धारण करणारा अशाकारणें नमस्कार असो. ॥ ९ ॥ (या दोन नामांनीं उजव्या व डाव्या अशा दोन्ही हनुवटीचे प्रदेशास स्पर्श करावा.) ॐश्रीहृषीकेशायनमः ॥ ह्म० सर्वेंद्रियनियामक अशाकारणें नमस्कार असो. ॥ १० ॥ ( या नांवानें दोन्ही हस्तांनीं अंजलिपुट करावा. ) ॐश्रीपद्मनाभायनमः ॥ ह्म० नाभींत पद्म असलेला अशाकारणें नमस्कार असो. ॥ ११ ॥ ( या नांवानें दक्षिण आणि सव्यपादास स्पर्श करावा. ) ॐश्रीदामोदरायनमः ॥ ह्म० दाम ( दावें ) उदरीं असलेला अशाकारणें नमस्कार असो. ॥ १२ ॥ ( या नांवानें सर्वांगुली एकत्र मिलित करून शिरस्पर्श करावा. ) ॐश्रीसंकर्षणायनमः ॥ ह्म० पापीजनांस अत्यंत तापविणारा अशाकारणें नमस्कार असो. ॥ १३ ॥ ( या नांवानें संकुचितअंगुलींनीं नासामूल स्पर्श करावें. ॐश्रीवासुदेवायनमः ॥ ह्म० बलरूप प्राणवायूच्या योगें जीवांस प्रेरणा करणारा, अथवा उत्तम प्राणनामक वायूचाही प्राण असा अथवा जो सर्व भूतांत वास करणारा, किंवा सर्व भूतें ज्याच्या ठायीं वास्तव्य करितात अशा कारणें नमस्कार असो ॥ १४ ॥ ॐश्री-

ब्धिशायिश्रीविष्णुप्रेरणया श्रीविष्णुप्रीत्यर्थं सत्कर्माधिकारसिद्ध्यर्थंच तिलकायुधधारणं करिष्ये ।। इतिसंकल्प्य ।।

---

**प्रद्युम्नायनमः** ।। ह्म० अत्यंत प्रकाशमान असलेला, अशाकारणें नमस्कार असो. ।। १५ ।। या नांवाने अंगुष्ठ व मध्यमांगुलीनें नासारंध्रद्वयाचा स्पर्श करावा. ॐ **श्रीअनिरुद्धायनमः** ह्म. भक्तीच्या द्वारें स्वेच्छेनें भक्तवत्सल होणारा अशाकारणें नमस्कार असो. ।। १६ ।। ॐ **श्रीपुरुषोत्तमायनमः** ।। ह्म. क्षराक्षर ( सर्व भूतें व प्रकृति ) याहूनहि श्रेष्ठ अशाकारणें नमस्कार असो. ।। १७ ।। या दोन नांवांनीं अंगुष्ठ व मध्यमांगुलीनें डाव्या व उजव्या नेत्रांस स्पर्श करावा. ॐ **श्री अधोक्षजायनमः** ।। ह्म. नेत्रांनीं खालीं असलेल्या ( मर्त्य लोकांतील ) भक्तजनांला पाहून रक्षण करणाऱ्या कारणें नमस्कार असो. ।। १८ ।। ॐ **नारसिंहायनमः** ।। ह्म० अर्ध नर व अर्ध सिंहाकृति याकारणें नमस्कार असो. ।। १९ ।। या दोन नांवानीं अनामिका व अंगुष्ठानें उजव्या व डाव्या कानांचा स्पर्श करावा. ॐ **अच्युतायनमः** ।। ह्म० च्युति इत्यादि नाशरहित अशा कारणें नमस्कार असो. ।। २० ।। या नांवानें अंगुष्ठ व कनिष्ठिका यांहीं नाभि स्पर्श करावा. ॐ **श्रीजनार्दनायनमः** ।। ह्म० प्रलयकालीं संपूर्ण लोकांचा नाश करणारा अशा कारणें नमस्कार असो. २१ (या नांवानें हृदयस्पर्श करावा) ॐ **श्रीउपेंद्रायनमः** ।। ह्म. परमैश्वर्ययुक्त अशा कारणें नमस्कार असो. ।। २२ ।। या नांवानें सर्व अंगुलें एकत्र करून शिरस्पर्श करावा. ) ॐ **श्रीहरयेनमः** ।। ह्म. भक्तपापहारी अशाकारणें नमस्कार असो. ।। २३ ।। ॐ **श्रीकृष्णायनमः** ह्म. कृषि शब्दवाच्य भूमीवरील दुर्जनांचा संहार करणारा अशाकारणें नमस्कार असो. ।। २४ ।।( या दोन नांवांनीं उजवें व डावें भुजमूल स्पर्श करावें. ) या आचमनांत संपूर्ण विष्णुगुण प्रतिपादकच नामें असल्यानें कोणतेंही सत्कर्म सफल होण्यास आधीं सर्व देवोत्तम श्रीविष्णूचें स्मरण बहुवार करणें हें आवश्यक आहे. याकरितां श्रौत स्मार्त कर्मारंभीं आचमनविधि शास्त्रोक्त होय.

## आतां दशप्रणव युक्त प्राणायाम क्रम सांगतों.

" **सावित्रीं शिरसा सार्धं जपेद्व्याहृतिपूर्विकां** ।।
**प्रतिप्रणवसंयुक्तां त्रिरयं प्राणसंयमः** ।।

**अर्थ**–आधीं सप्तव्याहृति, नंतर सावित्रीमंत्र, आणि शिरोभाग प्रति प्रणव सहित याप्रमाणें तीनदां केल्यास एक प्राणायाम होतो.

**तिलकायुधधारणं विधिवत् कृत्वा नमो मुद्राभ्य इति मुद्राः संप्रार्थ्य शुद्धपात्रे स्थापयेत्**

---

" भूः भुवः स्वः महः जनः तपः सत्यं तथैवच ॥ प्रत्योंकारसमायुक्तं तथा तत्सवितुः पदं ॥ ओमापोज्योतिरित्येतच्छिरः पश्चात्प्रयोजयेत् ॥ त्रिरावर्तनयोगात्तु प्राणायामस्तु शब्द्यते ॥

**अर्थ**—भूःइत्यादि सत्यं पर्यंत सप्तव्याहृति ॐकारपूर्वक उच्चारून त्यानंतर " तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ॥ धियो यो नः प्रचोदयात् ॥

हा सावित्रीचा मंत्र उच्चार करावा, त्यानंतर " आपोज्योति " इत्यादि शिरोभाग " ॐकार " पूर्वक उच्चारावा, तीन आवृत्ति केल्यास एक प्राणायाम होतो.

" कनिष्ठानामिकाभ्यांच गृहीत्वा वामभागतः ॥ ह्रस्वोच्चारणकालाख्या मात्रा षोडश रेचयेत् ॥ द्वात्रिंशत्पूरणे प्रोक्ता चतुःषष्ठ्यस्तु कुंभके ॥ दक्षनासापुटेनैव पूर्वं वायुं विरेचयेत् ॥ अंगुष्ठेन पुटे बध्वा नासाया दक्षिणं पुनः ॥ वामभागेन संपूर्य धारयेत्पूर्णकुंभवत ॥ पंचांगुलीभिर्नासाग्रपीडनं प्रणवाभिधा ॥ मुद्रेयं सर्वपापघ्नी वानप्रस्थगृहस्थयोः ॥ कनिष्ठानामिकांगुष्ठैर्यतेश्च ब्रह्मचारिणः ॥ नासाग्रपीडनं प्रोक्तं मंत्रार्थ स्मृतिपूर्वकं ॥

**अर्थ**—कनिष्ठ व अनामिकांगुलीनें डावें नासापूट धरून उजव्या नासापुटांतून ऱ्हस्व सोळा ( १६ ) मात्रा उच्चार करणेस लागेल तेवढा वेळपर्यंत वायू बाहेर सोडावा, हें रेचक होय. पूरण बत्तीस ( ३२ ) मात्राकालानें, आणि कुंभक ६४ मात्राकालानें करावें. तथा दक्षिण नासापूट अंगुष्ठानें धरून वाम नासापुटानें वायुपूरण करावा, हें बत्तीस मात्रेचें पूरण होय. पांच अंगुलींनीं नासाग्र पीडन करून प्रणवोच्चारपूर्वक सर्व पापनाशक कुंभक मुद्रा करावी. ही चौसष्ट ( ६४ ) मात्रा कालानें होय. हा प्रकार गृहस्थ व वानप्रस्थांस लागू आहे. कनिष्ठ, अनामिका व अंगुष्ठ यांनीं यतीला व ब्रह्मचारी यांस मंत्रार्थ स्मरणपूर्वक नासाग्रपीडन सांगितलें आहे.

संध्यादावर्घ्यदानेच प्राणायामैकमाचरेत् ॥ आदावंते च गायत्र्याः प्राणायामास्त्रयस्त्रयः ॥ मंत्रमावर्तयेच्चित्ते त्रिषड्वारमथापि वा ॥ नव द्वादशवारं वा प्राणायामोयमीरितः ॥ अयं सगर्भः सफलः मंत्रार्थ स्मृतिपूर्वकः ॥ अगर्भः स्वर्गफलकः कुर्यात्तस्मात्सगर्भकं ॥

**॥ अथ प्रातःसंध्या ॥ द्विराचम्य पूर्ववत्प्राणानायम्य देशकालादिसंकीर्त्य भारतीरमणमुख्यप्राणांतर्गतसवितृनामकश्रीलक्ष्मीनारायणप्रीत्यर्थं प्रातःसंध्यां कौमारीं रक्तां रक्तवाससां हंसवाहनां ब्रह्मदैवत्यां गार्हपत्याग्न्युपस्थानां वेदवतीनाम्नीं ऋङ्मूर्तिमुपासिष्ये ॥ इतिसंकल्प्य ॥**

---

**अर्थ**—संध्येच्या आधीं आणि अर्घ्यदानकालीं एकेक प्राणायाम होय, गायत्री जपाच्या आधीं व अंतीं तीन तीन प्राणायाम करावेत, प्राणायाम करितेवेळीं ज्या मंत्राचा जप सांगितला तोच मंत्र चित्तांत आणून तीन अथवा सहा ( ६ ), किंवा नऊ ( ९ ), किंवा बारा ( १२ ), वेळां मंत्रार्थ स्मरणपूर्वक मंत्राच्या आवृत्ती केल्यास हा प्राणायाम सगर्भ मोक्षदायक होतो. अर्थ ज्ञानराहित केल्यास अगर्भ होऊन अशाश्वत स्वर्गादि फलदायक होतो, करितां मुमुक्षूनीं मोक्षप्रद सगर्भ प्राणायाम करावा.

## आतां ॐ भूरित्यादि मंत्रार्थ सांगतो.

ॐ ह्मणजे अनंत गुणांनीं, **भूः** ह्मणजे परिपूर्ण, **भुवः** ह्म. संपदादिप्रद, **स्वः** ह्म- अतिसुखविशिष्ट, **महः** ह्म. पूज्य, **जनः** ह्म. जगन्नियामक, **तपः** ह्म ज्ञानरूप आलोचनेनें प्रकट होणारा, **सत्यं** ह्म. उत्तम ज्ञानानंदादिरूप, **आपः** ह्म. जगत्पालक, **ज्योतिः** ह्म. प्रकाशमय, **रसः** ह्म. सर्वसारभूत, **अमृतं** ह्म. मरणादिदोष रहित, **ब्रह्म** ह्म. अनंत सद्गुण परिपूर्ण जगद्व्यापी श्रीनारायण, **भूर्भुवस्वः** ह्म. ऋग्यजुःसामवेदांचा बीज [ व्यंजक ] मंत्ररूपी, **ॐ** ह्म. सद्गुण परिपूर्ण असा, **यः** ह्मणजें जो श्रीहरी परमात्मा, **नः** ह्म. आमच्या **धियः** ह्म. बुद्धीतें, **प्रचोदयात्** ह्म. प्रेरणा करो. असा जगत्सृष्ट्यादि कर्ता, सवितृ शब्द वाच्य, क्रीडादि गुण विशिष्ट, श्रीविष्णुनामक देवाचें **तत्** ह्म. तें प्रसिद्ध, **वरेण्य** ह्म. भजन करण्यास योग्य, **भर्गः** ह्म. भारतीशब्दवाच्य वेदवाणीनें जाणविलेलें पापनाशक जगत्पोषण कर्तृत्वादि गुणयुक्त तेजातें **धीमहि** ध्यान करितो.

आतां संकल्प ह्मणजे देशकालस्थिति स्मरून अमुकच कर्तव्य करितो ह्मणून निश्चयसूचक पाणी सोडणें, तें असें,

---

**टीप**– [ भर्गः = तेज. ]

" न जाने कर्म यत्किंचिन्नापि वैदिकलौकिके ॥
न निषेधविधी विष्णो तव दासोऽस्मि केवलं ॥ "

**अर्थ**—मी वैदिक ( वेदोक्त ) आणि लौकिक ( शास्त्रोक्त ) विधिनिषेधरूप यत्किंचित्कर्महीं जाणत नाहीं. केवल मी तुझा दास आहें.

" कृते पापेऽनुतापो वै यस्य पुंसः प्रजायते ॥
प्रायश्चित्तं तु तस्योक्तं हरिसंस्मरणं परम् ॥ "

**अर्थ**—कोणत्याही पुरुषानें पाप केलें असतां पश्चात्ताप उत्पन्न होईल तर त्यास प्रायश्चित्त शास्त्रामध्यें सांगितलें आहे. तरी तें प्रायश्चित्त भगवान् शंकर व प्रल्हाद अशा महान्वैष्णवांनीं केल्याप्रमाणें हरिस्मरणपूर्वक केलें असेल तरच अत्यंत सफल होतें. याकरितां आदौ " **श्रीरामकृष्ण गोविंद गोविंद, श्रीमद्भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया** " असें स्मरून षड्गुणैश्वर्यसंपन्न सर्व पुरुष श्रेष्ठ श्रीविष्णूच्या आज्ञेनें चालत असलेल्यां या ब्रह्मांडांतील भूभागापैकीं जंबुनामक द्वीपांत असणाऱ्या भरतखंडांतील भारतवर्षनामक खंडांत श्रीरामक्षेत्रांतील गोदावरी तीराच्या दक्षिणभागांत श्रीपरशुरामक्षेत्रांतील सह्यनामक पर्वताच्या पलीकडे गोदावरी तीराच्या उत्तर प्रदेशीं नैमिषारण्यांत ( असे उत्तर कोंकणांत ) आणि खालच्या प्रदेशीं असलेल्या दंडकारण्यांत असणाऱ्या गौतमाश्रमांत वाहणाऱ्या गोदावरीच्या दक्षिणतीरीं ( असे दक्षिणकोकणांत राहणारांस ) या ब्रह्मांडाच्या आदिभागीं उत्पन्न अशा चतुर्मुख ब्रह्मदेवाच्या दुसऱ्या परार्धीं श्रीश्वेतवराहरूपी हरीच्या कल्पांतील वैवस्वताख्य मन्वंतरांत चालू असणाऱ्या अठ्ठाविसाव्या २८ युगचतुष्टयांतील कलियुगांत वर्तमान आद्यभागीं बौद्धावतारातील श्रीशालिवाहन शकांत ( गोदावरी तीराच्या उत्तरेस राहणारांस श्रीविक्रमशके असें ह्मणावें ) चालत असलेलें वर्ष तथा अयन, ऋतु, मास, पक्ष, तिथि, वार इत्यादि स्मरण करून पूर्वोक्त गुण विशिष्ट शुभ तिथिचेठायीं भारतीरमण अशा श्रीमुख्यप्राणहृदयकमलीं वास करणारा सवितृनामक श्रीलक्ष्मीनारायणाच्या प्रेरणेनें प्रस्तुत संनिहित श्रीमदानंदतीर्थ यांच्या हृत्कमलीं वास करणाऱ्या व अनंत मंगल गुणपरिपूर्ण, क्षीरसमुद्रशाई श्रीविष्णुप्रीत्यर्थ,

" **प्रभाते रविबिंबस्थां रक्तवर्णां कुमारिकां ॥**
**हंसारूढां साक्षमालामृग्वेदां ब्रह्मदैवतां** " ॥

**अर्थ**–प्रातःकालीं सूर्यमंडलस्थ, रक्तवर्णात्मक, कुमार वयाची, हंसारूढ,

---

१. ब्रह्मोवाच–" सृजामि तन्नियुक्तोहं हरो हरति तद्वशः " ( भागवतोक्तेः )

**आपोहिष्ठेतित्र्यृचस्य सूक्तस्यांबरीषः सिंधुद्वीपऋषिः आपोदेवता गायत्रीच्छंदः । मार्जनेविनियोगः ॥ वरवत्रितयं मूर्ध्नि ससथ त्रितयं हृदि ॥ नकारत्रितयं पादे वाक्यांते मार्जनं चरेत् ॥**

---

पद्माक्षमालायुक्त, ऋग्वेदमूर्ति, ब्रह्मदैवत, गायत्री अशी प्रातःसंध्यास्वरूप चिंतन करून प्रातःकालीन संध्या करितों, असें स्मरून देवनिर्माल्य हातीं घेऊन पाणी सोडावें. प्रत्येक कर्माच्या संकल्पकालीं तत्कालीन **संवत्सर, अयन, ऋतु, मास, पक्ष, तिथि, वार, नक्षत्र,** इत्यादि. एकसारखे नसल्यानें पंचांग पाहून त्या त्या दिवशीं तीं तीं संवत्सरादि घ्यावीं. असें केल्याने श्रीभारतीरमणवायुदेवांतर्गत श्रीविष्णूची उपासना निर्विघ्नपणें होते. करितां श्रीवायुदेवाचा तृतीयावतार "**श्रीमन्मध्वाचार्य**" याच कलियुगांत (७०० वर्षांपूर्वी) झाले होते. याकरितां तदंतर्गत श्रीविष्णुप्रीत्यर्थ असाच कोणत्याही कर्मारंभीं संकल्प करावा. तसा न केल्यास केलेलीं कर्में असुरांकडून दूषित होऊन निष्फल होतात. असा द्वैतमत (मध्वसिद्धांत) आहे. यास प्रमाण ऋग्वेद, वायुपुराण, स्कंदपुराण, व ब्रह्मांड पुराणांत व्यासांनीं भाकीत केलेलें या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत सविस्तर दिलेंच आहे.

## (आतां मार्जनक्रम सांगतों.)

"आपोहिष्टा" हें सूक्त तीन ऋचात्मक असून याचा ऋषि, ह्मणजे आधीं मंत्र पाहिलेला सिंधुद्वीप नामाचा होय. त्या सूक्तानें प्रतिपादित जगत्पालक आपनामक श्रीहरिदेवता आणि चोवीस अक्षरात्मक गायत्रीनामक छंद [ वृत्त ] आहे. **ऋषि, देवता, छंद,** जाणल्यावांचून मंत्रजप व्यर्थ आहे. करितां प्रत्येक मंत्राचा उपयोग करिते वेळीं ते अवश्य जाणले पाहिजेत. मार्जन करण्याचीं स्थानें,

**"नद्यां तीर्थे जले वाप्यां रौप्यताम्रादिपात्रके ॥**
**वामहस्ते जलं धृत्वा कुर्यान्मार्जनमात्मनः ॥**

**अर्थ**—नदींत, तीर्थजलांत, विहिरीवर अथवा रौप्यमय किंवा ताम्रमय पात्रांत जल घालून तें पात्र डाव्या हातीं घेऊन श्रीविष्ण्वर्पित निर्माल्यानें (तुलसीदळानें) मार्जन करावें.

**"संवत्सरकृतं पापं मार्जनांते विनश्यति ॥ विना यस्तुलसीं कुर्यात्संध्याकाले तु मार्जनं ॥ तत्सर्वं राक्षसहृतं नरकंच प्रयच्छति ॥ धाराच्यु**

तेन तोयेन संध्योपास्तिर्विगर्हिता ॥ पितरो न प्रशंसंति न प्रशंसंति देवताः " ॥

**अर्थ**—मार्जन केल्यानें एक संवत्सर केलेलें पाप नष्ट होतें; तुलसी निर्माल्यावांचून संध्याकाळीं मार्जन केल्यास तें फळ राक्षस नेतात. आणि तसें करणाऱ्यांस नरकप्राप्ति होतें. धारारूपानें पडणाऱ्या उदकानें संध्योपासना करूं नये. पितर आणि देव त्या कर्मानें तुष्ट होत नाहींत.

" मंत्रपूतं जलं यस्मात् आपोहिष्ठेति मंत्रितं ॥
पतत्यशुचिदेशेषु तस्मात्तं परिवर्जयेत् " ॥

**अर्थ**—धारारूप जलांत संध्या केल्यास तें जल आपोहिष्ठादि मंत्रांनीं मंत्रित करावें लागतें, व तें जल नंतर अशुद्ध देशांत पडूं देऊं नये, ह्मणून धाराजल, संध्येस निषिद्ध सांगितलें आहे,

" रजस्तमोमोहजातान् जाग्रत्स्वप्नसुषुप्तिजान् ॥
मनोवाक्कायजान्दोषान्नवैतान्नवभिर्दहेत् "

**अर्थ**—आपोहिष्ठादि तीन ऋचेंत नऊ ( ९ ) चरण असतात, तो प्रत्येक चरण ॐकार सहित उच्चारून निर्माल्य तुलसी दल तर्जनी आणि मध्यमांगुलीनें धरून ( ९ ) नऊ वेळीं उदक स्वदेहावर सिंचन केलें असतां, ( ९ ) दोष नष्ट होतात. ते हे रज तम आणि मोह यांनीं उत्पन्न झालेले तीन ( ३ ), तसेंच जागृत, स्वप्न, सुषुप्तींत झालेले तीन (३), मन, वाचा, आणि देहजन्य तीन (३), मिळून नऊ दोष दूर करणारें मार्जन अवश्य केलेंच पाहिजे.

## मार्जनस्थानें अशीं जाणावीं.

" वरवत्रितयं मूर्ध्नि ससथत्रितयं हृदि ॥
नकारत्रितयं पादे वाक्यांते मार्जनं चरेत् "

**अर्थ**—आपोहिष्ठादि नऊ चरणांच्या अंतीं नऊ अक्षरें असतात. त्यांत वकार अंतीं असलेल्या आद्य चरणानें व रेफ ह्मणजे रकार अंतीं असलेल्या षष्ठ चरणानें व वकार अंतीं असलेल्या सप्तम चरणानें मस्तकावर मार्जन करावें. सकार अंतीं असलेल्या तृतीय व चतुर्थ चरणांनीं आणि थकार अंतीं असलेल्या अष्टम चरणानें हृदयावर मार्जन करावें. तथा नकार अंतीं असलेल्या द्वितीय, पंचम, नवम या तीन चरणांनीं पायांवर मार्जन करावें. अशीं नऊ मार्जनें वर सांगितल्याप्रकारें अनुक्रमानें करावीं.

ॐ आपोहिष्ठा मयोभुवः । ॐ तानऊर्जेदधातन ॥ ॐ महेरणायचक्षसे ॥ ॐ योवःशिवतमोरसः ॥ ॐतस्य भाजयतेहनः ॥ ॐउशतीरिवमातरः ॥ ॐतस्माअरंगमा मवः ॥ ॐयस्यक्षयायजिन्वथ ॥ ॐआपोजनयथाचनः ॥ सूर्यश्चेतिमंत्रस्य याज्ञवल्क्यउपनिषदृषिः ॥ सूर्यमामन्यु मन्युपतिरात्रयोदेवताः ॥ प्रकृतिच्छंदः ॥ मंत्राचमने विनियोगः ॐसूर्यश्च मामन्युश्च मन्युपतयश्च मन्यु कृतेभ्यः । पापेभ्यो रक्षंतां । यद्रात्र्या पाप मकार्षम् । मनसा वाचा हस्ताभ्यां । पद्भ्यामुदरेण शिश्ना । रात्रिस्तदवलुंपतु । यत्किंचद्दुरितंमयिं । इदमहमाममृतयोनौ । सूर्ये ज्योतिषि जुहोमिस्वाहा ॥ आचम्य ॥

---

## आतां आपोहिष्टादि तीनही ऋचांचा अर्थ लिहितों.

हे जलांतर्गत आपशब्द वाच्य नारायणा ! आह्मांस सुख उत्पन्न करणारा हो. अत्यंत रमणीय असे तुझें दर्शन होण्याकरितां तपश्चरण वगैरे करण्यास या भूमींत आह्मांस **अन्न, बल, शक्ति** दे. जो तुझ्या प्रसादानें प्राप्त होणारा आनंदाख्य रस तो आह्मांस अति प्रेम युक्त जननीप्रमाणें आदरानें प्राप्त होण्यासा रखा कर. आह्मी तुझ्या प्रसादानें प्राप्त होणारा आनंद संपादण्यास तयार आहोंत. आमचीं पापें नाश करून संतोषयुक्त कर. तो आनंदरस प्राप्त होण्यास योग्य अशा तुझ्याच वैष्णवद्विज ( ब्रह्मणकुलीं ) आह्मांस उत्पन्न कर.

## आतां मंत्राचमनक्रम सांगतों.

उजव्या हातीं किंचित जल घेऊन " **सूर्यश्च** " या मंत्रानें मंत्रित करून तें जल प्राशन करावें " **आतां मंत्रार्थः** " ज्ञानीजनांस आश्रयभूत **श्रीनारायण** व रुद्र तसेंच क्रोधाभिमानी तात्विक देवता या सर्व आमच्या क्रोधाच्या वेळीं अज्ञानाविष्ठ होऊन परदाराभिमर्शन, परद्रव्यापहार, परप्राणहानि इत्यादि पापापासून रक्षण करोत. जें मनानें करण्याचें परदाराभिमर्शनादि पाप, आणि जें वाणीनें करण्याचें निष्ठुर असत्य भाषणादि पाप, जें हातांनीं करण्याचें

## आपोहिष्ठेति नवर्चस्य सूक्तस्यांबरीषः सिंधुद्वीपऋषिः। आपोदेवता । गायत्रीच्छंदः । पंचमीवर्धमाना सप्तमीप्रतिष्ठा

हिंसादि पाप व जें पायांनीं होण्याचें प्राणिवधजन्यपाप श्मशान, चंडालग्रहप्रवेश, इत्यादिकांपासुन होण्याचें पाप, व उदरा ( पोटा ) पासून होणेंचे निषिद्ध ( वांगीं कांदा, लसूण, शेंगा, मुळा, अळंबीं, पोपई, वाल, राजमाष, कालिंग इत्यादि.) पदार्थ व उच्छिष्ट, तामस पदार्थ भक्षणजन्य पाप आणि पशुपक्षी इत्यादिकासारखें गम्यागम्य विचार हीन होऊन केलेलें शिश्नेंद्रियजन्य पाप इत्यादि यच्चयावत् पातक आपल्याठाईं असतें, अशा अनेक पापरूपी मला, पापनामक रात्रिशब्दवाच्य श्रीहरि, तत्तद्रात्रिकृत पापापासून मुक्त करो. अशा श्रीहरि प्रसादानें पापमुक्त होऊन स्वात्मचित्त, प्रकाशमय अशा सूर्यमंडळस्थित श्रीनारायणापाशीं प्रार्थना करितों. सर्व सुमंगलयुक्त होवो.

हा मंत्र उच्चार करतेवेळीं प्रातःकालीन संध्येस आणि सायंकालीन संध्येस कांहीं पदें भिन्नक्रमानें घ्यावीं लागतात. तीं प्रातःकालीन संध्येस " सूर्यश्चमामन्युश्च " " यद्रात्र्या पापमकार्षं, रात्रिस्तदवलुंपतु, सूर्येज्योतिषि, " अशीं घ्यावीं. आणि सायंकालीन संध्येस " अग्निश्चमामन्युश्च, यदन्हा पापमकार्षं, अहस्तदवलुंपतु, सत्ये ज्योतिषि, " अशीं घ्यावीं. कारण, कालच्या-रात्रीं केलेलें पाप, आजच्या प्रातःकालीन संध्येनें निवृत्त व्हावें, तदुत्तरदिवसजन्य पाप सायंकालीन संध्येनें निवृत्त व्हावें. अर्थात् " मध्यान्हसंध्या " पृथक् करण्याचें कारण राहत नाहीं. अथवा प्रातःकालीन संध्या करितेवेळींच तदुक्तक्रमानें तीही एकतंत्ररूपानें करावी असा आशय उघड दिसतो. पुनराचमन पूर्ववत् न्यासादि पूर्वक चोवीस नावांनीं करावें.

### आतां पुनः मार्जनक्रम सांगतों.

" आपोहिष्ठा " इत्यादि नवऋचांनीं मार्जन करावें. पूर्वीं तीन ऋचांचा अर्थ सांगितला आहे. पुढें अवशिष्ट सहा ऋचांचा अर्थ सांगतों.

### " शंनोदेवी० "

**अर्थ**—क्रीडादिगुण विशिष्ट देवीशब्दवाच्य, हे श्रीनारायणा आम्हांस सुख आणि अभीष्ट वस्तु दे. उदकें प्राशनास योग्य होवो. आमच्या सुखाभिवृद्धीकरितां वृष्टिरूपानें एवोत. भो, जगत्पालक आपशब्दवाच्या, श्रीनारायणा !! ज्ञानभक्त्या-

अन्त्ये द्वे अनुष्टुभौ एक परिशिष्टमार्जने विनियोगः ॥ ॐ आपोहिष्ठामयो भुवस्तानं ऊर्जे दधातना । महेरणाय चक्षसे । ॐ योवः शिवतं मोरसस्तस्य भाजयतेहनः । उशतीरिवमातरः ॥ ॐ तस्माअरंगमामवो यस्य क्षयाय जिन्वथ । आपोजनयथाचनः ॐ शंनो देवी रभिष्टय आपो भवंतु पीतये । शंयोरभिस्रवंतुनः ॥ ॐ ईशानावार्याणा क्षयंतीश्चर्षणीनां ॥ अपोयाचामि भेषजं ॥ ॐ अप्सुमे सोमो अब्रवीदंतर्विश्वानिभेषजा ॥ अग्निंच विश्वशंभुवं ॥ ॐ आपःप्रणीतभेषजं वरूथं तन्वे ३ मम ज्योक्चसूर्यंदृशे ॥ ॐ इदमापः प्रवहत यत्किंच दुरितंमयि । यद्वाहमभिदुद्रोह यद्वा शेप उतानृतं ॥ ॐ आपो अद्यान्वचारिषं रसेन समगस्महि । पयस्वानग्न आगहि तंमासंसृजवर्चसा ॥ ॐ ससुषीस्तदपसो दिवा नक्तं च ससुषीः वरेण्यक्रतू रहमादेवी रवसेहुवे ॥ भद्रन्नइत्यस्य ऐंद्रोविमदऋषिः अग्निपरमात्मा देवता एकपदा विराट्च्छंदः ॐ भद्रन्नो अपिवातय मनः इतित्रिः ३ ॥ ऋतंचेति त्र्यृचस्याघमर्षणऋषिः भाववृत्तोदेवता । अनुष्टुप्छंदः ।

---

द्विगुणानीं आह्मांस प्रार्थित देणेंविषयीं तूं समर्थ आहेस व्यापकत्व निमित्तानें सकललोकांस वासस्थल भूत आहेस. करितां तुजपाशीं मी संसारापासून मुक्तीस कारण औषध रूप ज्ञान मागतो. उत्कृष्ट प्रमाणयुक्त सोमशब्दवाच्य श्रीवायुदेव सर्व पालक आपशब्दवाच्य परमात्म्याच्या ठाई अंतर्भूत सर्व औषधें आहेत ह्मणून मला श्रीविष्णुतत्वनिर्णय, ब्रह्मसूत्रभाष्यादि, आणि भारत, पंचरात्रादि सत्पुराणार्थांचा प्रकाश करून (टीकाकरून) सोमशब्दवाच्य वायुदेवानें "श्रीमध्वावतार" घेतलेवेळीं उपदेशिलें आहे. तसेंच जडात्मक जलांत भुवन मंगलकारक जगत्प्रवर्तक अग्निश-

पापपुरुषविसर्जने विनियोगः ॐ ऋतंच सत्यं चाभिद्धात्तप सोध्यंजायत । ततोरात्र्यंजायत ततः समुद्रो अर्णवः ॥ समुद्रादर्णवादधिंसंवत्सरो अजायत । अहोरात्राणि विद्धद्विश्वस्य मिषतो वशी ॥ सूर्याचंद्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत् । दिवंच पृथिवीं चांतरिक्ष मथो स्वः ॥

---

ब्दवाच्य श्रीनारायण आहे. असाही उपदेश केला आहे. हे श्रीनारायणा! तुझ्याठायीं सर्व औषधें आहेत. आणि शरीरांत अतिगुप्त प्रकाशमय ज्ञानिप्राप्य सूर्य शब्दवाच्य परमात्म्यास जाणण्याकरितां औषधाचा विचार करा, ह्मणून “श्रीमद्भगवद्गीतादि वाक्यांनीं सांगितलें आहे. हे आपशब्दवाच्य श्रीहरे! माझ्या देहांत हरिभक्त द्वेषकेल्यानें, अथवा निष्कारण अवाच्य शब्द उच्चारनिमित्तकं, आणि असत्य भाषण केल्यानें जें कांहीं पाप असेल तें या मार्जन जलवर्षणानें दूर कर. हे नारायणा! आज म्यां तुला जाणला आहे करितां तुझ्या आनंद रसोद्रेकानें स्वयोग्यता तारतम्यानुसार मलाही आनंदपूरीत कर. हे जलांतर्गत पयःशब्दवाच्य जगन्नियामक अग्नि शब्दवाच्य परमात्मन्! या मार्जनसमयीं तूं ये. आणि तुझ्या तेजानें मला योग्यतेनुरूप तेजपूरित कर. त्या नारायणांमध्यें असणारा, ह्मणजे आनंद रस वर्षण करणारा, प्रतिदिवस प्रतिरात्र जगन्नियामक अशा हे श्रीदेवीशब्दवाच्य परमात्मन्! जो मी भजनरूपयाग करणारा अशा माझ्या रक्षणाकरितां तुला आव्हान करितों. याप्रमाणें मार्जनक्रम झाल्यानंतर “ॐभद्रन्नो अपिवातय मनः।” या मंत्रानें मनोभिमानी रुद्रदेवाची प्रार्थना करावी. ती असी, हे मनोभिमानी रुद्रदेवा! आह्मास भद्र ह्म० सर्वदा श्रीहरिविषयक सद्धर्माचरणरूप मंगल प्राप्तहोयील तसें कर. असा हा मंत्र तीन वार पठण करून आपल्या सभोंवती प्रदक्षिणा करवी. तीनदां पाणी हातांत घेऊन टाकावें.

## आतां पापपुरुष विसर्जनक्रम सांगतों.

तो असा, उजवें हस्ततल गोकर्णाकृति ( गाईच्या कानाप्रमाणें ) करून त्यांत किंचित् उदक घेऊन नासाग्रपरिमित हात उचलून “ऋतंच सत्यं०” या मंत्रानें अभिमंत्रित करून कृष्णवर्ण व भयंकराकृति अशा पापपुरुषाचें स्मरण करून आपल्या डाव्याबाजूच्या जागेवर तें पाणीं न पाहतां टाकावें.

तज्जलं वामतो विसृज्य । आचम्य प्राणानायम्य ॥ देशकालौ संकीर्त्य श्रीविष्णुप्रेर० श्रीविष्णुप्रीत्यर्थं प्रातःसंध्यार्घ्यप्रदानं करिष्ये ॥ गायत्र्या गाथिनो विश्वामित्रऋषिः । सवितादेवता । गायत्रीच्छंदः प्रातःकाल सूर्यायार्घ्यप्रदाने विनियोगः ॥ ॐ भूर्भुवःस्वः तत्सवितुर्वरेण्यं भर्गो-

---

## आतां मंत्रार्थ.

अत्यंत प्रकाशमान मूलरूपी अशा श्रीनारायणाच्या तपोरूप ध्यानानें नंतर, त्या नारायणाचें निर्विकार असें श्रीवासुदेवस्वरूप प्रकट झालें. तदनंतर मायादेवी-शब्दवाच्य श्रीलक्ष्मीही प्रकट झाली. त्या वासुदेवनामक श्रीपरमात्म्यापासून अतिसुख युक्त समुद्रनामक चतुर्मुख ब्रह्मदेवाचें शरीर उत्पन्न झालें. त्या समुद्रनामक महत्त-त्त्वांत संवत्सर शब्दवाच्य चतुर्मुख ब्रह्मदेव उत्पन्न झाला. अथवा, त्या श्रीवासु-देवापासून जलसमूहरूप समुद्र झाला. त्यांत समुद्रनामक ब्रह्मदेव झाला. असेंही ह्मणता येईल. त्यानंतर दिवस रात्र्यभिमानी सर्व तात्विक देवता झाल्या. पूर्व ब्रह्मांडकल्पांतील सृष्टिप्रमाणें अनित्य प्रपंचकारणीभूत श्रीविष्णूनें सूर्य चंद्रादिदेव आणि इतर देव, मानव, अंतरिक्षादि लोकही सुखयुक्त असे अनायासानेंच उत्पन्न केले. याप्रमाणें पापपुरुषविसर्जन मंत्रार्थ सांगून पुढें

## अर्घ्यप्रदानक्रम सांगतों.

आतां पूर्ववत् आचमन प्राणायाम संकल्प करून श्रीसूर्यांतर्गत सवितृनामक श्रीलक्ष्मीपाति नारायणाच्या प्रेरणेनें श्रीलक्ष्मीनारायणाची प्रीतीहोण्याकरितां प्रातःकालीन संध्येचें अर्घ्यदान करितों.

असें ह्मणून उजव्या हातांत श्रीविष्ण्वर्पित तुलसीदल घेऊन पाणी सोडावें.

## अर्घ्यप्रदान सांगतों.

" संध्याकाले तु संप्राप्ते घोरे परमदारुणे ॥ मंदेहा राक्षसा घोराः सूर्य मिच्छंति खादितुं ॥ प्रजापतिकृतः शापस्तेषामैरेयरक्षसां ॥ अक्षयत्वं शरीराणां मरणंच दिनेदिने ॥ ततः सूर्यस्य तैर्युद्धं भवत्येव सुदारुणं॥ ततो द्विजोत्तमस्तोयं प्रक्षिपेत महामुने ॥ ॐकारब्रह्मसंयुक्तं गायत्र्या चाभिमंत्रितं ॥ तेन दह्यंति ते पापा वज्रीभूतेन वारिणा ॥ अग्निहोत्रे

देवस्य धीमहि ॥ धियोयोनः प्रचोदयात् ॐ ॥ प्रातः-काल–सवितृमंडलमध्यवर्ती– श्रीसूर्यांतर्गतश्रीलक्ष्मीनारायणाय इदमर्घ्यं दत्तं नमम ॥ प्रतिचक्ष्वविचक्ष्वेंद्रश्च सोमजागृतं ॥ रक्षोभ्योवधमस्यतमशनिं यातुमद्भ्यः ॥ इतिपठित्वार्घ्यत्रयं दद्यात् ॥ ३ ॥ प्रायश्चित्तार्घ्यं ॥ शिरोव्याहृतियुता गायत्रीमुच्चार्य यदद्यकच्चवृत्रहन्नित्यस्य मंत्रस्य सुरक्षऋषिः सूर्यो देवता तृष्टुपूच्छंदः प्रातःसंध्या वंदनकालातिक्रमणदोषपरिहारार्थे प्रायश्चित्तार्घ्यप्रदाने

---

हूयते वा समंत्रा प्रथमाहुतिः ॥ सूर्यज्योतिस्सहस्रांशुस्तया चोदेति भास्करः ॥ ततः प्रयाति भगवान्ब्राह्मणैरभिरक्षितः ॥ वालखिल्यादिभिश्चैव जगतः पालनोद्यतः " ॥

**अर्थ**–परम कठीण, भयंकर संध्याकाल प्राप्त झाला असतां, घोर असे मंदेहनामक राक्षस सूर्यास भक्षण करण्यास इच्छितात, त्या ऐरेय कुलोद्भव राक्षसांस ब्रह्मदेवाचा शाप असा आहे कीं, त्यांचीं शरीरें अक्षय असुनही प्रति दिवस त्यानां मरण प्राप्त व्हावें, हे मुनिश्रेष्ठा ? त्यानंतर त्या सूर्याला त्या राक्षसाशीं परम कठीण असें युद्ध होतें, करितां ब्राह्मण श्रेष्ठानें अर्घ्यदानरूप उदक प्रक्षेपण करावें तें अर्घ्योदक ॐकाररूप मंत्रानें आणि गायत्रीनें अभिमंत्रित असावें, तें उदक वज्रतुल्य होऊन तेणेंकरून ते पापिष्ठ नष्ट होतात. अग्निहोत्रांत जी समंत्रक आहुती देतात, तिणेंही दैदीप्यमान सहस्रांशु सूर्य, उदयास येतो. भूलोकस्थ ब्राह्मणांनीं आणि सूर्यमंडलस्थ वालखिल्यादि ऋषीनीं अर्घ्यदानानें रक्षित होत्साता सूर्यदेव जगत्पालनाविषयीं उद्युक्त होऊन मेरूपर्वतासभोंवतीं प्रदक्षिणाकारानें फिरतो आहे, आतां वेत्रपनामक जो असुर आहे त्याच्या निवारणार्थ गायत्रीयंत्रक्रम दाखवून तें यंत्रही दाखविलें जातें.

"त्रिकोणं दीर्घरम्यंच देवानां सिद्धिदायकं ॥ कोणमध्येच ऱ्हीकारं कोणाग्रे प्रणवं न्यसेत् ॥ दंडेषु व्याहृतिंचैव मध्ये वरुणबीजकं ॥ कनिष्ठाग्रेण वै तत्र उल्लिखेत्तु यथाक्रमं ॥ लिखित्वा मंत्रराजंतु पश्चादर्घ्यं समाचरेत् "

**विनियोगः ॥ यद्द्यकच्चवृत्रहंनुदगाअभिसूर्य ॥ सर्वंतादिंद्रतेवशें प्रातःकालसवितृमंडल० दत्तं नमम ॥ इति चतुर्थार्घ्यं दद्यात् ॥**

---

अर्थ–देवतासिद्धिदायक असें हें गायत्रीयंत्र त्रिकोण दीर्घ असून सुशोभित असावें. कोण मध्याच्याठाईं ह्रीं अग्रभागीं ॐ दंडरूप रेषेच्याठाई व्याहृतिमंत्र ( भूर्भुवः स्वः ) आणि मध्यें वरूण बीजाक्षर वं एवं ह्रीं अक्षरें उदकांत कनिष्ठांगुलीच्या अग्रानें लेखन करून नंतर मंत्रराज ( ॐनमोनारायणाय ॐ ) लिहून त्यानंतर त्या जलानें अर्घ्य द्यावें.

( लिखितयंत्रं )




**दैत्यानांच वधार्थाय गायत्र्या अभिमंत्रयेत् ॥ एकं वाहननाशाय द्वितीयं शस्त्रनाशने ॥ राक्षसानां वधायैकं दद्यादर्घ्यत्रयं बुधः ॥**

अर्थ–गायत्रीनें अभिमंत्रीत तीन अर्घ्यें द्यावीत. त्यांतून एक तें, दैत्यांच्या नाशाकारणें, व दुसरें दैत्यांच्या शस्त्रनाशार्थ, आणि तिसरें राक्षसांच्या वधाकारितां जाणावें. हा यंत्रक्रम क्वचित् कृताकृत आहे.

## आतां अर्घ्यप्रधानक्रम दाखवितो.

**" द्वौ हस्तौ युग्मतः कृत्वा पूरयेदुदकांजलिं ॥ गोशृंगमात्रमुधृत्य रविं वीक्ष्य जलांजलिं ॥ द्वौ पादौ च समौ कृत्वा पाणिमुत्धृत्य निक्षिपेत् ॥ जप्त्वार्घ्यंच प्रदातव्यं जलाभावे शुचिस्थलं ॥ संप्रोक्ष्य वारिणा सम्यक् ततोऽर्घ्यानि प्रदापयेत् ॥ अप्सु क्षिपेदर्कमुखो माध्यान्हे चोत्तरामुखः ॥ तिष्ठन्नर्घ्यत्रयं दद्यात्रिषु कालेषु बह्वृचः " ॥**

अर्थ–दोनी हातानीं अंजलीपुट करून उदकानें पूरित करावें, आणि उभा राहून भ्रू मध्यप्रदेशपर्यंत हस्त उचलून सूर्याला पाहून दोन्ही पाद सम करून एकत्र ठेवून मंत्र जप पूर्वक जलांत अर्घ्य द्यावें. जल नसेल तर शुद्धस्थल उदकानें चांगल्या रीतीनें प्रोक्षण करून त्यावर द्यावें. प्रातःकाली पूर्वाभिमुख, व मध्यान्हीं उत्तराभिमुख, राहून तीनहीं संध्याकाळीं उभा राहून अर्घ्यदान करावें. एवं गायत्री मंत्रानें तीन अर्घ्यें देऊन प्रति अर्घ्यप्रदान झाल्याबरोबर पुनरर्घ्याधिकारार्थ व आपल्या संरक्षणाकरितांही " प्रतिचक्ष्व० " ही ऋचा पठन करावी. त्या ऋचेचा अर्थ–हे सर्वैश्वर्ययुक्त इंद्रशब्दवाच्य नारायणा सोमशब्दवाच्य चंद्रप्रकाशक या सूर्यास मंदेहनामक राक्षसापासून येणाऱ्या आपत्ति पुढें

**हृदि स्थिता तु गायत्री हृद्गुहाया बहिर्गता ॥ हत्वा चादित्यशत्रूंश्च प्रविश्य हृदये मम ॥ उत्तिष्ठोत्तिष्ठ गायत्रि पुनरागमनाय च ॥ उत्तिष्ठ देवि स्थातव्यं प्रविश्य हृदये मम ॥ इतिसंप्रार्थ्य ॥ असावादित्योब्रह्म । इति मंत्रं सजलपाणिः प्रदक्षिणं परिभ्रमन् पठित्वा ॥ शुक्लपक्षे**

---

राहून पाहून या गायत्री जपानें मंत्रित जलक्षेपण केले यावरून वज्रायुधवत् तें जल तीक्ष्ण होऊन आह्मांस आपत्तीस मुख्य कारणीभूत मंदेहसुरांचा त्रास न होय तसें कर. असी प्रार्थना करावी. असी तीनं अर्घ्यें दिल्यानंतर, संध्याकालातिक्रम दोषपरिहारार्थ " शिरोभागसहित ( ॐमापोज्योति रसोऽमृतं ब्रह्मभूर्भुवः स्वरोम् ) यासह गायत्री मंत्र जपून " **यदद्यकच्चवृत्रहन्०** " ही ऋचा पठण करून पूर्ववत् अर्घ्य देणें. त्याऋचेचा **अर्थ**—हे वृत्रासुर संहारक इंद्रांतर्यामि उपेंद्रा ! तथा परमैश्वर्यसंपन्न, सुरि ( ज्ञानि ) प्राप्य गायत्री प्रतिपाद्य हे श्रीलक्ष्मी नारायणा ! आज मी कांहीं अल्प किंवा बहु, केलेलें जें कर्म तें सफल करण्यास उदय झालास. तें सर्व तुझ्या अधीन आहे. त्यावरून कालातिक्रमण निमित्तक पापकर्मही तुझ्या अधीन आहे. करितां आमचें हें कालावलंबी पाप दूर होइल, तसें करण्यास तूं समर्थ आहेस.

**आतां वक्ष्यमाण श्लोकानें गायत्रीची उपासना करावी.**

" **हृदि स्थिता तु गायत्री हृद्गुहायाः बहिर्गता ॥ हत्वाचादित्यशत्रूंश्च प्रविश्य हृदये मम ॥ उत्तिष्ठोत्तिष्ठ गायत्रि पुनरागमनाय च ॥ उत्तिष्ठ देवि स्थातव्यं प्रविश्य हृदये मम** " ॥

**अर्थ**- हृदयांत विद्यमान हे गायत्री शब्दवाच्य परमात्मा हो, हृद्गुहेपासून मंत्रजपद्वारा मुखांतून बाहेर येऊन सूर्य शत्रु, भूत असुरांचा वध करून पुनः स्वहृदयांत प्रवेश करून रहावें, असी प्रार्थना करून उजव्या हातीं पाणी घेवून " **असावादित्यो ब्रह्म** " हा मंत्रभाग उच्चार करून तें जल आत्मप्रदक्षिणेनें टांकतां यावें. ( **मंत्रभागार्थ** ) हा अदितिपुत्र सूर्यांतर्गत विश्वव्यापी अनंतगुण परिपूर्ण श्रीविष्णु असा आहे. शुक्लपक्षांत **ॐश्रीकेशवायनमः** केशवं तर्पयामीत्यादि द्वादश नामानीं, आणि कृष्णपक्षांत **संकर्षणादि** द्वादशनामानीं, तर्पण करावें. नंतर द्विराचमन करून देव निर्माल्य विसर्जनकरावे. मग अभिषिक्त तीर्थानें मुख्य

**ॐ श्रीकेशवायनमः केशवं तर्पयामीति दामोदरांतद्वादश नामभिः कृष्णपक्षे ॐ श्रीसंकर्षणायनमः संकर्षणं तर्पयामीत्यादिरीत्या श्रीकृष्णांतद्वादशनामभिः विष्णुं तर्पयित्वा ॥ द्विराचम्य ॥ ततो देवनिर्माल्यं विसृज्य मुख्यप्राणादीन्संपूज्य तत्तीर्थेन ब्रह्मयज्ञं कृत्वा ॥ आचम्य प्राणानायम्य देशकालौ संकीर्त्य श्रीविष्णु० श्रीविष्णुप्री० गायत्रीमहामंत्रजपाख्यं कर्म करिष्ये ॥ तदंगत्वेन न्यास ध्यानं करिष्ये**

---

प्राणादिकांचे तीर्थ गंधनिर्माल्यांहीं अभिषेक पूजा करून अवशिष्ट तीर्थानें प्रातःकालीं ब्रह्मयज्ञ स्वाध्याय देव ऋषी आचार्य पितृयज्ञ केल्यानंतर पुनराचमन पूर्वक आसन प्राणायाम, तत्वन्यास, मातृकान्यास, वर्णन्यास, पंचांगन्यास, इत्यादि मंत्रपद्धति, स्मृत्यर्थसागर, स्मृतिकौस्तुभ, कृष्णाचार्यस्मृति, तंत्रसार, कर्मसिद्धांत इत्यादि ग्रंथोक्तरीतीनें करावेत.

### आतां जप करतेवेळीं आसन विचार.

" धरण्यां दुःखसंभूतिर्दौर्भाग्यं दारुकासने ॥
केशासने तु दारिद्र्यं पल्लवे चित्तविभ्रमः " ॥

अर्थ—केवल पृथ्वीवर बसल्यास दुःख उत्पन्न होतें, काष्ठासनीं दुर्भगत्व, केशानीं रचलेल्या आसनीं दारिद्य, पल्लव ( फांद्यानि रचित ) आसनीं चित्त चांचल्य होतें,

" तृणासने यशोहानिः पत्रपीठे न शोभनं ॥
भस्मासने व्याधिनाशः पाषाणे व्याधिसंभवः " ॥

अर्थ—तृणासनीं कीर्तिनाश, पत्रासनीं अशुभ, भस्मासनीं, व्याधिनाश, पाषाणकृत आसनीं व्याधींची उत्पत्ति होते.

" पुष्पासने दुःखनाशः कंबले दुःखमोचनं ॥
कृष्णाजिने ब्रह्मवृद्धिः आयुः प्रज्ञायशोबलं " ॥

अर्थ—पुष्पमय आसनीं दुःखनाश, ऊर्णवस्त्र सकलात वगैरे यांच्या आसनीं दुःख राहित्य, कृष्णाजिनासनीं वेदादि अध्ययन, तप, आयुष्य, कीर्ति, बल, इ-

त्यादि प्राप्त होतें, याकरितां कृष्णाजिनासनाशिवाय इतर आसनापासून क्षणिक फल प्राप्त होतें, ह्मणून तत्व वेत्त्यांनीं विशेषेंकरून कृष्णाजिनासनाचाच उपयोग करावा ह्मणजे त्यांत सर्व आसनांचा समावेश होतो असें फलश्रुतीनें उघड केलेंच आहे.

## आतां स्थान माहात्म्यानें जपफल सांगतों.

" गृहे तावज्जपात्प्रोक्तं गोष्ठे शतगुणं भवेत् ॥
सहस्रं पुण्यतीर्थेषु अनंतं विष्णुसंन्निधौ " ॥

अर्थ–गृहांत जप केल्यास तदुक्त फल मात्र मिळतें, त्याहून शतपट धेनुसंन्निधीं गोष्ठांत, त्यापासून सहस्रगुण अधिक फल पावित्र अशा गंगा, यमुना, सरस्वती, गोदावरी, नर्मदा, कृष्णा, कुशावती, शरयू, तुंगा, त्रिवेणी, प्रयाग, प्रभासकोटितीर्थ, कापिलतीर्थ, विष्णुतीर्थ, रामतीर्थ इत्यादि तीर्थसंन्निधीं, मिळते. त्यांहून अनंत, फल श्रीविष्णुप्रतिमा, व शालग्रामसंन्निधीं केल्यास प्राप्त होतें,

देवस्य पूर्वदिग्भागे जपादायुष्यवर्धनं ॥ पावके कलहं कुर्याद्दक्षिणे ज्ञानवर्धनं ॥ राक्षसे मरणं कुर्यात्पश्चिमे मोक्षदायकं ॥ आकर्षणं स्याद्वायव्ये उत्तरे श्रीप्रदायकं ॥ उच्चाटनकरं त्वीशे मध्यमे चार्थसिद्धिदं ॥ देवाग्रे सर्वसिद्धिःस्यान्नात्र कार्या विचारणा " ॥

अर्थ–देवाच्या पूर्व दिशेवर जप केल्यानें आयुष्यवृद्धि, आग्नेयदिशीं कलह, दक्षिणदिशेष ज्ञानवृद्धि, नैऋत्यदिशीं मरण, पश्चिमदिशेवर मोक्ष, वायव्यदिशेवर वशीकरण, उत्तरेवर संपत्तिदायक, ईशान्यदिशेवर उच्चाटन, मध्यप्रदेशीं इच्छितार्थसिद्धि, देवाच्या समोर बसून जप केले असता सर्व सिद्धि होते, यांत संशय नाहीं.

" संध्याप्रदेशसंध्यायां संध्यां तत्र समापयेत् ॥
अन्यत्र तु जपं कुर्यात्सा संध्या निष्फला भवेत् " ॥

अर्थ–संध्याप्रदेशकालीं संध्या व जप करावे ह्मणजे ( संध्या केलेल्या जाग्यावर त्याच वेळीं करावे, ) अन्यस्थलीं जप केल्यास संध्या निष्फल होते,

" जलाशयं समारभ्य यावद्धस्तचतुष्टयं ॥
तावत्स्थानं नरक्षेत्रं मम क्षेत्राधिकं भवेत् " ॥

अर्थ–उत्तम जल असलेल्या जाग्यापासून चार हात पर्यंत असलेली जागा मनुष्याची असली तरी ती जागा देवक्षेत्र ह्मणून घेते. ( करितां नदींच्या व सरोवरांच्या कांठावर संध्या केल्यास श्रीविष्णुप्रतिमासंन्निधींत केल्यासारखें फल आहे हा आशय. )

## संध्या न केल्यानें नरकप्राप्ति, व ती प्रतिदिवस केल्यानें फल प्राप्ति सांगतों.

" योन्यत्र कुरुते यत्नं धर्मकार्ये द्विजोत्तमः ॥
विहाय संध्याप्रणतिं स याति नरकायुतं " ॥

**अर्थ**—जो द्विज श्रेष्ठ संध्यावंदन त्यागून यज्ञयागादि धर्म कृत्यांत रत होतो, तो, दाहा ( १० ) हजारवर्षपर्यंत नरकवासी होतो.

" यद्रात्र्यां कुरुते पापं कर्मणा मनसा गिरा ॥ तिष्ठन्वै पूर्वसंध्यायां प्राणायामैर्व्यपोहति ॥ यदन्हा कुरुते पापं कर्मणा मनसा गिरा ॥ आसीनः पश्चिमां संध्यां प्राणायामैर्व्यपोहति " ॥

**अर्थ**– रात्री केलेलें कायिक, मानसिक, वाचिक असे त्रिविध पाप तें प्रातःकालीन संध्येच्या प्राणायामानें नष्ट होतें, व दिवसा केलेलें कायिक, वाचिक, मानसिक पाप तें सायंकालीन प्राणायामानें नष्ट होतें.

## आतां जपशब्दार्थ तथा जपक्रमलक्षण सांगतों.

" जकारो जन्मविच्छेदः पकारः पापनाशनः ॥
तस्माज्जप इति प्रोक्तः जन्मपापविनाशतः " ॥

**अर्थ**—जकार हा संसारांतील पुनः पुनः जन्मराहित्य आणि पकार हा पापनाशन सांगतो अर्थात् जप केल्यानें संसारांतलि जननमरणरूप फेरे आणि तत्कालीन पापें निवृत्त होतात. तात्पर्य.

" ॐ कारं पूर्वमुच्चार्य भूर्भुवस्स्वस्तथैवच ॥
गायत्रीप्रणवश्चांते जपो ह्येष उदाहृतः " ॥

**अर्थ**—आधीं ॐ कार नंतर व्याहृति त्यानंतर गायत्री, अंतीं ॐ कार असा गायत्रीमंत्रजपक्रम आहे.

" प्रणवव्याहृतियुतां गायत्रीं च जपेत्ततः ॥ समाहितमनास्तूष्णीं मनसा चापि चिंतयेत् ॥ ध्यायेच्च मनसा मंत्रं जिन्हौष्ठौ नच चालयेत् ॥ न कंपयेच्छिरोग्रीवां दंतान्नैव प्रकाशयेत् " ॥

**अर्थ**—ॐकार व व्याहृतियुक्त गायत्री जप करावा. एकाग्र चित्तानें त्याचा अर्थ मनांत आणून मंत्रदेवता श्रीहरीचें ध्यान करावें. जिव्हा ओष्ठ, मस्तक, कंठ, हे हालवूं नये. तसेंच दांत बाहेर दाखऊं नये.

" कृत्वोत्तानौ करौ प्रातः सायं मुकुलितौ करौ ॥
मध्ये तिर्यक्करौ प्रोक्तौ जप एवमुदाहृतः " ॥

अर्थ–प्रात:संध्याकालीं उत्तान ( उलथा ) सायंकालीं मुकुलित ( कमलाच्या कळ्याप्रमाणें ) व मध्यान्हीं तिर्यक् ( वांकडा ) हातकरून जप करावा.

" विधियज्ञाज्जपयज्ञो विशिष्टो दशभिर्गुणैः ॥
उपांशुः स्याच्छतगुणः साहस्रो मानसः स्मृतः " ॥

अर्थ–विध्युक्त होम हवनादिकांपेक्षां जपयज्ञ हा दशगुण अधिक होय. उपांशु ( मौनव्रतानें ) केलेला जप शंभरपट अधीक व मनांत केलेला जप त्यापेक्षां सहस्रगुणाधिक असें सांगितलें आहे.

" विनाशब्दं जपो यस्तु चलज्जिव्हाद्विजच्छदः ॥
उपांशु तं जपं प्राहुर्मनसा मानसं बुधाः " ॥

अर्थ–शब्द न करितां जिव्हाग्र व दंतचलन पूर्वक केलेला जप उपांशु जप होय. व मनानें केलेला मानस जप, होय असा विद्वज्जनांचा आशय आहे.

पूर्वां संध्यां जपंस्तिष्ठेत्सावित्रीमार्कदर्शनात् ॥ पश्चिमां तां समासीन स्सम्यगृक्षविभावनात् ॥ तिष्ठंश्चेद्वीक्ष्यमाणोऽर्कं जपं कुर्यात्समाहितः ॥ असंख्यातोऽपवित्रश्च जपो निष्फलतामियात् " ॥

अर्थ–प्रात:कालीन संध्याकालीं सूर्यदर्शन होईपर्यंत गायत्रीजप करीत रहावें. सायंकालीन संध्येचे वेळीं बसून नक्षत्रोदय होईपर्यंत जप करावा. उभें राहून करणें असल्यास सूर्यास पहात करावा, न मोजतां व आपण अपवित्र असल्या वेळीं केलेला जप निष्फल होय.

" पर्वभिर्गणयेत्संख्यां नाक्षमालादिभिर्नृप ॥
गायत्र्या वेदमूलत्वाद्वेदः पर्वसु गीयते " ॥

अर्थ–उजव्या हस्तांगुलीच्या ग्रंथींनीं मोजून गायत्रीजप करावा. पद्माक्षमाला, तुलसीमाला इत्यादिकांनीं मोजीत हा जप करूं नये. गायत्री वेदसारभूत होय.तो वेद ब्राह्मणाच्या उजव्या हाताच्या अंगुलीच्या संधीवर संनिहित असतो.

" आरभ्यानामिकामध्यपर्वप्रादक्षिणक्रमात् ॥ तर्जनीमूलपर्यंतं संख्यायन् त्रिपदीं जपेत् ॥ मध्यपर्वद्वये मेरुस्तं मेरुं नातिलंघयेत् ॥ व्यस्तपादां तु गायत्रीं यो जपेत्सहरिस्स्मृतः " ॥

अर्थ–अनामिकांगुलीच्या मध्यग्रंथीस आरंभ करून प्रदक्षिण क्रमानें तर्जनीच्या मूलापर्यंत संख्या करून (मोजीत) गायत्रीमंत्र जप करावा. मध्यमांगुलीच्या खालच्या दोन ग्रंथी [ पर्वें ] मेरूरूप ( जपमालेस असलेल्या मेरूप्रमाणें ) आहेत. याकरितां त्याचा अतिक्रम करूं नये. निरनिराळे चरणपठण करून जो ब्राह्मण

ॐ अस्य श्रीगायत्रीमहामंत्रस्य ब्रह्मा ऋषिः शिरसि दैवीगायत्रीच्छंदः मुखे श्रीलक्ष्मीनारायणो देवता हृदये न्यासेविनियोगः ॥ ॐ भूः पद्भ्यां नमः । ॐ भुवः जानुभ्यां नमः ॥ ॐ स्वः कटिभ्यां नमः॥ ॐ महः नाभये नमः ॥ ॐ जनः हृदयाय नमः ॐ तपः कंठाय नमः ॥ ॐ सत्यं ललाटाय नमः ॥ ॐ भूर्भुवःस्वः शिरसे स्वाहा ॥ ॐ तत्सवितुः हृदयाय नमः ॥ वरेण्यं शिरसे स्वाहा ॥ भर्गोदेवस्य शिखायै वषट् ॥ धीमहि कवचाय हुं ॥ धियो यो नः नेत्राभ्यां वौषट् ॥ प्रचोदयात् अस्त्राय फट् ॥ ॐ आपः हृदयाय नमः ॥ ज्योतिः शिरसे स्वाहा ॥ रसः शिखायै वषट् ॥ अमृतं कवचाय हुं ॥ ब्रह्म नेत्राभ्यां वौषट् ॥ भूर्भुवःस्वरोम् अस्त्राय फट् अथांगुलिन्यासाः ॥ ॐ तत्सवितुरंगुष्ठाभ्यां नमः ॥ वरेण्यं तर्जनीभ्यां नमः ॥ भर्गोदेवस्य मध्यमाभ्यां नमः धीमहि अनामिकाभ्यां नमः ॥ धियोयोनः कनिष्ठिकाभ्यां नमः ॥ प्रचोदयात् करतलकरपृष्ठाभ्यां नमः ॥ अथ ध्यानं ॥ ध्येयः सदा सवितृमंडलमध्यवर्ती नारायणः सरसिजासनसंनिविष्टः ॥ केयूरवान्मकरकुंडलवान् किरीटी हारी हिरण्मयवपुर्धृतशंखचक्रः ॥ श्रीविष्णुप्रेरणया श्रीविष्णुप्रीत्यर्थं यथाशक्ति गायत्रीमंत्रजपं करिष्ये ॥

---

गायत्रीजप करितो तो हरीचे सान्निध्य पावतो. अथवा श्रीहरीप्रमाणें मुक्तींत जननमरणादि क्लेशरहित होतो. किंवा स्वदर्शन स्पर्शनानें आपल्याहून कनिष्ठ लोकांचें पाप अपहरण करणारा असा होतो.

" अष्टोत्तरसहस्रं वा शतमष्टोत्तरंतु वा ॥

अष्टाविंशद्दशान्यूनं जपेत्तामन्यथा पतेत् " ॥

**अर्थ**—अष्टाधिक एक सहस्र ( १००८ ) परिमित जप करणें उत्तम. व अष्टोत्तरशतमित ( १०८ ) करणें मध्यम, आणि अष्टाविंशति ( २८ ) मित करणें तें कनिष्ठ, त्यांतून कमींतकमी दशवार ( १० ) तरी गायत्रीजप करावा. अन्यथा ( न केल्यास ) ब्राह्मण्यापासून च्युत ( भ्रष्ट ) होतो.

" गायत्र्यास्त्रिगुणं विष्णुं ध्यायन्नष्टाक्षरं जपेत् " ॥

**अर्थ**—अष्टाक्षर " नारायण " मंत्र जप करणाऱ्यांनीं गायत्री जपापेक्षां त्रिगुण ( तिप्पट ) अष्टाक्षरमंत्रजप करावा. संन्यासी यांनां तीनसहस्रापेक्षां अधीक प्रणव ( ॐ ) मंत्राचा प्रतिदिवशीं जप करावा लागतो हा उत्तमपक्ष होय. ह्यानंतर यथानुकूल गायत्री आणि अवशिष्ट अष्टौमहामंत्राचा जप करावा.

" ॐकारः पुरुषाकारो गायत्री स्त्रीस्वरूपिणी ॥
तयोः संयोगकाले तु वस्त्रमाच्छाद्य वै जपेत् " ॥

**अर्थ**—ॐकारप्रतिपाद्य श्रीहरिमूर्ति पुरुषाकार होय. आणि गायत्रीप्रतिपाद्य भगवन्मूर्ति ही स्त्री स्वरूपी होय. हा जप तत्संयोगरूप असल्यानें कृष्णाजिन, अथवा ऊर्णवस्त्राची गोमुखीकरून तींत हात घालून जप करावा.

## आतां न्यास व ध्यानाचें फळ सांगतों.

**"अंगन्यासं तथा ध्यानं सम्यगेव समभ्यसेत् ॥ न्यासहीने हरेदायुर्ध्यानहीने तु निष्फलं ॥ ऋषिहीने महाव्याधिर्भवत्येव न संशयः ॥ तस्माद्देवर्षिछंदांसि ज्ञातव्यानि महर्षिभिः " ॥**

**अर्थ**—जप करिते वेळीं तत्तन्मंत्राक्षरांनीं न्यास आणि मंत्र प्रतिपादितदेवतेचें ध्यान अवश्य केलें पाहिजे. न्यास न करितां जप केल्यास आयुष्यहानि होते. आणि ध्यानरहित केल्यास निष्फल, ऋषिध्यान ( तत्तन्मंत्रांचें ) नसल्यास महाव्याधि उत्पन्न होतो. करितां जपकालीं न्यास ध्यान करून देवऋषिच्छंद अवश्य जाणले पाहिजेत. न्यास वर लिहिल्या प्रमाणें करावा.

## आतां ध्यान प्रकार सांगतों.

**" प्रोद्यदादित्यवर्णश्च सूर्यमंडलमध्यगः ॥
चक्रशंखधरोंकस्थवोर्द्वयो ध्येय एव च " ॥**

**अर्थ**—सूर्यमंडळांत असणारा सूर्यनामकदेवांत प्रेरकत्वानें असणारा सूर्यशब्दवाच्य, व कमळासनीं उपविष्ट, भुजांवर भूषणयुक्त, कर्णालंकारमंडित, तथा-

॥ मंत्रः ॐ भूर्भुवःस्वः ॐ तत्स वितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि धियोयोनः प्रचोदयात ॐ एवंरीत्या प्रणवसहितां सव्याहृतिकां गायत्रीं जप्त्वा १०००, १०८, १० वा यथाशक्ति जपेत् ॥ तर्पणंतु तद्दशांशेन कुर्यात् ॥ तत्तु गायत्रीमंत्रं पठित्वा सूर्यांतर्गतसवितृनामकश्रीलक्ष्मीनारायणं तर्पयामि गायत्रीं तर्पयामि ऋग्वेदं तर्पयामि ॥ इति तर्पयित्वा ॥ पुनःपूर्ववत् प्राणायामन्यासध्यानांतं कृत्वा ॥ कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् ॥ करोमि यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयेत्तत् ॥ अनेन प्रातःसंध्यावंदनांगगायत्रीजपाराधनेन भगवान् तेन श्रीप्रवर्तमान मासदेवतात्मा श्रीलक्ष्मी नारायणः प्रीयतां प्रीतो भवतु तत्सच्छ्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

शिरोभूषणभूत मुकुटयुक्त, कंठीं वैजयंती व कौस्तुभ इत्यादि धारण केलेला, सुवर्णात्मकदेह, शंखचक्रगदाधारी, असा श्रीनारायण गायत्री मंत्रानें ध्येय ( ध्यान करण्यास योग्य ) अथवा उदयमान सूर्याप्रमाणें वर्णनीय, सूर्यांतर्यामी, व चक्रशंखधारी दोन हस्त मांडीवर ठेवलेला, असा ध्यान करण्यास योग्य होय.

**आतां गायत्रीप्रतिपाद्य श्रीपरमात्म्याचें आव्हान ( आमंत्रण ) सांगतों.**

" आगच्छ वरदे देवि जपे मे सन्निधौ भव ॥
गायंतं त्रायते यस्माद्गायत्री त्वं ततः स्मृतः ॥ "

अर्थ—जो भक्तांस वरदान देणारा व क्रीडादिगुणविशिष्ट अशा हे देवीशब्दवाच्य श्रीहरे ! जे तुझे गुण जाणून गातात, तूं त्यांचा रक्षक आहेस, यावरून तुला गायत्री असें म्हणतात. करितां जपकालीं तुझ्या सान्निध्यानें माझें रक्षण होवो. गायत्री मंत्र हा पांच अवसानांनीं युक्त असतो. तो असा ॐ भूर्भुवः स्वः ॥ ॐ तत्सवितुर्वरेण्यं ॥ भर्गोदेवस्यधीमहि ॥ धियोयोनः ॥ प्रचोदयात् ॥

## गायत्री अर्थविचार.

गायत्री मंत्रानें स्तवन करण्याची देवता श्रीविष्णु होय. सूर्य ह्मणून जो लोकप्रवाद असतो तो बरोबर नाहीं. कारण अर्घ्यप्रदानकालीं गायत्रीमंत्रानें ह्मणजे विष्णूच्या प्रार्थनेनें तें जल मंत्रित करून सूर्य रक्षणार्थ विष्ण्वर्पण करावें आणि

" भानुर्हंसः सहस्रांशुस्तपनः सविता रविः " ॥

या अमरसिंहोक्ति प्रसिद्धीनेंही सवितृ शब्द हा सूर्यवाचक असून तो शब्द सवितुः या पदानें गायत्री मंत्रांत असल्यानें सूर्य गायत्री प्रतिपाद्य कां ह्मणूं नये ? असा कदाचित् आक्षेप येण्याचा संभव आहे. तर ऋग्वेदमंडल सप्तम, अष्टम, पंचम अध्याय चवथा, सुक्त पंचेचाळिसावें, वर्ग बारावा, ऋचा दुसरी

उदंस्यबाहूशिथिराबृहंताहिरण्ययादिवोऽअंतांऽअनष्टां १ नूनं सोऽअं स्यमहिमापंनिष्टुसूरंश्चिदस्माऽनुंदादपस्यां " ॥

या ऋचेनें सूर्यास अवरत्व ( कनिष्ठत्व ) सांगीतलें आहे, आणि सवितृशब्दवाच्य असल्यानें गायत्रीमंत्रात सूर्य प्रतिपाद्य झाल्यास ध्यान श्लोकांत श्रीविष्णूचें ध्यान नसायला पाहिजे होतें, यावरून श्रीविष्णू गायत्री प्रतिपाद्य होय, " भूर्भुवस्वः " या पदानें लोक प्रकाशकत्व सांगीतल्यानें हें सूर्य चिन्ह असल्यावरून सूर्यास आणि ध्यानांत श्रीविष्णू असें सांगीतल्यावरून सूर्य व विष्णु अभिन्न कां ह्मणूं नये असा अर्थ केल्यास ही क्लिष्ट कल्पना होऊन ध्यानांतील " सवितृमंडलमध्यवर्ती नारायणः" या वाक्यानीं सूर्यमंडलांत श्रीनारायण आहे अशा सांगीतलेल्या अर्थास बाध येतो. अद्वैतरीत्या ते दोघेहीं एकच असल्यास आंत आहे असें ह्मणण्याचें कारण नव्हतें, गृहांत असलेला मनुष्य गृहानें, काष्ठांत असलेला अग्नी काष्ठानें, आकाशांत असलेला वायू आकाशानें, जलांत असलेला मच्छ जलानें, देहांत असलेला जीव देहानें, घटांत असलेलें जल घटानें, पात्रांत असलेलें अन्न पात्रानें, अभिन्नहोण्याचा (एकच) संभव सर्वथा नसल्यावरून बद्ध, दुःखी, प्राकृत देहयुक्त सूर्यनामक जीवांत असलेला नित्य मुक्त, नित्यसुखी, चिदानंदात्मक अप्राकृतदेह श्रीनारायण त्या सूर्याशी कसा अभिन्न होईल? याकरितां सर्वांतर्यामी तो श्रीनारायण, आणि सूर्यादि उच्चनीच संपूर्ण जीव सदा संसारांत आणि मुक्तींत देखील भिन्नच आहेत; तसेंच श्रीविष्णु व मंडलाभिमानी सूर्य अशा दोन रूपानीं एकच श्रीविष्णु असता तर उक्त श्रीनारायणध्यानानें गायत्री ( मंत्रानें ) स्तवन केल्यानें सूर्यावर आलेलें असुरजन्य संकट जाण्यास कारण नाहीं, इतकेंच नव्हे तर, चतुर्मुख

ब्रह्मदेव उत्पन्न झाल्यावेळीं श्रीहरीनें त्या ब्रह्मदेवास उपदिष्ट गायत्री त्यानंतर बहुकालानें उत्पन्न झालेल्या सूर्याचे वर्णनास कसी प्रवृत्त होईल बरें? सूर्य व विष्णू एकच असल्यास सूर्यास आलेली आपात्ति विष्णूसहीं तीच आली असें ह्मणावें लागतें, मग तो आपद्ग्रस्त श्रीविष्णु सूर्यरक्षक होतो ह्मणणें समंजस होत नाहीं करितां गायत्रीशब्दवाच्य विष्णु हा सूर्य नव्हे. (ह्या विषयीं प्रमाण) **"गायत्री नामको विष्णुः"** यावरून गायत्री शब्दवाच्य श्रीविष्णूच होय, **"तं ब्रह्मेत्याचक्षते"** या श्रुतिनेंही श्रीविष्णूसच परब्रह्मत्व सांगितलें आहे, **"ॐअथातोब्रह्मजिज्ञासा-ॐ,ॐजन्माद्यस्ययतःॐ"** या सूत्रांनीं श्रीविष्णूस गायत्रींतील सवितृशब्दप्रतिपादित जगत्सृष्टयादि अलौकिक कार्यें विष्णुगुण प्रतिपादक आहेत असें सांगीतलें आहे. गायत्री सर्व वेद श्रेष्ठ झाल्यानें सर्व देव श्रेष्ठ श्रीविष्णुपरच होय **"अग्निर्वैदेवानामवमो विष्णुः परमः तदंतरेणान्याः सर्वा देवताः"** यांत सर्व देवांस हविर्भाग पोंहचविणारा अग्नि सर्व देवाहून कनिष्ठ; सर्वयज्ञभोक्ता श्रीहरी सर्व श्रेष्ठ, इतर सर्व देवता श्रीविष्णूहून कनिष्ठ व अग्नीहून वरिष्ठ जाणाव्यात, **एको नारायण-आसीन्नब्रह्मा नच शंकरः" "नेंद्रसूर्यौ न च गुहो" "नारायणात्सूर्यो जातः" "चक्षोः सूर्योऽजायत" "भीषोदेतिसूर्यः"** या सर्व श्रुतींत श्रीविष्णूस जगदादि कारणत्व आणि सूर्यास तज्जन्यत्व, तदवरत्व स्पष्ट सांगितल्यानें गायत्री शब्दवाच्य श्रीविष्णू हें निर्विवाद सिद्ध होतें. **"ॐच्छंदोभिधानांन्नेति चेन्नतथाचेतोर्पणानिगदात्तथाहिदर्शनंॐ"** या ब्रह्मसूत्रानुरूप तथा **"सर्वच्छंदोभिधोह्येषः सर्वदेवाभिदो ह्यसौ"** या वामनपुराणोक्तीनें हा गायत्रीशब्द विष्णुपरच होय, तात्पर्य, जीव नित्य असल्यानें तदीय स्वाभाविक चिदानंदादिगुण आविर्भूत होण्याकरितां श्रीहरिप्रसादाची अपेक्षा असते, तो एकाग्र सतत तच्चिंतनावांचून होत नसल्यानें, अस्वतंत्र जीवास सांगाचिंतन होण्याकरितां परमात्माश्रयकरणें उचित असल्यावरून **"धियोयोनःप्रचोदयात्"** यापदांनीं जो आमच्या बुद्धींस प्रेरणा करितो असें निखिलबुद्धिप्रेरकत्व त्या परमात्म्यास सांगून सवितृ शब्दानें संपूर्ण जगत्स्रष्टा झाल्यानें तो आह्मांस पित्याप्रमाणें हितकर्ता असें दाखविलें. तो जगतास सृष्टि, स्थिति, संहार, नियमन, ज्ञान, अज्ञान, बंध, मोक्ष, करणारा झाला तरी अनायासानें करितो ह्मणण्याचे क्रीडादिगुण विशिष्टत्व प्रतिपादक "देवस्थ" ह्या पदानें सांगितलें. तो परमात्मा वाणीला आणि मनाला विषय होत नसून प्रत्यक्ष, व अनुमानासही, अवेद्यस्वरूप झाल्यानें त्यांस जाणल्यावांचून कसें ध्यान करितां येईल? ही शंका **"भर्गः"** या पदानें

अथ प्रातःसंध्योपस्थानं तिष्ठन्नेव कुर्यात् ॥ जातवेदसइत्यस्य मारीचः कश्यपो दुर्गात्रिष्टुप् प्रातःसंध्योपस्थाने विनियोगः॥ॐ जातवेदसेसुनवामसोममरातीयतोनिदहातिवेदः॥ सनःपर्षदतिदुर्गाणिविश्वानावेवसिंधुंदुरितात्यग्निः ॥ तच्छंयोरिति मंत्रस्य शंयुर्विश्वेदेवाः शक्करीच्छंदः ॥ प्रातःसंध्योपस्थाने विनियोगः ॐ तच्छंयोरावृणीमहेगातुंयज्ञायगातुंयज्ञपतयेदैवीस्वस्तिरस्तुनः स्वस्तिर्मानुषेभ्यः ॥ ऊर्ध्वंजिगातुभेषजं ॥ शंनो अस्तु द्विपदे शंचतुष्पदे ॥

---

केवळ वेदप्रतिपाद्यत्व सांगून निरस्त केली. असा तो व्याहृतिप्रतिपादित गुणांनीं वरिष्ठ, पापनाशक गुणांनीं युक्त ह्मणण्याचें " वरेण्यं " या पदानें सांगून " धीमहि. " या पदानें ध्यान करूं या असें सांगितलें. श्रीमत्द्वैत सिद्धांत प्रतिष्ठापक श्रीमदाचार्य प्रकाशित या अर्थास अनुसरूनच "याज्ञवल्क्य" " भारद्वाज " मनुप्रभृतींच्या व्याख्या अवलोकन करणें. त्या सर्व येथें दाखविल्यास ग्रंथाधिक्य होईल ह्मणून उपरम केला आहे. याप्रमाणें गायत्री जप करून तद्दशांश तर्पणपूर्वक पुनः प्राणायाम, गायत्रीन्यास, ध्यान करून गायत्री जप कृष्णार्पण करावा. तें वर वर्णिल्याप्रमाणें तर्पण, गायत्रीमंत्रोच्चारपूर्वक सवितृनामक श्रीलक्ष्मीनारायणं तर्पयामि. तथा गायत्रीं तर्पयामि, ऋग्वेदं तर्पयामि असा उच्चार करून करावें.

## आतां प्रातःसंध्योपस्थान सांगतों.

तें संध्योपस्थान तिष्ठन्नेव ( राहूनच ) करावें. जो सकल वेदप्रतिपाद्य जगत्प्रवर्तक श्रीनारायण शत्रूंस भस्मीभूत करितो. नौकेनें समुद्र तरून गेल्याप्रमाणें दुःखकारणीभूत आपत्ती उपसागरांतून श्रीहरी आमचें सर्व पाप नाश करितो. असा समस्त वेद पुरुष श्रीनारायणाचे ठायीं आमचें मन अर्पण करीत आहों, यज्ञादि संपूर्ण कर्म सिद्ध होण्याकरितां यज्ञपति श्रीनारायणाचें स्तवन करण्याकरितां त्याच्या लीला मुखानें प्रतिपादण्याकरितां, व योग्य मोक्षप्राप्ती करितांही त्या नारायणास शरण जात आहों. आह्मांस व संपूर्ण लोकांसही कल्याण असो. संसारापासून उत्तीर्ण होण्याकरितां उत्कृष्ट औषधरूपी श्री नारायणाचा जयजयकार असो, संपूर्ण दोन पायांचें, व चार पायांचें प्राणी

नमो ब्रह्मणे प्रजापतीर्विश्वेदेवा जगती । प्रातःसंध्योपस्थाने विनियोगः ॐ नमो ब्रह्मणे नमो अस्त्वग्नये नमः पृथिव्यै नम ओषधीभ्यः । नमो वाचे नमो वाचस्पतये नमो विष्णवे महते करोमि ॥ ब्रह्मभूर्भुवःस्वरोम् शांतिः शांतिः शांतिः ॥ ॐ नमः प्राच्यै दिशे याश्चदेवता एतस्यां प्रतिवसंति एताभ्यश्च नमोनमः ॥ ॐ नमो दक्षिणायै दिशे याश्च देवताः एतस्या प्रतिवसंति एताभ्यश्च नमोनमः ॥ ॐ नमः प्रतीच्यै दिशे याश्च० नमः ॥ ॐ नम उदीच्यै दिशे याश्च० नमः ॥ ॐ नम ऊर्ध्वायै दिशे याश्च० नमः ॐ नम अधरायै दिशे याश्च० नमः ॐ नम अंतरिक्षायै दिशे याश्च० नमः ॥ संध्यायै नमः ॥ गायत्र्यै नमः ॥ सावित्र्यै नमः ॥ ॐ सरस्वत्यै नमः ॐ सर्वाभ्यो देवताभ्यो नमः ॐ गुरुभ्यो नमः ॐ ऋषिभ्यो नमः ॥ ॐ आचार्येभ्यो नमः ॥ ॐ मातृभ्यो नमः ॥ ॐ पितृभ्यो नमः ॥ कामोकार्षीन्मन्युरकार्षीन्नमोनमः ॥

---

( मानव पशु पक्षी इत्यादि सर्व प्राण्यांला ) वर्गास मंगल असो, सृष्टिकर्ता चतुर्मुखब्रह्मांतर्यामी हयग्रीव मूर्ति , व अग्न्यंतर्गत परशुराम मूर्ति, पृथिव्यंतर्गत वराह मूर्ति, औषध नियामक धन्वंतरि मूर्ति, भारत्यंतर्गत श्रीनारायण, वाय्वंतर्गत संकर्षण मूर्ति अशा अनेक रूपांनीं युक्त, महामहिमा विशिष्ट श्रीविष्णूकारणें नमस्कार असो. व पूर्वदिशेचा अधिपति जो इंद्रदेव, आणि तदधीन देवतांतर्यामी श्रीहरीकारणें नमस्कार असो. याप्रमाणें आग्नेय दिशाधिपति अग्नि व तदधीन देवतागण, व दक्षिण दिशाधिपति यम व तदधीन देवतागण आणि नैऋत्य दिशाधिपति निऋति व तदधीन देवतागण, तसेंच पश्चिम दिशाधिपति वरुण व तदधीन देवतागण, तथा वायव्य दिशाधिपति वायु व तदधीन देवतागण, तसाच उत्तर दिशाधिपति कुबेर व तदधीन देवता-

यां सदा सर्वभूतानि स्थावराणि चराणिच ॥
सायं प्रातर्नमस्यंति सा मा संध्याऽभिरक्षतु श्रीसामासंध्या-
भिरक्षत्वोंनमोनमः ॥ ब्रह्मण्यो देवकीपुत्रो ब्रह्मण्यो मधु-
सूदनः ॥ ब्रह्मण्यः पुंडरीकाक्षो ब्रह्मण्यो विष्णुरच्युतः ॥
नमो ब्रह्मण्यदेवाय गोब्राह्मणहिताय च ॥ जगद्धिताय
कृष्णाय गोविंदाय नमोनमः ॥ क्षीरेण स्नापिते देवि चं
दनेन विलेपिते ॥ बिल्वपत्रार्चिते देवि दुर्गेहं शरणागतः ॥
श्रीदुर्गेहं शरणागत ॐ नमोनमः ॥ उत्तमे शिखरे जाते
भूम्यां पर्वतमूर्धनि ॥ ब्राह्मणेभ्योऽभ्यनुज्ञाता गच्छदेवि
यथा सुखं ॥ श्रीगच्छदेवि यथासुखं ॐ नमो नमः ॥
आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरं ॥ सर्वदेव
नमस्कारः केशवं प्रति गच्छति ॥ श्रीकेशवं प्रतिगच्छत्यों-
नमोनमः ॥

---

गण, व ईशान्य दिशेचा अधिपति रुद्र व तदधीन देवतागण याकारणेंहीं नम-
स्कार असो. तसेंच उर्ध्व दिशाधिपति व तदधीन देवतागण, व अधर (पाताल)
दिशाधिपति व तदधीन देवतागण, तथा अंतरिक्ष दिशाधिपति वायु व तदधीन
देवतागण इत्यादिकांच्या अंतर्यामीं व संध्यांतर्यामीं, गायत्र्यंतर्यामीं,
सावित्र्यंतर्यामीं, सरस्वत्यंतर्यामीं, तथा सर्वदेवतांतर्यामीं, व गुरु, ऋषि, आचार्य,
मातापितरप्रभृति सर्व वस्तूंच्या अंतर्यामीं राहणारा, अशा श्रीहरी परमात्म्याकारणें
नमस्कार असो. आणि मनोभिमानी जो कामदेव तोच सर्व प्राणिमात्रांत चलन-
वलनात्मक चेष्टा उत्पन्न करितो, अशा त्याच्या अंतर्यामीं असणाऱ्या श्रीहरीका-
रणें नमस्कार असो. व जी संध्यारूपिणी देवता तिला स्थावरजंगमात्मक सर्व भूतें
सायं प्रातःकालीं नमस्कार कारितात तो संध्यांतर्यामीं परमात्मा माझें रक्षण करो.
आणि जो देवकीचा पुत्र कृष्ण तो परब्रह्म. तथा जो मधुदैत्य संहारक तो
परब्रह्म, व पुंडरीक कमळ नयन असा तो परब्रह्म, तसाच जो सदा अस्खलित
अच्युत नामक विष्णु तोच परब्रह्म होय. अशा त्याकारणें नमस्कार असो. व

**वासनाद्वासुदेवोसि वासितं ते जगत्रयं ॥ सर्वभूतनिवासोसि वासुदेव नमोस्तुते ॥ श्रीवासुदेवनमोस्तुते ॐ नमो नमः ॥ नमोस्त्वनंताय सहस्रमूर्तये सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे ॥ सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते सहस्रकोटियुगधारिणे नमः ॥ ॐ नमो नमः ॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥**

---

परब्रह्मरूपी आणि गोब्राह्मणहित [ प्रतिपालक ] तथा ब्रह्मादि जगतास हितकारक अशा त्या वेदप्रातिपाद्य श्रीकृष्णांकारणें नमस्कार असो. व जी क्षीरा ( दूधा ) नें स्थापित व उत्तम चंदनानें विलेपित तथा बिल्वपत्रांनीं पुजित अशा भवमोचक दुर्गांतर्यामी दुर्गानामक परमात्म्याकारणें नमस्कार असो; व अत्युत्कृष्ट शिखरतुल्य अशा श्वेतद्वीप व अनंतासनाच्याठाई तथा पर्वतश्रेष्ठ अशा मेरुपर्वताच्या शिखरावर असणार अशा उत्तम वैकुंठांत अभिव्यक्त असून क्रीडादिगुणविशिष्ट अशा व वेदांनीं व्यक्तस्वरूप आणि ब्राह्मणांकडून अनुज्ञात अशी जी तूं तुझ्या क्रीडार्थ त्वां जावें. हे केलेले सर्व नमस्कार जसें आकाशापासुन मेघद्वारा पडलेलें पाणी समुद्रांत जातें, तद्वत् सर्व देवतादि उद्देशानें केलेले नमस्कार सर्व जगदंतरप्रेरक श्रीविष्णूप्रत आपोआपच जातात. व व्यापकत्वानें वासुदेव होऊन तीनही लोकांतें तुझ्यापासुन जीवन होत आहे; अशा त्या सर्वांतर्यामीं वासुदेवाकारणें नमस्कार असो. तथा जो अनंतरूपी, आदि अंत नसलेला व अनंतानंत चरण, नेत्र, मस्तकें, जंघा, बाहू असलेला, आणि अनंत नामें असलेल्या जीवांच्या अंतर्यामीं असणारा, नाशरहित व अनंतकोटि युगप्रवर्तक आणि स्वभक्तांस बहु अभीष्ट देणारा, असा जो अनंत त्याकारणें नमस्कार असो. याप्रमाणें चिंतन करून श्रीविष्णूची स्तुतिपर गद्यपद्य व " अतोदेवा " इत्यादि वेदभागही यथानुकूल पठण करून

**" आत्मपादौ तथाभूमिं संध्याकालेऽभिवादयेत् ॥**
**आयुः कीर्तिं तथा लक्ष्मीं प्राप्नोति पुरुषः सदा " ॥**

याप्रमाणांत स्वांतर्यामी परमात्मवंदन करणेंस सांगितल्यानें आपण अमुक प्रवरांनींयुक्त, अमुक गोत्रोत्पन्न अमुक वेदशाखाध्यायी अमुक नांवाचा तुला नमस्कार करितों. असें चिंतन करून तीनदां उजव्या हातानें डाव्या पायाचा आणि डाव्या हातानें उजव्या पायाचा व भूमीचाही स्पर्श करून अंतर्यामीं श्रीहरिचिंतन

ॐ आत्मपादौ तथा भूमिं संध्याकालेभिवादयेत् ॥ आयुः कीर्तिं तथा लक्ष्मीं प्राप्नोति पुरुषः सदा ॥ अमुकप्रवरान्वितोऽमुकगोत्रोत्पन्नोऽमुकवेदस्यामुकसूत्रामुकशाखाध्यायी अमुकशर्माहं भो अभिवादये इति त्रिर्व्यस्तपाणिभ्यां गुर्वादीन्नमेत् ॥ यस्यस्मृत्या० ॥ मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं जनार्दन ॥ यत्कृतं तु मया देव परिपूर्णं तदस्तु मे ॥ कायेन वाचा० ॥ अनेन प्रातस्संध्यावंदनेन श्रीभगवान् भारतीरमणमुख्यप्राणवायुहनुमद्भीममध्वांतर्गत श्रीसंकर्षणरामकृष्ण वेदव्यासात्मक श्रीमासस्सूर्यांतर्गतक्षीराब्धिशायी सच्चिदानंदगुणपरमात्मा सवितृनामक श्रीलक्ष्मीनारायणः प्रीयतां वरदो भवतु तत्सत् श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

पूर्वक अभिवादन ( नमस्कार ) करून समापन मंत्र पठण करावेत " **यस्यस्मृत्या** "

**अर्थ**, ज्याच्या स्मरणानें किंवा नामोच्चारणानें तप, संध्या, क्रिया, इत्यादि कर्में न्यून झालेलीं संपूर्णतेस पोंहचतात. अशा त्या नाशरहित श्रीविष्णू कारणें नमस्कार असो; व संसारांतील जन्म चुकविणारा, क्रीडादिगुणविशिष्ट अशा हे विष्णु ! मंत्र, क्रिया, भक्ति, रहित मी जें केलेलें तें तुझ्या प्रसादानें परिपूर्ण होवो. देहानें, वाचेनें, मनानें, इंद्रियांनीं, बुद्धि, जीवात्मा, प्रकृति, स्वभाव इत्यादिकांनीं जें जें करितों, तें तें संपूर्ण, समर्पण करितों. रमा, ब्रह्मा, वायु, रुद्रेंद्रादिकांपेक्षां उत्तम श्रीनारायणाकारणें नमस्कार असो; असें स्मरण करून या प्रातः संध्योपासनेनें षड्गुणैश्वर्य संपन्न भारतीपतीवायु, हनुमान्, भीम, मध्वाचार्यात्मक मुख्य प्राणांतर्यामी असा संकर्षण राम कृष्ण वेदव्यासात्मक असा माससुर्य देवतांतर्यामीं क्षीरसमुद्रांत शेषशायी सवितृ शब्दवाच्य असा जो लक्ष्मीनारायण तो संतुष्ट होवो. व सुप्रीत होऊन वरदान देवो हें श्रीकृष्ण ! हें तुला अर्पण करितों. असें स्मरून कृष्णार्पण करून अंतीं आचमन करावें, व नंतर श्रीविष्णूचीं स्तुतिपर गद्यपद्यें, व " अतोदेवा " वेदभागही पठण करावा.

## इति प्रातःसंध्या समाप्ता

आचम्य॥ द्विराचम्य ॥ प्राणानायम्य ॥ देशकालौ संकीर्त्य ॥ एवंगुणविशेषणविशिष्टायां शुभपुण्यातिथौ श्रीमन्मध्वाचार्याणां हृत्कमलमध्यनिवासिश्रीविष्णुप्रीत्यर्थं माध्यान्हसंध्यां युवतीं श्वेतां श्वेतवाससं वृषभवाहनां रुद्रदैवत्यां दक्षिणाग्न्युपस्थानां धर्मवतीनाम्नीं यजुर्मूर्तिमुपासिष्ये ॥ आपोहिष्ठेतित्र्यृग्भिः " वरवात्रितयं मूर्ध्नि " इत्यादिरीत्या मार्जनं प्रातःसंध्यावत् कृत्वा ॥ आपःपुनंत्वितिमंत्रस्य पूतऋषिः ॥ आपो देवता अष्टपदाअष्टीच्छंदः ॥ अपां प्राशने विनियोगः ॐ आपः पुनंतु पृथिवीं पृथिवी पूता पुनातु मां ॥ पुनंतु ब्रह्मणस्पतिर्ब्रह्मपूतापुनातुमां ॥ यदुच्छिष्टमभोज्यं यद्वा दुश्चरितं मम ॥ सर्वंपुनंतुमामापोसतां चप्रतिग्रह ऽ स्वाहा इत्यपः प्राश्य ॥ आचम्य ॥ " आपोहिष्ठेतिनवर्ग्भिर्मार्जनं " ऋतंचेति त्र्यृग्भिरघमर्षणंच पूर्ववत्कृत्वा ॥ आचम्य प्राणानायम्य देशकालौ स्मृत्वा सवितृनामक श्रीलक्ष्मीनारायणप्रेरणयाश्रील०प्रीत्यर्थं माध्यान्हिकार्घ्यप्रदानमहं करिष्ये ॥ इति संकल्प्य ॥ उत्थायार्घ्यप्रदानं कुर्यात् ॥ तत्र मंत्राः ॥ हंसः शुचिषदितिमंत्रस्य गौतमपुत्रो वामदेवऋषिः । सूर्यो देवता । जगतीच्छंदः ॥ माध्यान्हकालसूर्यायार्घ्यप्रदाने विनि० ॥ ॐ हंसःशुचिषद्वसुरंतरिक्षसद्धोतावेदिषदतिथिर्दुरोणसत् । नृषद्वरसदृतसद्व्योमसदब्जागोजाऋतजाअद्रिजाऋतं ॥ इति पठित्वा माध्यान्हकालभास्करमंडलमध्यवर्तिश्रीसूर्यांतर्गतश्रीलक्ष्मीनारायणाय दत्तं न मम ॥ १ ॥

द्वितीयार्घ्यमंत्रः आकृष्णेनांगिरसोहिरण्यस्तूपःसवितात्रिष्टुप् । माध्यान्हकालसूर्यायार्घ्यं० ॐआकृष्णेनरजसावर्तमानोनिवेशयन्नमृतंमर्त्यंच ॥ हिरण्ययेनसविता रथेनादेवोयातिभुवनानिपश्यन् ॥ इति पठित्वा ॥ माध्यान्ह०न मम ॥ २ ॥

---

## आतां माध्यान्हसंध्यार्थ सांगतों.

प्रातःसंध्याकालीं केल्याप्रमाणें आचमन प्राणायाम संकल्प वगैरे करून माध्यान्ह संध्योपासना करितों, असें ह्मणून विष्ण्वर्पित तुलसीदलासह पाणी सोडावें आणि

" मध्यंदिने च सावित्रीं रविबिंबस्थितां शुभां ॥
यजुर्वेदमयीं रुद्रदैवत्यां पांडुनंदन " ॥

अर्थ–तरूण वयाची, श्वेतवर्णात्मक, श्वेतवस्त्रयुक्त, वृषभारूढ, रुद्रदेवता असलेली दाक्षिणाग्न्युपस्थानात्मक सूर्यमंडलांतर्गत मंगलकारणी, यजुर्वेदमूर्ति, घर्मवती नामक, सावित्रीरूप अशी मध्यान्ह संध्या चिंतन करावी, व आपोहिष्ठादि तीन ऋच्यांनीं पूर्ववत् मार्जन करून अनंतर, मंत्राचमन " आपःपुनंतु " इत्यादि मंत्रानें करावें.

### मंत्रार्थः

आपशब्दवाच्य श्रीहरी, पृथिव्यादि पांचभौतिक शरीर, पवित्र ह्मणजे शुद्ध करून त्या देहांतर्गत प्रख्यात गुणयुक्त पृथिवी शब्दवाच्य श्रीनारायण, या शरीराभिमानी जीवास पावन करो. ब्रह्मशब्दवाच्य वेदपति श्रीविष्णु जडात्मकजल शुद्ध करो, परमात्म्यानें शुद्ध केलेलें जल मला पावन करो. रसलोभानें उच्छिष्ट भोजन व असत्पदार्थग्रहण इत्यादि दुराचरणानें झालेलें संपूर्ण पातक श्रीहरीनें पावन केलेलें जल भस्म करो, असें चिंतून तें उजव्या हातांत घेऊन वरील मंत्रानें मंत्रित केलेलें जल प्राशन करावें. पुनः प्रातःसंध्येप्रमाणें आचमन, "आपोहिष्ठादि" नव ऋचांनीं मार्जन' व " ऋतंच सत्यंच " इत्यादि तीन ऋचांनीं अघमर्षणही करून आचमन प्राणायामपूर्वक माध्यान्हसंध्यांग अर्घ्यप्रदान करितों. असा संकल्प करून संध्यांग मूलसंध्येंत उल्लेखिल्याप्रमाणें तीन अर्घ्ये देऊन प्रायश्चित्तार्थ चतुर्थार्घ्यंही द्यावें. प्रथमार्घ्यमंत्रार्थ तो हा, " हंसः शुचिषदिति " श्रीनारायण

तृतीयार्घ्यमंत्रः ॥ गायत्र्यागाथिनो विश्वामित्रः सविता गायत्री ॥ माध्यान्ह० विनियोगः ॥ ॐभूर्भुवः स्वः तत्सवितु० प्रचोदयात् ॥ माध्यान्हकालभास्करमंडल० ॥ ३ ॥ इति अर्घ्यत्रयं दत्वा ॥ कालातिक्रमेतु शिरसा सह गायत्र्या चतुर्थार्घ्यं पूर्ववद्दत्वा ॥ ॐअसावादित्यो ब्रह्म ॥ इति सजलपाणिः समंतात्परिभ्रमन्नुपविश्य ॥ केशवादितर्पणं पूर्ववत्कृत्वा ॥ द्विराचम्य ॥ गायत्र्या प्रणानायम्य न्यासध्यानं विधाय ॥ यथाशक्त्या गायत्रीजपं पूर्ववत्कृत्वा॥ तर्पणंतु ॥

---

सर्व जगत्संहारक व सर्वत्रगमनशील, तथा वाय्वंतर्गत सर्व प्रवर्तक आणि ऋषींकडून ध्यान करून घेणारा व सर्वेंद्रियांस विषय पोंहचविणारा, सर्व लोक व्यापक, संपूर्ण जगत्पोषक, चतुर्मुख ब्रह्मांतर्गत, मनुष्यांतर्गत ज्ञानीजनांस आश्रय, त्रिजगतांस आधार, सूर्यप्रेरक, जडजीवांतर्यामीं, गाई इत्यादि पश्वंतर्यामीं, मुक्तचतुर्मुखादि लोकांतर्यामीं व जडवृक्षांतर्यामीं असा श्रीनारायणाचा महिमा वेदश्रुति प्रतिपादन करिते. " अशा हंसः शुचिषत्० " या ऋचेनें माध्यान्हकालभास्करमंडल मध्यवर्ती श्रीसुर्यांतर्गत श्रीलक्ष्मीनारायणांस एक अर्घ्यप्रदान द्यावें. नंतर " आकृष्णेनेति० "

## द्वितीयार्घ्यमंत्रार्थ सांगतों.

तो असा, जो वैकुंठलोकांत कृष्णवर्णात्मक अशा शेषावर शयन करणाऱ्या व सृष्ट्याद्यष्ट कर्तव्य करणाऱ्या अशा हे नारायणा ! तूं सर्व जनांत प्रवेश करून आपल्या सुंदर अशा गरुड रथावर बसून आपणच उत्पन्न केलेल्या लोकांस पाहत मोक्ष आणि संपत्ति भक्तजनांस देतोस अथवा विचित्र अशा देहाच्याठायीं अंतर्यामीं असणारा श्रीविष्णु तमोयुक्तज्ञानसहित मानव, व रजोयुक्त ज्ञानसहित देव, यांच्याठायीं कालानुरूप प्रवेश करून सवितृ शब्दवाच्य देवलोक संरक्षण करणारा असा होतोस. अथवा रुद्रदेव कोणीएक कालीं गर्विष्ठ झालेला पाहून श्रीविष्णूनें त्या रुद्रांत तमोगुण वृद्धिंगत करून त्या रुद्राला पंच-

गायत्र्या श्रीलक्ष्मीनारायणं तर्पयामि, सावित्रीं तर्पयामि, यजुर्वेदं तर्पयामि, ॥ इति दशांशेन ॥ पुनः प्राणायामन्यासध्यानांतं कृत्वा हरौ समर्प्य ॥ पूर्ववत् माध्यान्हसंध्योपस्थानं ऊर्ध्वबाहुरुन्मुखस्तिष्ठन्नेव कुर्यात् ॥ ततः गोत्राद्युच्चार्य ॥ यस्य स्मृत्या० कायेन वाचा० अनेन माध्यान्हकालसंध्योपास० श्रीकृष्णार्पणमस्तु० ॥

---

मुखी ब्रह्मदेवाचें पंचमशीर्ष च्छेदन करण्यास प्रेरित केला. तें छेदन केल्यानें ती ब्रह्महत्या रुद्रदेवास लागून ब्रह्महत्या निवृत्यर्थ व्रत ह्मणजे **नरकपाल रुंडमाला, चिताभस्म, लोहदंड** ( त्रिशूळ ) इत्यादि धारण करून, स्मशानवास बहुकाल करणें लागल्यानें गर्वभंग झाला. याचप्रमाणें इतर देव मानवांतही तमोगुण वाढवून त्यांचें त्यांचें गर्वहरण करितो ह्मणण्याचें तात्पर्य. अथवा, रजोगुणयुक्त चतुर्मुखब्रह्मामध्ये राहून सृष्टि करविणारा व तमोगुणयुक्त रुद्रामध्ये राहून संहार करविणारा, परम सुंदर रूपधारी लोक पहाणारा असा सवितृ शब्दवाच्य विष्णु असतो. तृतीयार्घ्यदानाचा गायत्रीमंत्रार्थ व शिरो व्याहृतियुक्त गायत्री मंत्रार्थ, चतुर्थार्घ्याचा पूर्वी प्रातःकालीन संध्येंत सांगितल्यावरून येथें सांगितला नाहीं. “ **असावादित्यो ब्रह्म** ” या मंत्रानें जलपरिभ्रमण केशवादि तर्पण आचमन प्राणायाम न्यासध्यानादिकरून गायत्रीजप, तर्पण वगैरे पूर्ववत् करून गायत्रीजप कृष्णार्पण करावा. आणि तर्जनीवांचून अंगुली एकत्र करून ऊर्ध्वबाहु उत्तराभिमुख उभा राहून संध्योपस्थान करावें. तो प्रकार मूलसंध्येंत दाखविल्याप्रमाणें करावा. प्रातःसंध्येप्रमाणें देवता नमस्कार नामगोत्रोच्चारपूर्वक श्रीहरी स्मरण करून माध्यान्ह संध्या कृष्णार्पण करावी.

## इति मध्यान्हसंध्या समाप्ता

आचम्य ॥ अथ सायंसंध्या प्रारभ्यते ॥ आचामः प्राणायामः ॥ देशकालौ संकीर्त्य ॥ श्रीविष्णुप्रेरणया श्रीविष्णु० सायं संध्यां वृद्धां कृष्णां कृष्णवाससं गरुडवाहनां विष्णुदैवत्यामाहवनीयाग्न्युपस्थानां सत्यवतीनाम्नीं साममूर्तिमुपासिष्ये ॥ आपोहिष्ठेतितिसृग्भिः मार्जनं कृत्वा ॥ अग्निश्चेत्यस्य मंत्रस्य याज्ञवल्क्य औपनिषदृषिः ॥ अग्निमामन्युमन्युपतयो देवताः प्रकृतिच्छंदः ॥ जलाभिमंत्रणे विनियोगः ॥ अग्निश्चमामन्युश्च मन्युपतयश्च मन्युकृतेभ्यः ॥ पापेभ्यो रक्षंतां। यदन्हापापमकार्षं। मनसावाचा हस्ताभ्यां पद्भ्यामुदरेणशिश्ना । अहस्तदवलुंपतु । यत्किंच दुरितंमयि । इदमहंमाममृतयोनौसत्येज्योतिषिजुहोमिस्वाहा ॥ इत्यपः प्राश्याचम्य ॥ आपोहिष्ठेत्यादिनवऋग्भिः पुनः मार्जनं ऋतंचेतितिसृग्भिः अघमर्षणंच पूर्ववत्कृत्वाचम्य ॥

---

हीं मध्यान्ह संध्या करून वक्ष्यमाण, तारतम्य स्तोत्रादि सच्छास्त्र पारायण पूर्वक तत्वज्ञानेच्छु सच्छिष्यांस ब्रह्मसुत्रभाष्यादि पाठ सांगावा, कारण श्रीमदाचार्यप्रणीत ग्रंथाचा उपदेश भोजनाच्यापूर्वींच होणें असतो.

## आतां सायंसंध्या सांगतों.

पूर्ववत् आचमन प्राणायाम करून देशकाल स्मरणपूर्वक संकल्प करून मी

**सायं सरस्वतीं सूर्यमध्यस्थां कृष्णवर्णिनीं ॥ वृद्धां चतुर्भुजां शंखचक्रां पक्षींद्रवाहनां ॥ सामवेदमयीं विष्णुदैवत्यां क्रमशो जपेत् ॥**

अर्थ—सूर्यमंडलस्थित काळ्या वर्णाची, वृद्ध वयाची, चार हातांची, शंख चक्रें धारण केलेली, गरुडावर बसलेली, सामवेदमूर्ति. विष्णुदैवत, सरस्वतीरूपिणी सायंसंध्योपासना करितों. असें विष्ण्वर्पित तुळसीदल हस्तांत घेऊन जल सोडावें. नंतर " **आपोहिष्ठा** " इत्यादि तीन ऋचानीं मार्जन करून " **अग्निश्चेति** " मंत्रानें मंत्राचमन करावें. आणि आचमनपूर्वक **आपोहिष्ठेति** नवऋचांनीं पुनः मार्जन व अघमर्षणपूर्वक आचमनही करून बसुन सव्याहृति गायत्री

उपविश्यैव अर्घ्यप्रदानं कुर्यात्। तदित्थं ॥ गायत्र्यागाथिनो विश्वामित्रः सविता गायत्री सायंकालसूर्यार्घ्यप्रदाने वि नि० ॥ गायत्रीं सव्याहृतिकामुच्चार्य सायंकालवरुणमंडल मध्य० न मम ॥ एवं त्रिवारमर्घ्यं दत्वा ॥ कालातिक्रमेतु चतुर्थार्घ्यं शिरसा सह गायत्र्या पूर्ववद्दद्यात् ॥ ततउत्थाय ॥ "ॐअसावादित्योब्रह्म" इतिसजलपाणिः प्रदाक्षिणं कृत्वोपविश्याचम्य तन्मध्ये केशवादितर्पणं पूर्ववत् कृत्वा ॥ तर्पणंतु ॥ गायत्रीमुच्चार्य श्रीलक्ष्मीनारायणं तर्पयामि, सरस्वतीं तर्प० सामवेदं तर्पयामि ॥ इति दशांशेन तर्पयित्वा ॥ जपं हरौ समर्प्य ॥ उपस्थानंतु पूर्ववत्कार्यं ॥ तत नामगोत्रादिउच्चार्य ॥ यस्यस्मृत्या०॥ कायेनवाचा० ॥ अनेन सायंकालसंध्योपा० भगवान् श्रीसवितृनामकश्रीलक्ष्मीनारा० प्रीय० प्रीतो भवतु तत्सच्छ्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

मंत्रानें संध्याकाळीं वरुणमंडल मध्यवर्ती श्रीलक्ष्मीनारायणास तीन अर्घ्यें देऊन कालातिक्रमदोषपरिहारार्थ शिरोभाग युक्त गायत्रीनें चतुर्थार्घ्य देऊन "असावादित्योब्रह्म" या मंत्रानें जल परिभ्रमणपूर्वक केशवादि तर्पण करून आचमनपूर्वक न्यासध्यान गायत्री जप वगैरे करून पुनःतर्पणंतु, गायत्रीमुच्चार्य श्रीलक्ष्मीनारायणं तर्पयामि, सरस्वतीं तर्पयामि, सामवेदं तर्पयामि, या प्रमाणें दशांशतर्पण करून पुनः प्राणायाम न्यासध्यानपूर्वक जप कृष्णार्पण करावा, त्याप्रमाणें सायंसंध्योपासना करून देवतादिनमनपूर्वक नामगोत्र उच्चार करून पूर्ववत् हरिस्मरणपूर्वक सायंसंध्या कृष्णार्पण करावी.

## ग्रंथांते मंगलं.

" गायत्रीप्रतिपाद्यश्रीसवितंतर्नियामकः ॥
श्रीशःप्रीणातु सततं संध्यार्थकरणेन नः " ॥

अर्थ—या संध्यार्थकरणरूप सेवेनें गायत्रीमंत्रप्रतिपाद्य श्रीसवित्रनामक सूर्यामध्येंराहून प्रेरणा करणारा, असा जो लक्ष्मीपती नारायण तो सतत आह्मांवर सुप्रीत होवो अशी प्रार्थना करीत आहों. श्रीशः प्रीयतां ॥

# इति सायंसंध्या समाप्ता

## संध्या करणाकरणविषयनिर्णय.

**स्नानं संध्यां त्यजन् विप्रः सप्ताहं शूद्रतां व्रजेत् ॥ तस्मात्स्नानं च संध्यां च सूतकेपि न संत्यजेत् ॥ १ ॥ संध्यामिष्टिं च होमं च याव जीवं समाचरेत् ॥ न त्यजेत्सूतके वापि त्यजन्गच्छत्यधोगतिं ॥ २ ॥ सूतके मृतके चैव संध्याकर्म न संत्यजेत् ॥**

अर्थ—सात दिवसपर्यंत स्नानसंध्या त्याग केलेला शूद्रवत् होतो. करितां स्नानसंध्या सूतकांतही सोडू नये. संध्या दर्शपौर्णिमादिइष्टि अग्निहोत्र, हवन जीवंत आहे तोंपर्यंत करावें. सुतकांतही सोडूं नये. न केल्यास दुसऱ्या जन्मीं नरकगामी होतो. अशा प्रमाणावरून सूतकांतही स्नानसंध्या करावी असें सिद्ध होतें.

## तो प्रकार असा.

**मनसोच्चारयेन्मंत्रान्प्राणायाममृते द्विजः ॥ उच्चार्य वाचा गायत्रीं दद्यादर्घ्यांजलीनपि ॥ अष्टाविंशतिकृत्वोवा गायत्रीं मनसा जपेत् ॥ सूतके मृतके चैव प्राणायामममंत्रकं ॥ अर्घ्यांता मानसी संध्या कुश वारिविवर्जिता ॥ तथा मार्जनमंत्रांश्च मनसोच्चार्य मार्जयेत् ॥ गायत्रीं सम्यगुच्चार्य सूर्यायार्घ्यं निवेदयेत् ॥ मार्जनं तु न वा कुर्यादुपस्थानं न चैव हि ॥**

अर्थ—प्राणायामावाचून ( अर्घ्यप्रदान करीपर्यंत दर्भपवित्र न घालितां ) मनांतच मंत्र उच्चारून कर्तव्य करावें. गायत्रीउच्चार स्पष्ट करून सूर्याला अर्घ्ये द्यावींत. मनांतच अमुख्य पक्ष स्वीकारून १०।२८ वेळां गायत्रीमंत्र जप करावा. मार्जन एकादेवेळीं करावे किंवा करूं नये करणेंच असल्यास मनांतच मंत्र उच्चारून करावें. उपस्थान तर करूं नयें.

**उपासनेतु विप्राणामंगशुद्धिश्च जायते ॥ अग्निहोत्रादिहोमार्थं शुद्धि-स्तात्कालिकी स्मृता ॥ पंचयज्ञांश्चकुर्वीत विशुद्धः पुनरेव सः ॥**

अर्थ-संध्योपासना वर्णिल्याप्रमाणें करण्याला व अग्निहोत्र होमाला तत्कालीन शुद्धि होते ह्मणून ते करावे. पंचमहायज्ञ करूंच नयें. कारण, तो सूतक निमित्तानें पुनः अशुद्धच असतो.

सर्वकालमुपस्थानं संध्यायाः पार्थिवेष्यते ॥
अन्यत्र सूतकाशौचविभ्रमातुरभीतितः ॥

अर्थ-याकरितां सर्वकालीं संध्योपासना करावी. जननमरणाशौचकालीं पूर्वोक्तप्रमाणें करावी. अपस्मारादिकानें चित्त विभ्रम झाल्यावेळीं, अथवा मरणोन्मुख झालेल्या वेळीं राजा व देश क्षोभानें त्रस्त असतेवेळीं देखील होईल तेवढीं संध्येंतील मुख्य कर्तव्यें सोडितां येतच नाहींत. अशा अनेक प्रमाणाधारावरून त्रैवर्णिकांस संध्याकर्म ब्राह्मण्यरक्षक मुख्य कर्तव्य आहे.

**आतां मागून संध्योपक्रमीं अर्घ्यप्रदानांतीं देवनिर्माल्य विसर्जनपूर्वक मुख्य प्राणादिकांची देवतीर्थानें अभिषेक पूजा वगैरे झाल्याबरोबर प्रातःकालीं आवश्यकत्वानें करणेंचा ब्रह्मयज्ञ स्वाध्याय देव ऋषी आचार्य पितृतर्पणादि क्रम येथें यापुढें सांगतो.**

**तो असा,**

ब्रह्मयज्ञ, अरुणोदयीं अथवा सूर्योदयीं किंवा मध्यान्हीं करावा. पूर्व पूर्वकाळ उत्तम होय. ब्रह्मयज्ञ न करितां गायत्र्यादि जप केल्यास दोष सांगितला आहे.

**" विष्णुतीर्थीये "**

**" देवादितर्पणात्पूर्वं संध्यांगत्वेन यो जपेत् ॥**
**गायत्रीं चान्यमंत्रांश्च तज्जपो निष्फलो भवेत् "**

अर्थ-देवादितर्पणापूर्वीं संध्यांगत्वाने गायत्री अथवा अष्टौमहामंत्रादि जप केल्यास तो जप निष्फल होतो, तर " न कर्माणि कर्मारंभः " या वाक्यानें एक कर्म करितेवेळीं अन्यकर्मांचा आरंभ होऊनये हे प्रमाण बाधित नाही काय? नाहीं. अर्घ्यांत संध्या प्रधान होय. जपोपस्थानादिक तदंगकृत्य झाल्यानें तत्पूर्वी ब्रह्मयज्ञ होतो, यावरूनच सूतकादि प्रतिबंध कालीं देखील ब्राह्मण्य संरक्षणार्थ **" अर्घ्यांता मानसी संध्या "** असें अर्घ्यांतप्रधानसंध्येचेंच विधान केलें आहे,

श्रीहरयेनमः आचम्य ॥ अथ ब्रह्मयज्ञः ॥ आ-चम्य प्राणानायम्य देशकालौ संकीर्त्य श्रीविष्णुप्रेर० श्री० प्रीत्यर्थं ब्रह्मयज्ञस्वाध्यायदेवऋषिआचार्यपितृतर्पणाख्यं कर्म करिष्ये वामहस्तब्रह्मांजलौ पलमितमुदकं निर्माल्य-दर्भसहितं धृत्वा तस्योपरि दक्षिणहस्तांजलिं संपुटीकृत्य दक्षजानूपरि निधाय कुक्कुटासने स्थितःसन्वाग्यतो जपं कुर्यात् ॥ ततः विद्युदसिविद्युन्मेपाप्मानमृतात्सत्यमुपैमि इतिमंत्रमुक्त्वा ॥ ॐ ब्रह्मयज्ञेन यक्ष्ये । ब्रह्मयज्ञपूर्वभा गिनीं गायत्रीं सावित्रीं सप्रणवां सव्याहृतिकां पच्छोऽर्ध र्चशः ऋक्शः जपं करिष्ये ॥ प्रणवस्य ब्रह्माग्निर्देवीगाय-त्रीव्याहृतीनां विश्वामित्रभृगुभरद्वाजप्रजापतय ऋषयः ॥ अग्निर्वायुः सूर्यः प्रजापतिर्देवताः ॥ गायत्र्युष्णिगनुष्टु ब्बृहतीच्छंदासि ॥ सावित्र्या विश्वामित्रः सविता गायत्री अग्निमीळे मधुच्छंदाग्निर्गायत्रीजपे विनि० ॥ ॐ भूर्भु-

---

### ब्रह्मयज्ञ करण्याचा प्रकार.

" प्रक्षाल्य पाणीपादौच द्विराचम्य कुशासने ॥
उपविश्य प्राङ्मुखोवा दर्भपाणिरुदङ्मुखः " ॥

अर्थ—हात, पाय धुऊन दोन वेळा आचमन करून दर्भासनीं उपविष्ट हो-ऊन पूर्वाभिमुख अथवा उत्तराभिमुख बसून ब्रह्मयज्ञ करावा, व आचमन प्राणायाम पूर्वक संकल्प करून भगवदार्पित तुलसीदलासहित ब्रह्मयज्ञ करितों असें म्हणून जल सोडावे, नंतर वामहस्तब्रह्मांजलींत पलपरिमित जल, निर्माल्य, दर्भस-हित घेऊन त्याचेवर संपुटाकृति उजवा हस्त ठेऊन उजव्या जानूचे वरच्याभागीं तो हस्त ठेऊन कुक्कुटासन बसून मौनानें ब्रह्मयज्ञांगकर्तव्य करावें, नंतर वर वर्णित मंत्र पठण करावे, देव ऋषि पितृंतर्गत तत्तन्नामक भारतीरमणमुख्यप्राणांतर्गत श्रीविष्णुप्रीत्यर्थ असा संकल्प असून अनुसंधानही असावें,

वः॒स्वः । तत्स॑वि॒तुर्वरे॑ण्यं । भर्गो॑दे॒वस्य॑धीमहि । धियो॒योनः॒प्रचो॒दया॑त् ॥ ॐ तत्स॑वि॒तुर्वरे॑ण्यं॒भर्गो॑दे॒वस्य॑धीमहि । धियो॒योनः॑ प्रचो॒दया॑त् ॥ ॐ तत्स॑वि॒तुर्वरे॑ण्यं॒भर्गो॑दे॒वस्य॑ धीमहि धियो॒योनः॒प्रचो॒दया॑त् ॥ अग्निमीळेपुरो० सच॑स्वानः॒स्व॒स्तये॑ ॥ २ ॥ वायवायाहीतिसूक्तं । पुरुषसूक्तं अग्निर्वैदेवानामवमो विष्णुः परमः अथ महाव्रतं । एष-पंथा एतत्कर्म । अथातः संहिताया उपनिषत् । विदाम-घवन्विदा महाव्रतस्य पंचविंशतिं सामिधेन्यः । उक्तानि-वैतानिकानि । इषेत्वोर्जेत्वा वायवस्थो पायवस्थो देवोवः सविताप्रार्पयतु श्रेष्ठतमायकर्मणे ॥ अग्नआयाहिवीतये गृणानोहव्यदातये निहोतासत्सिबर्हिषि ॥ शंनोदेवीराभि-ष्टये० ॥ नारायणं सुरगुरुं० अशोच्यानन्वशोचस्त्वं० ॥ जन्माद्यस्ययतो ० ॥ अथैतस्य समाम्नायस्य समाम्नातः

---

### तर्पणक्रम.

एकैकमंजलिं देवा द्वौ द्वौ तु ऋषयस्तथा ॥
अर्हंति पितरस्त्रींस्त्रीन्स्त्रियश्चैकैकमंजलिं " ॥

अर्थ—या तर्पणाविषयीं देवादिनामे मंत्रभूत आहेत करितां त्यांची आवृत्ती प्रत्येक अंजली देते वेळीं एकेकदां नामोच्चार करावा लागतो, देवास एक अंजलि, ऋषीनां दोनदां नामउच्चार करून दोन अंजलि द्यावे, पितरांला तीनदां नामोच्चार करून तीन अंजली द्यावेत,

" अनामिकायां हेम धृत्वा तर्जन्यां रौप्यमेवच ॥ जलदर्भैः स्वधामंत्रैर्गोत्रनामतिलैर्भवेत् ॥ ताम्रगोकर्णपात्रेण तर्पयेदन्यथा वृथा ॥ अन्वारब्धेन सव्येन पाणिना दक्षिणेन तु ॥ शालग्रामशिलातीर्थयुक्तेनैव जलेनतु ॥ देवादितर्पणं कुर्यादन्यथा निष्फलं भवेत् ॥ विना तीर्थेन यः कुर्यात्तर्पणं पितृदेवताः ॥ रेतोमूत्रपुरीषांश्च सपितृभ्यः प्रयच्छति ॥ शालग्रामशिलातोयैस्तर्पयेत्पितृदेवताः ॥ अमृतेन समं भूत्वा नित्यतृप्ता न संशयः" ॥

॥ मयरसतजभनलगसंमितं ॥ गौः ग्मा ज्मा क्ष्मा धीः श्रीः ह्रीं । पंचसंवत्सरमयं ॥ अथ शिक्षा प्रवक्ष्यामि ॥ वृद्धिरादैच् ॥ अथातो धर्म व्याख्यास्यामः ॥ अथातो धर्म जिज्ञासा ॥ अथातो दैवी मिमांसा ॥ सविष्णुराहहि । तं ब्रह्मेत्याचक्षते । अथातो ब्रह्मजिज्ञासा ॥ नारायणं नमस्कृत्य० ॥ जन्माद्यस्य यतः ॥ योगीश्वरं याज्ञवल्क्यं ॥ ॐ तच्छंयोरावृणीमहे ० ॥ नमो ब्रह्मणे ० ॥ शांतिः शांतिः शांतिः ॥ सव्येन ॥ तीर्थदेवतास्तृप्यंतु ॥ अग्निस्तृप्यतु ॥ विष्णुस्तृ० प्रजापतिस्तृ० ब्रह्मा तृ० वेदास्तृ० देवास्तृ० यज्ञास्तृ० ऋषयस्तृ० सर्वाणिछंदासितृ० ॐकारस्तृ० वषट्कारस्तृ० व्याहृतयस्तृ० सावित्री तृप्यतु ॥ द्यावापृथिवी तृ० अंतरिक्षं तृ० अहोरात्राणि तृप्यंतु ॥ सांख्यास्तृ० सिद्धास्तृ० समुद्रास्तृ० नद्यस्तृ० गिरयस्तृ०

---

**अर्थ**–पितृतर्पण करीत असतां अनामिका नामक अंगुलीच्या ठाईं सुवर्णाचें पवित्र धारण करून व तर्जनीच्या ठाईं रौप्य मुद्रिका धारण करून जल दर्भांनीं स्वधा मंत्रानीं गोत्र, नाम, तिलसहित ताम्रमय गोकर्णाकृति पात्रानें तर्पण करावें, या वाचून अन्यप्रकारानें केलें असतां निष्फल होय, व डाव्या हातांत पळी घेऊन त्या हस्तानें दक्षिणहस्तास किंचित्स्पर्श करून शालग्राम शिलायुक्त जलानेंच देवादिकांचे तर्पण करावें, अन्यथा केल्यास ते निष्फल होय. या उक्तनियम विरहित शालग्रामतीर्थावांचून, देव ऋषि, आचार्य, पितृतर्पण करील तर त्यानें देवादिकांना रत, मूत्र. विष्ठादि देतो हाणून समजावें, करितां नियमानें पितृदेवतांचें ( शालग्रामशिला तीर्थानींच तर्पण करावें. ) तें तीर्थ अमृत तुल्य होऊन त्या पितृदेवता नित्य तृप्तहोत्सात्या आनंदांत असतात. यांत कांहींच संशय नाहीं.

" कुशाग्रैश्चैव देवानामृषीणां कुशमध्यतः ॥ पितृणामग्रमूलाभ्यां कुर्यात्तर्पणमंजसा ॥ उपवीतीदेवताश्च निवीती तर्पयेत् ऋषीन् ॥ अपसव्ये न तु पितॄन् विभक्त्या तु द्वितीयया " ॥

क्षेत्रौषधिवनस्पतिगंधर्वाप्सरसस्तृ॰ नागास्तृ॰ वयांसि तृप्यंतु गावस्तृ॰ साध्यास्तृ॰ विप्रास्तृ॰ यक्षास्तृ॰ रक्षांसि तृप्यंतु। भूतानि तृ॰ एवमंतानि तृप्यंतु। अथ ऋषयः। शतर्चिनस्तृप्यंतु शतर्चिनस्तृ॰ एवमग्रेप्यूह्यं॥ माध्यमास्तृ॰ गृत्समदस्तृ॰ विश्वामित्रस्तृ॰ वामदेवस्तृ॰ अत्रिस्तृ॰ भरद्वाजस्तृ॰ वसिष्ठस्तृ॰ प्रगाथास्तृ॰ पावमान्यस्तृ॰ क्षुद्रसूक्तास्तृ॰ महासूक्तास्तृ॰ येचान्येऋषयस्ते सर्वे तृप्यंतु तृप्यंतु॥ ॥ अथ प्राचीनावीती ॥ सुमंतुजैमिनिवैशंपायनपैलसूत्र-

---

**अर्थ**—देवांचें तर्पण करीत असतां दर्भाग्रांतून ऋषींस दर्भमध्यांतून, पितरांना दर्भाग्र व दर्भमूल यांही उत्तम रीतीनें तर्पण करावें, देवतर्पण उपवीतीनें, ऋषींस निवीतीनें, पितरांस अपसव्यानें, द्वितीयांत विभक्तीनें उच्चार करून तर्पण करावें, व्रतबंध झाले नंतर ब्रह्मचर्य नियम बद्ध असेल तोंपर्यंत प्रतिदिवसप्रातः सायंसंध्योत्तर " अग्निकार्य " सांगितल्या प्रमाणे करीत असावें, तथा त्रिकाल सौरहि नियमितवेळीं ऋषि, छंद देवता स्मरणपूर्वक पठण करावे.

" पितृतर्पणे विशेषः॥ येतु पाणितले स्पृष्टा रोमकूपेतु ये धृताः॥ तैस्तिलैस्तर्पणं कुर्यात् पितृघातीभवेद्द्विजः॥ तस्मात्ते मणिबंधेतु धार्या विप्रैस्समाहितैः॥ जलस्थस्तुजलेकुर्यात्तर्पणं स्थलगः स्थले॥ वामपादं जले कृत्वा दक्षपादं स्थले ततः॥ वसित्वा वसनं शुष्कं स्थले विस्तीर्ण बर्हिषि॥ देवादितर्पणं कुर्यान्न पात्रे नोदके तथा॥ हेमरूप्यमयं पात्रं ताम्रकांस्यसमुद्भवं॥ देवादितर्पणे ग्राह्यं मृण्मयं तु परित्यजेत्॥ "

**अर्थ**—हस्त तल आणि रोम मूलांत धारण केलेल्या तिलानीं पितृतर्पण केल्यास पितृघाती होतो, करितां ते तीळ ब्राह्मणानीं **मणिबंध** ( हस्ततलापेक्षां ऊंचरोम नसलेल्या जागीं ) धारण करावें, जलांत राहिला असेल तर जलांत तर्पण करावें, स्थलावर असेल तर दर्भास्तृत स्थलावर शुष्क वस्त्र स्वीकार करून करावें, जलांत राहून करिते वेळीं डावा पाद जलांत, दक्षिण पाद तीरावर ठेवून करावें, देवादितर्पण मृण्मयपात्रीं आणि स्थलस्थास जलांतही करणेस निषेध आहे, **सुवर्ण**, **रौप्य**, ताम्रमयपात्रें ग्राह्य होत, मृण्मय त्याज्य आहे,

भाष्यभारतमहाभारतधर्माचार्यास्तृप्यंतु ॥ सुमंतुजैमिनि वैशंपायन० स्तृप्यंतु ॥ एवमग्रेप्यूह्यं ॥ जानंतिबाहवीगार्ग्यगौतमशाकलबाष्कलबाभ्रव्यमांडव्यमांडूकेयास्तृप्यंतु । गर्गीवाचक्नवी तृप्यतु । वडवा प्रातीथेयी । तृप्यतु सुलभामैत्रेयी तृप्यतु । कहोळं तर्पयामि । कौशीतकं तर्पयामि । महाकौशीतकं तर्पयामी । पैंग्यं त० महापैंग्यं त० सुयज्ञं त० सांख्यायनं त० ऐतरेयं त० महैतरेयं त० शाकलं त० बाष्कलं त० गार्ग्यं त० गौतमं तर्प० औ-

---

" मार्जनं तर्पणं श्राद्धं नकुर्याद्वारिधारया "

**अर्थ**–मार्जन, तर्पण, श्राद्धहीं धारा रूपानें पडणाऱ्या उदकांत ( पाटांत ) करूं नये,

तर्पयेत्प्राङ्मुखो देवान् ऋषींश्चोदङ्मुखः पितृन् ॥
दाक्षिणाभिमुखश्चैवं तर्पणस्य विधिः स्मृतः ॥ "

**अर्थ**–पूर्वाभिमुखदेवांस, उत्तराभिमुखऋषींस, व पितरांस दाक्षिणाभिमुख असा तर्पणास विधी असतो'

अंगुल्यग्रैस्तथा देवान् कनिष्ठामूलतो ऋषीन् ॥ पितृन्दिव्यानदिव्यांश्च तर्जन्यंगुष्ठमध्यतः ॥ तत्र दिव्याः स्वसूत्रोक्ता अदिव्या जनकादयः " ०

**अर्थ**–अंगुलीच्या अग्रांनीं देवांस, कनिष्ठिकेच्या मूलांतून ऋषींस, तर्जनी आणि अंगुष्ठाच्या मूलांतून पितरांस, व स्वसूत्रोक्त दिव्य शब्दवाचक, आणि अदिव्य शब्दवाचक जनकादिक यांचें तर्पण करावें.

" संबंधनामगोत्राणि तथावस्वादिरूपतां ॥ स्वधाशब्दं नमःशब्दंमुक्त्वा संतर्पयेत् पितृन् ॥ प्रपितामहे तु निर्दिष्टो वासुदेवः परः पुमान् ॥ पितामहे तु निर्दिष्टस्तथा संकर्षणः प्रभुः ॥ पितृसंस्थस्तुविज्ञेयः प्रद्युम्नो ह्यपराजितः ॥ "

**अर्थ**–पितरांचें तर्पण करीत असतां आपणांशीं त्यांचा संबंध असलेला व त्यांचीं नामें व गोत्रें, तसेंच पित्रादिकांत अंतर्यामीं वसु, रुद्र, आदित्य व त्यांच्या अंतर्यामीं प्रद्युम्न, संकर्षण वासुदेव अशीं भगवद्रूपें जाणून पितृतर्पण स्वधानमः

दवाहिं त० महौदवाहिं त० सौजामिं त० शौनकं त० आश्वलायनं त० येचान्ये आचार्यास्ते सर्वे तृप्यंतु तृप्यंतु ॥ अथ पितृतर्पणं अपसव्येन कुर्यात् ॥ तत्क्रमः ॥ आदौ पिता तथा माता सापत्नी जननी तथा ॥ मातामहा सपत्नीका आत्मपत्नी त्वनंतरं ॥ सुतभ्रातृपितृव्याश्च मातुलास्सहभार्यकाः ॥ दुहिता भगिनी चैव दौहित्रो भागिनेयकः ॥ पितृष्वसा मातृष्वसा श्वशुरश्शालकस्तथा ॥ भावुको गुरुराचार्यः स्वामी सखि यथा क्रमं ॥ आब्रह्मस्तंबपर्यंतं देवर्षिपितृमानवाः ॥ ते सर्वेतृप्तिमायांतु मातृमातामहादयः ॥ अतीतकुलकोटीनां सप्तद्वीपनिवासिनां ॥ आब्रह्मभुवनांल्लोकानिदमस्तु तिलोदकं ॥ ये केचास्मत्कुलेजाता अपुत्रा गोत्रिणो मृताः ॥ ते गृण्हंतु मयादत्तं सूत्रनिष्पीडनोदकं ॥ कायेन. वाचा० अनेन ब्रह्मयज्ञस्वाध्यायदेवर्षिआचार्यपितृतर्पणेन भगवान् पितृंतर्यामिश्रीमज्जनार्दनवासुदेवः प्रीयतां प्रीतो भवतु तत्सत श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ॥ ॥

---

शब्द उच्चारपूर्वक करावें. प्रातःकाळीं ब्रह्मयज्ञादि कर्म झाल्यानंतर संक्रमणादि पर्वकाल असल्यास तन्निमित्तक तर्पण मात्र करावें तो असा

आचमन व प्राणायाम केल्यानंतर देशकालाचा उच्चार करून श्रीविष्णुप्रेरणेने श्रीविष्णुप्रीत्यर्थ ब्रह्मयज्ञ स्वाध्याय देव ऋषि आचार्य पितर यांचें तर्पण करितो असें संकल्प करून डाव्या हाताच्या ओंजळींत निर्माल्य तुळसीदळ व दर्भसहीत पाणी घेऊन त्यावर उजवा हात संपुटाकार करून उजव्या मांडीवर ठेवून कुक्कुटासनिं बसुन मौनाने जप करावा. नंतर ( विद्युदसि ) हा मंत्र म्हणून ( ॐ ब्रह्मयज्ञेनयक्ष्ये ) असा संकल्प करावा. ब्रह्मयज्ञाच्या पूर्वी पादशः अर्धशः

ऋक्शः गायत्री मंत्र जप करावा. नंतर ब्रह्मयज्ञ मंत्रांत लिहिल्याप्रमाणें अग्निमिळे वगैरे मंत्र ह्मणून सव्यानें देवतर्पण करावे. देवांनां एकेकवेळा अर्घ्यद्यावे. नंतर मालाकार यज्ञोपवीत घालून ऋषितर्पण करावे. ऋषींना दोन दोनवेळा अर्घ्य द्यावे. अंगुष्ठांत जानवे घालुन आचार्यतर्पण करावे मग अपसव्यानें पितृतर्पण करावे. इत्यादिकांचे यथाक्रम तर्पण करावे. नंतर आपल्या गोत्रामध्यें अपुत्र जे मृत असतील त्यानां उद्देशून पाणी सोडावे मग यस्यस्मृत्याच हा मंत्र ह्मणून कृष्णार्पण करावे.

## जीवत्पितृकांनीं करण्याचा तर्पणविशेष तो असा.

**" कव्यवाहोनलः सोमो यमश्चैवार्यमा तथा ॥ अग्निष्वात्ता बर्हिषदः सोमपा आज्यपास्तथा ॥ सपदिस्याज्जीवत्पितृकः येभ्यो दद्यात् जलां जलिमिति ॥ "**

**अर्थ**—वर उद्दिष्ट कव्यवाहादि पितृगणांस मात्र जिवत्पितृकांनीं जलांजली द्यावा, याशिवाय इतर पितृतर्पण लागू होत नाहीं. वैष्णवकुलीं जन्मलेल्या सर्व द्विजानीं श्रीमदाचार्योक्त तंत्रसारोक्तपद्धतीप्रमाणें श्रीविष्णुमूर्ती शालिग्रामसह अथवा केवल शालिग्राम उच्चासनीं ठेवून रमाब्रह्मावायुरुद्रेंद्रादि सुरगण पार्षद [ भृत्यवर्ग ] असें जाणुन निरंतर त्रिकालीं पूजा करावी. तसा संभवच नसल्यास केवल शालिग्रामास तरी पुरुषसूक्तानें षोडशोपचार पूजा करून तत्तीर्थप्रसाद नियमानें स्वीकारलाच पाहिजे. त्या शालिग्रामाबरोबर इतर रमाब्रह्मरुद्रादिकांची पूजा न करितां तत्तीर्थप्रसादानेंच त्यांची पूजा करावी. एक समासनीं विष्णूसह ब्रह्मादिकांच्या प्रतिमा ठेऊ नये. सर्व वेदांपेक्षां पुरुषसूक्त हें अतीव विष्णुप्रतिपादक होय.

**" यथा हि पौरुषं सूक्तं विष्णोरेवाभिधायकं ॥**
**न तथा सर्ववेदाश्च वेदांगानि च नारद ॥ "**

**अर्थ**—जसें पुरुषसूक्त विष्णुवाचकत्व आहे. तसे सांगवेद देखील श्रीविष्णु पर नव्हेत.

**" यथा हि पौरुषे सूक्ते विष्णुरेवाभिधीयते ॥**
**तस्मिन्काले महाराज रामएवाभिधीयते ॥ "**

जसा पुरुषसूक्तांत विष्णूच प्रतिपाद्य तसा त्रेतायुगीं स्वतंत्र चक्रवर्ती रामच प्रतिपाद्य यावरून पुरुषसूक्त केवल श्रीविष्णुपर असल्यानें त्याणें श्रीविष्णु प्रतिदिनीं पूजावा. रमाब्रह्मादि देवता पूजिते वेळीं त्यांत श्रीविष्णुअंतर्यामीं असतो, असें चिंतून पुरुषसुक्तानें पूजा करावी. तो पूजेचा प्रकार वर लिहिल्याप्रमाणें करावा.

अथाग्निकार्यं ।। आचम्य प्राणानायम्य देशकालौ संकीर्त्य श्रीविष्णुप्रेर० श्रीविष्णुप्रीत्यर्थं प्रातःकाल अग्निकार्यहवनं करिष्ये ।। इति संकल्प्य ।। तूष्णीं । अग्नये स्वाहेति अग्नौ समिधं प्रक्षिप्य ।। अग्नये समिधमित्यस्य हिरण्यगर्भोऽग्निर्बृहती समिधाधाने विनियोगः ।। ॐ अग्नये समिध महार्षि बृहते जातवेदसे ।। तयात्वमग्ने वर्धस्व समिधा ब्रह्मणा वयं स्वाहा ।। इत्यग्नौ समिधं प्रक्षिप्य । हस्तौ प्रक्षाल्य ।। ॐ तेजसा मा समनाज्मि । एवंत्रिः ३ इति हस्तौ प्रक्षाल्य । अग्नौ प्रताप्य । ताभ्यां मुखं विमृज्य ।। मयि मेधामितिषण्णां पूर्वेषां त्रयाणां ।। अग्नींद्रसूर्या देवता उत्तरत्रयाणा अग्निर्देवता गायत्रीच्छंदः अग्न्युपस्थानेवि० ॐ मयिमेधा मयिप्रजां मय्यग्निस्तेजो ददातु ॐ मयिमेधां मयिप्रजां मयींद्र इंद्रियं ददातु ॐ मयिमेधां मयिप्रजां मयिसूर्यो भ्राजो ददातु। यत्ते अग्ने तेजस्तेनाहं तेजस्वी भूयासं ।। यत्ते अग्ने वर्चस्तेनाहं वर्चस्वी भूयासं ।। यत्ते अग्ने हरस्तेनाहं हरस्वी भूयासं ।। मानस्तोकेति कुत्सो रुद्रो जगती विभूतिधारणे विनियोगः ।। ॐ मानस्तोके तनये मान आयौ मानो गोषुमानो अश्वेषुरीरिषः ।। विरान्मानो रुद्रभामितो वधीर्हविष्मंतस्सदमित्वा हवामहे ।। त्र्यायुषं जमदग्नेरिति ललाटे । कश्यपस्य त्र्यायुषमिति कंठे । अगस्त्यस्य त्र्यायुषमिति नाभौ । यद्देवाना त्र्यायुषमिति दक्षिणस्कंधे । तन्मेअस्तु त्र्यायुषमिति वामस्कंधे । सर्वमस्तु शतायुष-

मिति शिरसि धारये । ततः केशवादिदामोदरातद्वादश-नामभिर्नमोंतकैः ललाटादि द्वादशपुंड्रेषु हस्तेन संस्पृश्य ॥ ॐ चमे स्वरश्चमे यज्ञोपचते नमश्च । यत्ते न्यूनं तस्मै त उपयत्तेऽतिरिक्तं तस्मै ते नमः ॥ अग्नये नमः । ॐ स्वति श्रद्धां मेधां यशः प्रज्ञां विद्यां बुद्धिं श्रियं बलं। आयुष्यं तेज आरोग्यं देहि मे हव्यवाहन ॥ नामगोत्रा-द्युच्चार्य अहं भो अभिवादये ॥ इति त्रिः ॥ कायेन वाचेति हरौ समर्प्य ॥ एवमेव सायमपि कार्यं ॥ अनेन प्रातःसायं अग्निकार्यहवनेन भगवान् अग्न्यंतर्यामिपरशु-रामः प्रीयतां प्रीतोभवतु तत्सत् श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

## यानंतर अग्निकार्य सांगतो.

पूर्वीप्रमाणें आचमन प्राणायाम देशकाल संकीर्तन वगैरे करून श्रीवि-ष्णूच्या प्रेरणेने श्रीविष्णुप्रीत्यर्थ अग्निकार्य हवन करितो असा संकल्प करून मंत्र न ह्मणताच ( अग्नये स्वाहा ) असें ह्मणून अग्नींत समिधा ठाकाव्या (अग्नि-येसमिध ) हा मंत्र ह्मणून समिधाहोम करावा. हस्तप्रक्षालन करून (ॐतेजसा) हा मंत्र ह्मणून हात तापऊन मुखस्पर्श करावे. त्यानंतर ( मयिमेधां ) हा मंत्र ह्मणून अग्न्युपस्थान करावे. मग ( मानस्तोकेति ) हा मंत्र पठण झाल्यानंतर ( केशवायनमः ) आरंभ करून ( दामोदरायनमः ) येथपर्यंत प्रत्येक उच्चार करतेवेळीं एकेक उर्ध्वपुंड्रास स्पर्श करावा मग अग्नीची प्रार्थना करावी. स्वकीय नामगोत्रादिकाचा उच्चार करून मी नमस्कार करितों ह्मणून तीन वेळां नमस्कार करावा. ( कायेनवाचा ) या मंत्रानें श्रीहरीस समर्पण करावें. याचप्रमाणें सायं-काली हवन करावें. या प्रातःकालीन व सायंकालीन अग्निकार्य हवनानें अग्न्यंत-र्यामी श्रीभगवान हरिणीपति परशुरामप्रीत होवो असें ह्मणून कृष्णार्पण करावें.

अथ पुरुषसूक्तं ॥ हरिः ॐ ॥ सहस्रशीर्षापुरुषःस० इत्यादिऋग्भिः षोडशोपचारपूजाविधिर्लिख्यते ॥ तत्क्रमस्तु ॥ अथ ध्यानं ॥ उद्यद्भास्वत्समाभासश्चिदानंदैकदेहवान् ॥ चक्रशंखगदापद्मधरो ध्येयोहमीश्वरः ॥ लक्ष्मीधराभ्यामाश्लिष्टः स्वमूर्तिगणमध्यगः ॥ ब्रह्मवायुशिवाहीशविपैः शक्रादिकैरपि ॥ सेव्यमानोऽधिकं भक्त्या नित्यं निःशेषशक्तिमान् ॥ मूर्तयोष्टावपि ध्येयाश्चक्रशंखवराभयैः ॥ युक्ताः प्रदीपवर्णाश्च सर्वाभरणभूषिताः ॥ बिंबोऽसि प्रतिबिंबोऽस्मि तव यद्यपि चांतरं ॥ स्वामिन्निर्दोष मे दोषान्विरेचय नमोऽस्तुते ॐ ॐ नमो नारायणाय ॐ ध्यानं समर्पयामि ॥ एवमग्रेपि प्रत्युपचारं मूलमंत्रं ऋगंते पठित्वा उपचारान्समर्पयेत् ॥ हरिः ॐ सहस्रशीर्षापुरुषः सहस्राक्षःसहस्रपात् । सभूमिंविश्वतोवृत्वाऽत्यतिष्ठद्दशांगुलं ॥ मूलमंत्रः ॥ आवाहनं स० ॥ केवलं प्रतिमां विना शालग्रामपूजायां तु तस्मिन् विष्णोः नित्यसांनिध्यात् आवाहनं नास्ति ॥ सहस्रशीर्षेति ऋचा ध्यानमेव कार्यं॥ इति विशेषः ॥ ॐ पुरुषएवेदंसर्वंयद्भूतंयच्चभव्यं । उतामृतत्वस्येशानोयदन्नेनातिरोहति ॥ मूल० आसनं स० ॥ ॐ एतावानस्यमहिमातोज्यायांश्चपुरूषः । पादोस्यविश्वाभूतानित्रिपादस्यामृतंदिवि ॥ पाद्यं स० ॥ ॐ त्रिपादूर्ध्वऽउदैत्पुरुषःपादोस्येहाभवत्पुनः ॥ ततोविष्वङ्व्यक्रामत्साशनानशनेअभि ॥ अर्घ्यं स० ॥ तस्माद्विराळजायतविराजोअधिपूरुषः । सजातोअत्यरि-

च्यतपश्चाद्भूमिमथोपुरः ॥ आचमनीयं सम० ॥ ॐ यत्पुरुषेणहविषादेवायज्ञमतन्वत । वसंतोअस्यासीदाज्यंग्रीष्मइध्मःशरद्धविः ॥ स्नानं सम० ॥ तंयज्ञंबर्हिषिप्रौक्षन्पुरुषंजातमग्रतः । तेनदेवाअयजंतसाध्याऋषयश्चये ॥ मूल० वस्त्रं स० ॥ तस्माद्यज्ञात्सर्वहुतःसंभृतंपृषदाज्यं । पशूंतांश्चक्रेवायव्यांनारण्यान्ग्राम्याश्चये ॥ मूल० यज्ञोपवीतं स० ॥ तस्माद्यज्ञात्सर्वहुतऋचःसामानिजज्ञिरे । छंदांसिजज्ञिरेतस्माद्यजुस्तस्मादजायत ॥ मूल० गंधं स० ॥ तस्मादश्वाअजायंतयेकेचोभयादतः । गावोहजज्ञिरेतस्मात्तस्माज्जाताअजावयः ॥ मूल० पुष्पं समर्पया० ॥ यत्पुरुषंव्यदधुःकतिधाव्यकल्पयन् । मुखंकिमस्यकौबाहूकाऊरूपादाउच्येते ॥ मूल० धूपं स० ॥ ब्राह्मणोस्यमुखमासीद्बाहूराजन्यःकृतः ॥ ऊरूतदस्ययद्वैश्यःपद्भ्यांशूद्रोअजायत मूल० दीपं स० ॥ चंद्रमामनसोजातश्चक्षोःसूर्योअजायत । मुखादिंद्रश्चाग्निश्चप्राणाद्वायुरजायत ॥ मूल० नैवेद्यं स० ॥ नाभ्याआसीदंतरिक्षंशीर्ष्णोद्यौःसमवर्तत । पद्भ्यांभूमिर्दिशःश्रोत्रात्तथालोकाँअकल्पयन् ॥ मूलं० तांबूलं० ॥ सप्तास्यासन्परिधयस्त्रिःसप्तसमिधःकृताः । देवायद्यज्ञंतन्वानाअबध्नन्पुरुषंपशुं ॥ मूल० नीराजनं स० ॥ ॐ यज्ञेनयज्ञमयजंतदेवास्तानिधर्माणिप्रथमान्यासन् । तेहनाकंमहिमानःसचंतयत्रपूर्वेसाध्याःसंतिदेवाः मूलमंत्रः पुष्पांजलिं सम० ॥ प्रत्यृचं आद्योंकारसहितां पठेत् ॥ इति षोडशोपचारपूजा समाप्ता श्रीशः प्रीयतां॥

## " सहस्रशीर्षेति "

अर्थ–भक्तपापनाशक श्रीहरी सर्व सद्गुणपूर्ण आहे. असा अर्थ प्रतिपादन करणारा " ॐ कार " सर्व मंत्राच्या उच्चारारंभीं येतो. अर्थात् सर्व वेदांत गुणपूर्ण श्रीहरीचें स्तवन केलें आहे, असें तो ॐ कार सुचवितो आहे. तसें नसतें तर बाकी कोणत्याही देवाचें नाम घेऊन उच्चार करावयाचें होतें. तसा सांप्रदाय कोणत्याही वैदिक मात्रांत नसतो. करितां श्रीहरीसच सर्व वेद गुणपरिपूर्णत्वानें वर्णन करितात, असा " हरिः ॐ " या शब्दाचा अर्थ जाणावा. तो श्रीविष्णू भक्ताभीष्टदाता, सर्वांतर्यामीं, पुरुषशब्दवाच्य, अनंत मस्तक, अनंत नेत्र, अनंत चरण असल्यावरूनच भूम्यादि संपूर्ण ब्रह्मांडाच्या अधोऊर्ध्वभागीं व्यापून असुनही प्रत्येक प्राणीमात्राच्या अंतर्हृदयांत दशांगुल ( प्रादेश ) परिमितरूपानेंही तो सर्व शक्तिमान् श्रीहरी असतो. येथें, **" दशशब्दोशतवाची, शतशब्दोसहस्रवाची, सहस्रशब्दो अनंतवाची, "**

या वचनानें सहस्र व दश शब्दानें अमितत्व घेतो. त्या श्रीहरीचे प्रत्येक अवयवांत व इंद्रियांत सर्व अवयव आणि सर्व इंद्रियांची संपूर्ण शक्ति असल्यानें अमित शीर्षादि अवयव त्याचे सांगितले आहेत, त्या पुरुषशब्दवाच्य श्रीहरीचे अधीन भूतभविष्यवर्तमानकालीन जगत् असल्यानें तोच जगत् असें सांगितलें आहे. " राजाच राष्ट्र " अशा व्यवहाराप्रमाणें हा व्यवहार होय. नहून या श्रीहरीनें जगत् अभिन्न ह्मणण्याचा अभिप्राय नव्हे; कारण तो अन्नाधीन जीवांहून विलक्षण असून मुक्तीचाही धनी आहे. जगत्परिमित शक्तीचें त्याहून अमित शक्तीनें अधिक तो श्रीहरी होय. त्याचीं श्वेतद्वीप, अनंतासन, वैकुंठगत नित्यमुक्त, स्वतंत्र, परस्पर अभिन्न तीन स्वरूपें असून त्यापासून भिन्नांशभूत संपूर्ण भूतें ह्मणजे सर्व जीवगण होत. तो त्रिमूर्ति पूर्वोक्त श्रीहरीरूप पुरुष सर्वोत्तम, त्याचे भिन्नांशभूत जीवसमूह या संसारांत उत्पत्यादि पावणारा त्यावरून तो श्रीहरी सर्वव्यापी अशना ( क्षुधा तृषा ) इत्यादि दोषरहित आणि जीववर्ग त्या दोषांनीं युक्त व अव्याप्त झाला आहे. त्या श्रीहरीपरमात्म्यापासून ब्रह्मांड उत्पन्न झालें; त्यांत विद्यमान भूम्यादि सर्व प्रदेशांच्या सर्व भागांत तोच श्रीहरी तद्दोषांनीं अलिप्त असून व्याप्त असतो. सत्वनिष्ठ ज्ञानीवर्ग वसंत, ग्रीष्म, शरत् इत्यादि ऋतु व घृत, काष्ठें, हवि इत्यादि साधनांनीं त्याच श्रीहरीला यजन करितात, तोच श्रीहरी सर्व यज्ञभोक्ता होय. त्यापासून सर्व देव, साध्य ऋषि,

हविरादिक पदार्थ आरण्यक किंवा ग्राम्य पशु ह्मणजे अरण्यांतील किंवा ग्रामांतील असे अनेक पदार्थ झाले; ऋक्, साम, यजु इत्यादि वेद, आणि च्छंद त्यापासूनच अभिव्यक्त झाले. एक बाजूला दंत असलेले व उभय बाजूला दंत असलेले, धेनू, अश्व, मेष, मेंढरें इत्यादि प्राणिवर्ग त्यापासून झाला; "आतां कोणकोणत्या अंगापासून कोणकोण झाले, हें सांगतात." ज्याच्या मुखापासून अध्ययनादि वृत्ती असलेला ब्राह्मणवर्ण, व भुजांपासुन युद्धवृत्ती असलेला क्षात्रियवर्ण, तथा ऊरूंपासुन वाणिज्यवृत्ती असलेला वैश्यवर्ण, आणि पादांपासून त्रिवर्णसेवकवृत्ती असलेला शूद्रवर्ण उत्पन्न झाला. ह्मणजे तत्तद्वर्ण श्रेष्ठ ब्राह्मणादिक मुखादि अवयवांपासून उत्पन्न झाले असें जाणावें.

## आतां अवांतर विशेषाचें निरूपण करितों.

मनापासून चंद्र, नेत्रांपासून सूर्य, मुखापासून इंद्र व अग्नि, प्राणापांसून वायु, नाभीपासुन गगन ( आकाश ); मस्तकापासून द्युलोक, पायांपासुन भूमि, कर्णांपासून दिशा, आणि इतरही लोक त्याणेंच उत्पन्न केले. अशा ह्या लोकात्मक ब्रह्मांडास सप्तावरणें असतात; तदंतर्गत यज्ञनामक परमात्मोद्देशक यज्ञास एकविंशाति तत्त्वरूप समिधा होत. अशा यज्ञानें चतुर्मुखब्रह्मादि सुरगण श्रीविष्णुप्रिय यजन करणारे स्वात्मजीवरूप तत्प्रिय पशू कल्पून यजन करितात, असे शाश्वत मुक्ति प्रदायक श्रीहरिप्रियधर्मच मुख्य जाणून ते आचरल्यानें पूर्व ब्रह्मांडांतील चतुर्मुख ब्रह्मादि सात्विक जीवगण योग्य असतील ते त्या मुक्तींत पोहोचले. जेथें श्रीहरिसर्वोत्तमत्व ज्ञानपूर्वक तत्प्रसादानें सिद्धि पावलेले चतुर्मुखादि जीवसमुदाय असंख्य असतात. वर वर्णीत तत्तदंगापासुन झालेले देव व लोक तत्तदंगाश्रितच सर्वदा असल्यानें ब्राह्मणच या पुरुषाचें मुख होय; इत्यादि अभिन्न व्यवहार दाखविला आहे. करितां ते ते तत्तदुत्पन्न देव व लोकादि पदार्थ वर्ग सर्वदा श्रीहरीपासून भिन्नच असून तदाश्रित जाणावा. नहून त्या पुरुषशब्दवाच्य श्रीहरीला आणि तदितर देव व लोकांला अभेद सर्वथा जाणूं नये. अशा अर्थानुसंधानानें श्रीहरी सर्वोत्तम तदितर ब्रह्मादि सर्व जगत् त्यापासून उत्पन्न झालें असून तदाश्रित असें जाणून जे श्रीहरीची पूजा, यज्ञ, ध्यान इत्यादि करितील तेच तल्लोकभूत श्रीवैकुंठीं जाऊन स्वयोग्यतानुरूप तारतम्यसहित जननमरणादि दोषरहितहोत्साते नित्य सुखरूप मोक्ष अनुभवतील. "तद्विष्णोः परमंपदं" तें विष्णुस्थानभूत वैकुंठपदच परम मुक्तिस्थान होय.

## इति पुरुषसूक्त तात्पर्य.

श्रीभारतीरमणमुख्यप्राणांतर्गतश्रीसीतापतिरामचंद्रमूर्ति- प्रीत्यर्थं श्रीमुख्यप्राणाभिषेकमहं करिष्येति संकल्प्य श्रीविष्णुनिर्माल्यपुजोत्तरं तत्तीर्थेनाभिषेकं कुर्यात् ॥ बळित्थादिवर्ग, मन्युसूक्त, ऋषभंमाइत्यादिना वायुस्तुत्या लघुवायुस्तुत्याच प्रत्यहमभिषेकं कुर्यात् ॥ श्रीवेदव्यासायनमः ॥

---

श्रीवैष्णवकुली जन्मलेल्या सर्व सज्जीवांनीं सर्वजीवश्रेष्ठ; येत्या ब्रह्मांडीं चतुर्मुख ब्रह्मपदवीवर आरूढ होणार; श्रीहरीचा परमभक्त वायुदेवाच्या हनुमान व भीम आणि **श्रीमध्व** अशा अवतारत्रयानें श्रीहरिसेवा त्या वायुदेवानें संपादून अत्यंत हित केलें; कराण आणि,

" **धातुः प्रसादात् महिमानमात्मनः** "
" **पवमानः प्रजापतिः पावमान्यः पुनंतु मां** "

या श्रुत्यन्वयें भावी चतुर्मुख ब्रह्मभूत त्या वायुदेवाच्या अनुग्रहावांचून श्रीहरिपरमात्ममहिमा समजण्याजोगा नसतो. आणि ज्ञानदायी श्रीवायुदेवाचा तृतीय

" **तृतीयोमध्वआघवे, गुहासंतंमातरिश्वामथायति** "
" **दशप्रमतिंजनयंतयोषणः विष्णोः पदेपरमेमध्वउत्सः** "

**श्रीमध्वावतार** या वरील श्रुत्युक्तीप्रमाणें **श्रीमत्पूर्णप्रज्ञाचार्य** ( मध्वाचार्य ) ह्मणण्याचा निर्विवाद सिद्ध असुन त्यांणीं संपूर्ण अद्वैतवादिप्रभृति दुर्वादि मतें तिलशः खंडन करून श्रीहरिसर्वोत्तमत्व, जगत्सत्यत्वादि पंचभेद ज्ञान सज्जीवांकरितां त्या परम वैष्णव श्रीवायुदेवानेंच स्थापन केलें. याकरितां त्याचे वर्णित अवतारत्रयाच्या तीन मूर्ति अथवा एक मुख्यप्राण [ मारुती ] मूर्तीचें, श्रीविष्णूच्या निर्माल्यविसर्जनोत्तर तत्तीर्थानें अभिषेक करून श्रीहरिगंधप्रसादानें पूजाकरावी. तो अभिषेक तन्महिमाप्रतिपादक " **बळित्था** " **मन्युसूक्त** " **ऋषभंमा** " आणि " **वायुस्तुति** " व " **लघुवायुस्तुति** " यांणीं करणें भागच आहे. बळित्थादिमंत्राचा एकदम अर्थ समजण्यासारखा नसतो. करितां श्रीमुख्यप्राणादि अभिषेक वेळीं शीघ्र तन्महिमा लक्ष्यांत येईल अशा अत्युपयोगीं श्रीमत्कवि० नारायणपंडिताचार्यरचित लघुवायुस्तुतीचा अर्थ दाखवितो, ग्रंथारंभीं मंगल०

अथ लघुवायुस्तुतिः ॥ वासुदेवं सदानंदतीर्थं नंदसंदोहसंदानशीलं ॥ स्वामिनं सच्चिदानंदरूपं नंदयामो वयं नंदतीर्थं ॥ १ ॥ श्रीहनूमंतमेकांतभाजं राघवश्रीपदांभोजभृंगं ॥ मारुतिं प्राणिनां प्राणभूतं नंदयामो वयं नंदतीर्थं ॥ २ ॥ भीमरूपं परं पीतवासं भारतं भारतश्रीललामं ॥ भूभरध्वांसिनं भारतीशं नंदयामो वयं नंदतीर्थं ॥ ३ ॥ तत्वचिंतामणिं पूर्णभाजं कृष्णपादारविंदैकदासं॥ चित्रचिंतामणिं पूर्णबोधं नंदयामो वयं नंदतीर्थं ॥ ४ ॥ मायिगोमायुमायांधकारध्वंसमार्तंडमूर्तीयमानं ॥ सज्जनानंदसंदोहधेनुं नंदयामो वयं नंदतीर्थं ॥ ५ ॥ इंदिराकांतमानंदमूर्तिमिंदिरासुंदरामंदमूर्तिं ॥ दासमेकं तथा तत्वदीपं नंदयामो वयं नंदतीर्थं ॥ ६ ॥

---

" **वासुदेवमिति** " आम्ही सर्वभूतांतर्यामी, क्रिडादिगुणविशिष्ट वसुदेवद्वारा प्रादुर्भूत वासुदेवनामक, निरंतर सुखरूपी, आपल्या भक्तांस आनंद समूह देणारा ज्ञानानंद देह, अशा नंदपुत्र ह्मणून घेणार श्रीवेदव्यासाभिन्न श्री कृष्णाला वंदनादिकानें तोषवीत आहो. श्रीवायुदेवाचे अवतार त्रय वर्णन करण्यास इच्छिणारे आरंभीं **हनुमदवतार** वर्णन करितात. "**श्रीहनूमंतमिति** " सज्जनसुखकारक हनुमन्नाटकाख्यकाव्य केलेला यद्वा आनंदतीर्थ ह्मणजे श्रीमध्वाचार्यरूपानें अवतीर्ण एकांती श्रीहरिभजन करणारा, रघुकुलोत्पन्न श्रीदाशरथीरामचरणारविंदीं भ्रमराप्रमाणें आसक्त, वाय्ववतारभूत रुद्रादिजीवगणांतर्यामी असून जीवन देणारा अशा ज्ञानस्वभावविशिष्ट श्रीहनुमंतातें नमस्कारादिकानें संतुष्ट करीत आहों. श्रीवायुदेवाचे द्वितीयावतारभूत श्रीभीमस्वरूप वर्णन करितात. " **भीमरूपामिति** " रुद्रादिकापेक्षां उत्तम, पीतांबरधारी, भरतकुलोत्पन्न, श्रीमहाभारतांत अलंकारत्वानें प्रतिपादित, भूभारभूत जरासंधादि दुर्जन समूह संहार करणारा, द्रौपदीरमण, आनंदतीर्थरूपानें अवतरणारा, श्रीभीमरूपीवायूला नमस्कारादिकानें तोषवीत आहों. श्रीवायुदेवाचा तृतीयावतारभूत श्रीमध्वमुनींचें

वर्णन करितात, " तत्वचिंतेति " अनारोपित ( आहे तसें श्रीहरिस्वरूपज्ञानाचा दानरूप उपदेश करण्याविषयीं ) ह्मणजे श्रीहरीसर्वोत्तमत्व ज्ञान सज्जनांस उपदेशिणें अथवा ऐहिक पारत्रिक पुरुषार्थ देण्याविषयीं इच्छित देणाऱ्या चिंतामणीरूप रत्नाप्रमाणें असणारा, पूर्णगुणश्रीहरीचें सेवन करणारा, श्रीकृष्णचरणारविंदी मुख्य भक्त असलेला, अलौकिक चिंतामणीभूत आनंदतीर्थरूपानें अवतीर्ण पूर्णप्रज्ञनामक आचार्यांतें नमनादिकानें तोषवीत आहों. पुनः त्याच आचार्यांचा महिमा वर्णि-तात. " मायिगोइति " माया ( अविद्या ) शक्तीनें नित्य शुद्ध बुद्ध, मुक्तस्व-रूप ब्रह्मांस अनित्य, अशुद्ध, अबुद्ध, जीवत्व प्राप्त होतें, ह्मणणारे वादिरूप जंबूक ( कोल्हे ) यांचे मतांतील जगन्मिथ्यात्वरूप अंधकारनाशाविषयीं सूर्य समान असून सज्जनांस आनंदसमूह देण्यास कामधेनूप्रमाणें असलेला सुखकारक श्रीमद्वैतशास्त्रसिद्धांत प्रतिष्ठा करणार अशा श्रीमदाचार्यवर्यांतें नमस्कारादिकानें तोषवीत आहों. ग्रंथांतीं अत्यंत इष्ट श्रीहरी व गुरुश्रेष्ठ आनंदतीर्थमुनि यांची प्रार्थना करितात. " इंदिराकांतमिति " सुखमय तनु असलेला लक्ष्मीवत् मनोहर स्वरूप देशतः कालतः गुणतः व्याप्ततनु अशा श्रीलक्ष्मीपतींतें व श्री-हरीचा मुख्य भक्त तत्वज्ञान प्रकाश करणारा, श्रीसुखतीर्थ ( श्रीमन्मध्वाचार्य ) यातेंही नमस्कारादिकानें तोषवीत आहों.

## इति लघुवायुस्तुतितात्पर्यं समाप्तं.

ज्याला बळित्थादि वर्ग इत्यादिक पूर्वोक्त संपूर्ण ग्रंथ पठन करून अभिषेक करणेस अगदींच अवकाश नाहीं, त्याणें या लघुवायुस्तुतिसहित बळित्थादि वर्गानें तरी प्रत्यहीं अचूक मुख्यप्राणाभिषेक केलाच पाहिजे. हा अभिषेक झाल्यानंतर दुसरे दिवशीं प्रातःस्नानोत्तर घेणेंकरितां निर्माल्यपूजाभिषेकाचें तीर्थ काढून ठेवावें. हाच क्रम प्रत्यहीं चालू असावा.

### श्रीमुख्यप्राणाभिषेकविषयः संपूर्णः

आतां पुरुषांनीं व स्त्रियांनीं आवश्यकत्वानें उपनयन झाल्यानंतर पुरुषांनीं, व विवाह झाल्यानंतर स्त्रियांनीं श्रीविष्णुमंत्राचा कुलगुरुद्वारा उपदेश घेऊन अवश्य तो प्रतिदिनीं जपावा. पुरुषांनीं घेण्याचे ते अष्टौ महामंत्र वगैरे पुष्कळच आहेत. तरी त्यापैकीं श्रीनारायणाष्टाक्षर मंत्र पुरुषांनीं, व श्रीकृष्णषडक्षर मंत्र स्त्रियांनीं उपदेश घेणें अवश्य असल्यानें तो प्रकार येथें लिहितो. " ॐॐनमो नारायणाय ॐ " हा अष्टाक्षर नारायणमंत्र होय. यांत परमात्म्यास पूर्ण सद्गुण सांगणारे आद्यंत दोन ॐ कार व मंत्रांग एक, एवं तीन ॐ कार आहेत.

ॐ ॐ नमो नारायणाय ॐ ॥ इतिमंत्रः अनेन ३६, २४,१२ वारं वा यथाशक्ति प्राणायामं कुर्यात् ॥ पंचांग न्यासः ॥ ॐ क्रुद्धोल्काय हृदयायनमः ॐ महोल्काय शिरसे स्वाहा ॥ ॐ विरोल्काय शिखायै वषट् ॐ द्युल्काय नमः कवचाय हुं ॥ ॐ सहस्रोल्काय नमः अस्त्रायफट् इतिदिग्बंधः ॥ अथ अष्टांग न्यासः ॥ ॐ विश्वाय नमः शिरसि ॥ ॐ नं तैजसाय नमः नेत्रयोः॥ ॐ मों प्राज्ञाय नमः नासायां ॥ ॐ नां तुरीयाय नमः वाचि॥ॐ रां आत्मने नमः हृदि॥ॐ यं अंतरात्मने नमः नाभौ ॐ णां पर.जा.॥ॐ यं ज्ञानात्मने नमःपादयोः॥ततः क्रुद्धोल्कादि पंचमंत्रैर्द्विरावृत्या उभयहस्तांगुलीषु न्यस्य ॥

---

मंत्रार्थ—अर म्हणजे दोष तद्विरुद्ध नार म्हणजे गुण त्यास अयन म्हणजे आश्रय, तात्पर्य गुणपूर्ण, अथवा अराश्रय नव्हे जो, तो नारायण निर्दोषी, यद्वा नाराः म्ह० निर्दोष अपौरुषेय वेद, त्यांस अयन म्हणजे तत्प्रतिपाद्य संपूर्ण वेदांनीं प्रतिपादन केलेला, म्हणावयाचें तात्पर्य. नर म्ह० नाशरहित जीव तत्संबंधीं ज्ञान नारशब्दवाच्य होय. त्यास अयन म्ह० आधार, अथवा नरसंबंधीं नार म्ह० सृष्टिस्थित्याद्यष्टकर्तव्य, तत्कर्ता झाल्यानें संपूर्ण जीवांस उत्पत्यादि कर्ता अयन शब्दवाच्य श्रीनारायण होय. सज्जीवांस मुक्तींत अरमण म्ह. दुःख तदयन म्ह० आधारभूत कर्तव्य होत नाहीं ज्याकडून तो, अथवा नाहीं आहे अरमणायन म्ह० दुःखाश्रयत्व ज्यास तो. यद्वा निर्दोष वेदांपासुन उत्पन्न होणारें ज्ञान नारशब्दवाच्य त्यास विषय होणारा अथवा जीवसंबंधीं मुक्त्यादि फल नार शब्दवाच्य तें देण्यास मुख्याधार तो, अथवा निर्दोष नार शब्दवाच्य लक्ष्मीचा अयन म्ह० आधारभूत भर्ता, अथवा आलस्य, नाश, दुःखादि दोषरहित मोक्षांत गेलेले चतुर्मुख ब्रम्हादि जीवगण नार शब्दवाच्य त्यांस अयन म्ह० स्वामी, किंवा नाराः म्ह० उदक ती अयन म्ह. शय्यास्थान ज्यास तो समुद्र-

उद्यद्भास्वत्समाभासच्चिदानंदैकदेहवान् ॥ चक्रशंखगदापद्मधरो ध्येयोहमीश्वरः ॥ लक्ष्मीधराभ्यामाश्लिष्टः स्वमूर्तिगणमध्यगः ॥ ब्रह्मवायुशिवाहीशविपैः शक्रादिकैरपि ॥ सेव्यमानोऽधिकं भक्त्या नित्यनिःशेषशक्तिमान् ॥ मूर्तयोऽष्टावपि ध्येयाश्चक्रशंखवराभयैः ॥ युक्ताः प्रदीपवर्णाश्च सर्वाभरणभूषिताः ॥ चक्रशंखवराभीतिहस्तान्येतानि सर्वशः ॥ मूलरूपसवर्णानि कृष्णवर्णा शिखोच्यते ॥ नारायणं विश्वादिकृद्धोल्कादींश्च ध्यात्वा ॥ अस्य श्रीनारायणाष्टाक्षरमंत्रस्य अंतर्यामिऋषिः परमात्मा श्रीलक्ष्मीनारायणो देवता देवी गायत्री च्छंदः ॥ श्रीलक्ष्मीनारायणप्रेरणया श्रीलक्ष्मीनारायणप्रीत्यर्थं श्रीमन्नारायणाष्टाक्षरमंत्रजपं करिष्ये ॥ इतिसंकल्प्प तुलसीकाष्ठमालया संख्यापूर्वकं जपं कुर्यात् ॥ पुनःपूर्ववत्प्राणायामन्यासौ कृत्वाध्यानश्लोकं पठित्वा यथाशक्ति तर्पणपूर्वकं यस्यस्मृत्या चेति हरौ समर्पयेत् ॥

---

शार्ङ्ग श्रीविष्णु अथवा उदकादि चराचर प्रपंचाला उत्पादक इत्यादि सद्गुणगणमंडित श्रीनारायणाकारणें नमस्कार असो. कोणत्याही मंत्राच्या आदीं आणि अंतीं ॐ कार उच्चारिलेच पाहिजेत. कारण,

स्रवत्यनुंकृतं ब्रह्म परस्तात्तु विशीर्यते ॥

आधीं ॐ कार न घेतल्यास तें मंत्रफल वाहून जातें; व अंतीं न घेतल्यास तदुक्त फल विशीर्ण म्हणजे ( नष्ट ) होतें, ज्या मंत्राचा जप करणें आहे त्याच मंत्रानें बहुशः प्राणायाम सांगतो. तो वर निर्दिष्ट तीन पक्षांपैकीं शक्त्यनुरूप करावा. न्यास वर उल्लेखिल्याप्रमाणें करावे. त्यांतील नामें तत्तन्मंत्र देवतागुण प्रतिपादक होय.

## ध्यानश्लोकार्थ.

उदयमान सूर्यसमान चिदानंदात्मक मुख्य देहयुक्त शंख, चक्र, गदा, पद्म धारण केलेला चतुर्भुज श्री आणि भूदेवी यांणीं आलिंगित स्वस्वरूपभूत मंत्राक्षर प्रतिपादित मूर्तींच्या मध्यभागीं असलेला, चतुर्मुख ब्रम्हदेव, वायु, रुद्र, शेष, गरुड, इंद्रादि सुरगणांनीं अत्यंत भक्तीनें सेवन केलेला, नित्य संपूर्ण शक्ति असें आपलें ध्यान करावें, म्हणून श्रीविष्णूनें स्वतः सांगितलें आहे. करितां **अहमीश्वरः** ही अभेदोक्ति नव्हे. मंत्राक्षर प्रतिपादित आठमूर्तींचें हीं शंख, चक्र, वरदान व अभयमुद्रानींयुक्त याप्रमाणें चतुर्भुज प्रकाशमान वर्ण सर्वाभरणालंकृत मूर्ति ध्यान कराव्या. यां आठहीं मूर्ति व क्रुद्धोल्कादिक पांच मूर्ति, मूलरूपी नाराय-णानें सदृश, भुज, व वर्ण असलेल्या जाणाव्या. **शिखा** म्ह० केशमात्र अत्यंत कृष्णवर्ण जाणावेत. असें ध्यान करून ऋषि, देवता, च्छंद उल्लेखित ध्यानीं घेऊन तुलसीनिर्माल्यदलासह पाणी सोडून जप करावा. आणि वर उल्लेखिल्याप्रमाणें जप समर्पण करावा. हा मंत्र गायत्रीपेक्षां त्रिगुण अधिक, गायत्री जपानंतर जप करावा. तर्पण करणस जल पात्रांत काढून त्या जलांत श्रीकार लिहून त्यावर विष्णूचें आवाहनपूर्वक " **ॐ ॐ नमो नारायणाय नारायणं** " तर्पयामि असें म्हणून तर्पण करावें. **तर्पण संख्या** शक्त्यनुरूप १०८, ५४, २४, १० वेळीं करावें. पूर्व पूर्व संख्या मुख्य पक्ष होय. दशांश तर्पण तें पुनश्चरणास लागू असल्यानें येथें त्याची जरूरी नसते. या मंत्राचा जप तुलसीकाष्ठजन्य अथवा पद्माक्षांच्या मालेनें संख्यापूर्वक करावा, संख्यारहित केल्यास निष्फल होतो.

## आतां कृष्णषडक्षरमंत्रार्थ सांगतों.

" स्त्रियो वा पुरुषा वापि विना पुंड्रं कदाचन ॥ न कुर्युः सुकृतं कर्म क्रियमाणं वृथा भवेत् ॥ १ ॥ सुवासिन्योऽपि बिभृयुस्तिलकोपरि कुं-कुमं ॥ पश्चात्कुर्युः शुभं कर्म गृहकर्माणि यानि च ॥ २ ॥

श्रीकृष्णमंत्रः ॥ स्त्रीभिर्जप्यः ॥ क्लीं कृष्णायनमः ॥ षडंगन्यासः ॥ पूर्णज्ञानात्मने हृदयायनमः ॥ पूर्णऐश्वर्यात्मने शिरसे स्वाहा ॥ पूर्णप्रभात्मने शिखायै वषट ॥ पूर्णानंदात्मने कवचाय हुं ॥ पूर्णतेजसात्मने नेत्राभ्यां वौषट् ॥ पूर्ण शक्त्यात्मने अस्त्राय फट् ॥ इति दिग्बंधः ॥ अस्य श्रीकृष्णषडक्षरमंत्रस्य ब्रह्मा ऋषिः गायत्रीच्छंदः श्रीकृष्णो देवता ॥ अथ ध्यानं ॥ ध्यायेद्धरिन्मणिनिभं जगदेकवंद्यं सौंदर्यसारमरिशंखवराभयानि ॥ दोर्भिर्दधानमजितं सरसं च भैष्मीसत्यासमेतमखिलप्रदमिंदिरेशं इति ध्यात्वा ॥ जपं कुर्यात् ॥ पुनः प्राणायामन्यास ध्यानं कृत्वा श्रीकृष्णाय नमः कृष्णं तर्पयामीति तर्पयेत् ॥ जपसंख्यातु १०००, १०८, २८, १० वा तर्पणं तु यथाशक्त्या १०८, ५४, २४, १० वारंवा कुर्यात् ॥ यस्यस्मृत्येतिहरौ समर्पयेत् ॥

---

**अर्थ**— स्त्रिया अथवा पुरुष यांणीं ऊर्ध्वपुंड् व मुद्रा धारण केल्यावांचून कोणतेंही सुकृतकर्म करूं नये; केल्यास निष्फल होतें. सुवासिनी स्त्रियांनीं देखील कपाळावर गोपीचंदनाचें नाम लावून त्यावर कुंकुमाचा सरळ लांब टिळा करावा आणि त्यानंतर कोणतेंही शुभकर्म अथवा गृहांतील कामें करावींत. तत्पूर्वी करूं नये. याप्रमाणें नाम, मुद्रा, टिळा, आचमन करून संकल्पपूर्वक धारण केल्यानंतर पुनः आचमन, प्राणायाम संकल्प करून आसनप्राणायामपूर्वक श्रीकृष्णषडक्षर मंत्रजप करितें, असें ह्मणून पाणी सोडावें. येथें हा मंत्र स्त्रियांनीं ॐकाररहित म्हणावा. पुरुषांनीं जप करणें असल्यास ॐकारसहित करावा.

**मंत्रार्थ**—कंसादि दुष्ट दैत्यांचा संहार करणारा, अथवा जगत्प्रेरकत्वानें सकल जगत् स्वाधीन करणारा यद्वा आनंदभरित [ पूर्ण ] झाल्यानें कृष्ण असें, अथवा श्रीमन्महाभारतोक्तीप्रमाणें श्रीनारायणाचा स्वरूपभूत कृष्णकेशात्मक श्रीकृष्णनामक श्रीहरीकारणें नमस्कार असो.

अथ लघुतारतम्यस्तोत्रं ॥ वंदे विष्णुं नमामि श्रियमथ च भुवंब्रह्मवायू च वंदे गायत्रीं भारतीं तामपि गरुडमनंतं भजे रुद्रदेवं ॥ देवीं वंदे सुपर्णामहिपतिदयितां वारुणीमप्युमां तामिंद्रादीन्काममुख्यानपि सकलसुरांस्तद्गुरून्मद्गुरूंश्च ॥१॥ अथ तारतम्यस्तोत्रं॥ हरिः ॐ ॥विष्णुः सर्वोत्तमोऽथ प्रकृतिरथविधिप्राणनाथावथोक्ते ब्रह्माणी भारती च द्विजफणिपमृडाश्चस्त्रियः षट्च विष्णोः ॥ सौपर्णी वारुणीच पर्वतपतितनया चेंद्रकामावथास्मान्प्राणोऽथो योऽनिरुद्धो रतिमनुगुरवो दक्षशच्यौ च पांतु ॥ १ ॥ त्रायंतां नः सदैते प्रवह उत यमो मानवी चंद्रसूर्यौ चापोथो नारदोथो भृगुरनलकुलेंद्रप्रसूतिश्च नित्यं ॥ विश्वामित्रो मरीचिप्रमुखविधिसुताः सप्त वैवस्वताख्याश्चैवं वै मित्रतारे वरनिरृतिनामा प्रावहीच प्रसंना ॥२॥ विष्वक्सेनोश्विनौ तौ गणपतिधनपाद्युक्तशेषाः शतस्था देवाश्चोक्तेतरा ये तदवरमनवश्चावनोचथ्यसंज्ञौ ॥ वैन्यो यः कार्तवीर्यः क्षितिपतिशशिबिंदुः प्रियादिव्रतोथो गंगापर्जन्यसंज्ञे शशियमदयितेमाविराट्चाश्शु पांतु ॥ ३ ॥ येभ्योन्येचाग्निजाया च जलमथबुधश्चापि नामात्मिकोषा चैवं भूमौ ततात्मा शनिरपि कथितः पुष्करः कर्मपोपि ॥ येथाथोचाप्युतानामिह कथितसुराः मध्यभागे समास्ते विष्ण्वाद्या नः पुनंतु क्रमगदितमहातारतम्येन युक्ताः ॥ ४ ॥ इति श्रीमन्नारायणपंडिताचार्यविरचिततारतम्यस्तोत्रं समाप्तं ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

## " ध्यानश्लोकार्थ. "

इंद्रनील रत्नाप्रमाणें श्यामवर्ण रमाब्रम्हरुद्रादि जगताला मुख्यत्वेंकरून वंदनीय, परम सौंदर्ययुक्त चक्र, शंख आणि वर व अभयमुद्रा धारण केलेल्या चतुर्भुज, जननमरणादि अशेष दोषरहित मंदहास्योपेत, रुक्मिणी व सत्यभामा यांहायुक्त अखिल कल्याणप्रद लक्ष्मीपति श्रीकृष्णाचें ध्यान करावें. याप्रमाणें न्यासपूर्वक ध्यान करून जप केल्यानंतर पुनः प्राणायाम, न्यास, व ध्यानपूर्वक तर्पण करून, जप कृष्णार्पण करावा. स्त्रियांनीं ॐकारसहित जप करूं नये. हा मंत्र जप करिते वेळीं आदीं व अंतीं याच मंत्रानें ३६,२४,१२ विकल्पानें यथाशक्ति प्राणायाम करावा. स्त्रियांस विवाहोत्तर हा मंत्र घेण्यास अधिकार प्राप्त होतो. **इति कृष्णषडक्षरमंत्रः** आतां वैष्णवांस तारतम्य ज्ञान स्वसिद्धान्ताप्रमाणें जाणणें अवश्य असल्यानें पारायणास अत्यंत उपयोगीं लघुतारतम्यस्तोत्र सार्थ लिहितों. " **वंदे विष्णुं नमामीति** " विश्वव्यापी श्रीविष्णु त्याहून अनंत गुणांनीं अत्यंत हीन व भिन्न असलेली श्रीदेवी लक्ष्मी तथा भूदेवी त्यानंतर बहु गुणांनीं कनिष्ठ चतुर्मुख ब्रह्मदेव व तत्समान श्रीवायुदेव, तथा ब्रह्मपत्नी गायत्री, आणि वायुपत्नी भारती व विष्णुवाहनभूत गरुड देव, तथा विष्णुशय्याभूत शेषदेव, व रुद्रदेव, तथा गरुडपत्नी सौपर्णी शेषपत्नी वारुणी व रुद्रपत्नी उमा [ पार्वती ] तसेंच त्याहून कनिष्ठ इंद्रदेव व कामदेव इत्यादि संपूर्ण सुरगणांस व त्यांच्या गुरूंस व आह्मापेक्षां श्रेष्ठ असलेल्या अस्मद्गुरूंस प्रत्येक तारतम्यानुरूप नमस्कार करितों.

## आतां तारतम्यस्तोत्रार्थ लिहितों.

" **विष्णुः सर्वोत्तमेति** " श्रीविष्णुसर्वोत्तम, त्याहून कनिष्ठ लक्ष्मी, त्यानंतर चतुर्मुख ब्रह्मदेवारम्य नंतर सांगितलेले संपूर्ण जीवगण एकाहून एक कनिष्ठ जाणावे. वायु, ब्रह्मपत्नि, वायुपत्नि, गरुड, शेष, रुद्र, तथा श्रीकृष्णाच्या रुक्मिणी व सत्यभामा वर्ज करून अवशिष्ट ६ स्त्रिया, गरुडपत्नि, शेषपत्नि रुद्रपत्नि इंद्र व काम, अवांतर वायु अनिरुद्ध, कामपत्नी, मनु, बृहस्पति, दक्षप्रजापति, आणि इंद्रपत्नि शची इत्यादि सर्व देव आमचें रक्षण करोत. " **त्रायंतामिति** " प्रवहवायु, यम, मनुपत्नि चंद्रसूर्य अबभिमानी वरुण, नारद, भृगु, अग्निपुत्र, इंद्रपुत्र, विश्वामित्र, मरीचि प्रमुख सप्त ब्रम्हपुत्र, सूर्यपुत्र, मित्रदेव, तारा, निर्ऋति, प्रवहपत्नी इत्यादि देव आम्हांस रक्षण करोत. " **विष्वक्सेनेति** " विष्वक्सेन,

अथ चतुःश्लोकिभारतप्रारंभः ॥ श्रीवेदव्यासायनमः ॥ मातापितृसहस्राणि पुत्रदारशतानि च ॥ संसारेष्वनुभूतानि यांति यास्यंति चापरे ॥ १ ॥ हर्षस्थानसहस्राणि भयस्थानशतानि च ॥ दिवसेदिवसेमूढमाविशंति न पंडितं ॥२॥ ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष नच कश्चिच्छृणोति मे ॥ धर्मादर्थश्च कामश्च स किमर्थं न सेव्यते ॥३॥ न जातु कामान्नभयान्नलोभाद्धर्मं त्यजेत् जीवितस्यापि हेतोः ॥ नित्यो धर्मः सुखदुःखे त्वनित्ये जीवो नित्यो हेतुरस्य त्वनित्यः ॥४॥ इमां भारतसावित्रीं प्रातरुत्थाय यः पठेत्

---

अश्विनीदेव, गणपति, कुबेर, याशिवाय वर उक्तशत देवांत अवशिष्ट राहिलेले व त्याहून कनिष्ठ देव मनु, च्यवनपुत्र, उचथ्य, पृथु, सहस्रार्जुन, शशबिंदु, प्रियव्रत इत्यादि राजे तथा गंगा, पर्जन्य, चंद्रपत्नी, यमपत्नी, विराट् नांवाचा देव, हे सत्वर आमचें रक्षण करोत. ॥३॥ "येभ्योन्ये इति" यांच्याशिवाय दुसरे अग्निपत्नी, जलदेवता, बुध, उषा, शनि, पुष्करनामक कर्माधिपति यांहून निराळे येथें न सांगितलेले पूर्वोक्त देवासमान असलेले तेही तारतम्यावसानभूत श्रीविष्णु सहवर्तमान अनुक्रमानें आम्हांस पावन करोत. ॥४॥ या तारतम्याप्रमाणें श्रीविष्णुसर्वोत्तम जाणून श्रीरमादेवी तत्पत्नी जाणावी. हीं दोन्हीं तत्वें नित्यमुक्त, निर्दोष, संसारसंबंधरहित, प्रकृतिनिमित्तक जननमरणादिरहित जाणावीं. ब्रह्मरुद्रादिक तद्भृत्य एकाहून एक कनिष्ठ असें जाणून ध्यान, पूजा इत्यादि तारतम्यानें प्रति दिवस करावें. नहून सर्व देवसाम्य आणि सर्व देवैक्य आहे असें सर्वथा जाणूं नये.

## इति तारतम्यस्तोत्रार्थः

आतां सर्व इतिहासश्रेष्ठ पंचम वेदभूत श्रीमन्महाभारताचें पारायण प्रतिदिन अचूक करणें अवश्य असल्यानें, व दररोज सर्व भारतपारायण शक्य नसल्यानें तत्सारभूत चतुःश्लोकी भारत सार्थ लिहितों. "मातापितृेति" या संसा-

॥ स भारतफलं प्राप्य परब्रह्माधिगच्छाति ॥५॥ इति श्रीमहाभारते स्वर्गारोहणपर्वणि चतुःश्लोकीभारतं संपूर्णं ॥ अथ चतुःश्लोकीभागवतप्रारंभः ॥ हरिः ॐ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ज्ञानं परमगुह्यं मे यद्विज्ञानसमन्वितं ॥ सरहस्यं तदंगंच गृहाण गदितं मया ॥१॥

---

री प्राण्याला अनेक जन्म असल्यानें जननी व जनक सहस्रावधि, शेंकडो, पुत्र स्त्री इत्यादि व्यक्तींचा अनुभव असणाऱ्या लोकांस अनेक वेळां अनुभव आला असेल, व पुढेंही येईल. ॥१॥ "हर्षेति" हर्षकाल हजारो वेळीं व तद्वत् दुःखकालही शेंकडो वेळीं प्रति दिवशीं मूढ जनांस येऊन तन्निमित्तक सुखदुःखानें तो युक्त होतो. श्रीहरिसर्वोत्तमत्व ज्ञान्यास ही पूर्वोक्त बाधा होत नसते. ॥२॥ "ऊर्ध्वबाहुरिति" श्रीव्यासदेव ह्मणतात. आपण दोनही हात वर उचलून अधर्मीं निरत होऊन नष्ट होणाऱ्या लोकांस उद्देशून आक्रोश करितों कीं, श्रीहरितोषकारक जगदुद्धरणसमर्थ धर्मापासून परम पुरुषार्थरूप मोक्ष आणि ऐहिक संपूर्ण काम मिळत असून, कां तो तुह्मी धर्म आचारीत नाहीं ? इतकेंच नव्हे, पूर्वोक्त धर्मतत्व कोणीही देखील श्रवण करीत नाहींत; असें श्रीव्यासदेव स्वतः सांगतात. ॥३॥ "नजात्विति" कव्हांही ऐहिक सुखाच्या हेतूनें अथवा कोणत्याही दुष्ट राजादिकांच्या भयानें. किंवा विषयसुखाच्या लोभानें धर्म सोडूं नये किंबहुना प्राणसंरक्षणार्थ देखील धर्मत्याग करूं नये. कारण हा श्रीहरीपरमात्मतोषदायक धर्म नित्यसुखात्मक मुक्तिदाता होय. संसारांतील सुखदुःखें अनित्य आहेत, जीव हा नित्य आहे. करितां अनित्य सुखदुःखप्राप्तीविषयीं नित्य जीवानें नित्य मुक्तिदायक धर्म सोडणें उचित नव्हे. ॥४॥ "इमामिति" या भारतसावित्रीचे चार श्लोक प्रातःकालीं शुचिर्भूत होऊन जो पठण करील, तो संपूर्ण श्रीभारतपारायण केल्याचें फल पावून श्रीहरिपरमात्म्याच्या मुक्तिस्थानभूत वैकुंठलोकी जाईल० ॥ ५ ॥ इति चतुःश्लोकीभारतं संपूर्ण

आतां श्रीमद्भागवत द्वितीयस्कंध नवमाध्यायांतील चतुःश्लोकी भागवत सार्थ लिहितो. या परमपूज्य ग्रंथाचेंही प्रतिदिन पारायण करणें आवश्यक आहे. श्रीभगवान् ब्रह्मदेवास ह्मणतात, "ज्ञानमिति" नियमानें मुक्तिप्रत पोंचविणारें

यावानहं यथाभावो यद्रूपगुणकर्मकः ।।तथैव तत्वविज्ञानमस्तु ते मदनुग्रहात् २ अहमेवासमेवाग्रे नान्यद्यत्सदसत्परं। पश्चादहं यदेतच्च योऽवशिष्येत सोऽस्म्यहम् ।।३।। ऋतेर्थं यत्प्रतीयेत न प्रतीयेत चात्मनि । तद्विद्यादात्मनो मायां यथाभासो यथा तमः ।।४।। यथा महांति भूतानि भूतेषूच्चावचेष्वनु ।। प्रविष्टान्यप्रविष्टानि तथा तेषु न तेष्वहं ।।५ ।। एतावदेव जिज्ञास्यं तत्वजिज्ञासुनाऽऽत्मनः ।। अन्वयव्यतिरेकाभ्यां यत्स्यात्सर्वत्र सर्वदा ।।६।। एतन्मतं समातिष्ठ परमेण समाधिना ।। भवान्कल्पविकल्पेषु न विमुह्यति कर्हिचित् ।।७।। इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां संहितायां वैय्यासिक्यांद्वितीयस्कंधे भगवद्ब्रह्मसंवादे चतुःश्लोकीभागवतं संपूर्णं ।। श्रीमद्धनुमद्भीममध्वांतर्गतहयग्रीवार्पणमस्तु ।। ।।

---

स्वबिंबभूत श्रीहरिविषयक विज्ञानानें युक्त मत्स्वरूप दाखविणारें उपनिषत्संवादसहित जें ज्ञान तें मदुक्त तात्पर्यसहित सांग ग्रहण कर. ।।१।। " **यावानहमिति** " देश काल व्याप्तींनें जितक्या अनंत परिमाणानें युक्त असतो व ज्या तऱ्हेचे सत्ता गुणकर्म इत्यादिकांनीं युक्त असतो, तथा ज्या स्वरूपाचे माझे अवतार असतात, आणि मी ज्या प्रकारचीं कर्में करितों, या सर्वांचें योग्यतानुरूप ज्ञान माझ्या अनुग्रहानें तुला यथार्थपणें असो. ।।२।। " **अहमेवासमिति** " सृष्टीच्या पूर्वी स्वतंत्र मी एकटाच होतों. इतर कालकर्मादिक जें होतें, तें अस्वतंत्र असुन माझ्या आधीन होतें; सृष्ट्युत्तर स्थिति कालींही मीच सर्व जगाची स्थिति करीत असूनही अज्ञ जन आपणच स्वतंत्र कर्ता इत्यादि मानतात, जगद्विनाशोत्तरही स्वातंत्र्यानें असणार मी एकटाच होय. अर्थात भूतभविष्यद्वर्तमान कालींही स्वतंत्र तो मी एकटाच. तूं आदिकरून सर्व जीवगण अस्वतंत्र होय. ।।३।। " **ऋतेर्थमिति** " अस्वतंत्र प्रकृति, काल, जीव, कर्में इत्यादिकांचें स्वरूप सांगतों. मला प्रयोजन नसून स्वप्रयोजनासाठीं मला अवलंबून जीं प्रकृत्यादिक

असतात, तीं सर्व माझ्या शक्तीच्या अधीन असलेलीं, मत्प्रतिबिंबरूप किंचित्सादृस्ययुक्त असलेला ब्रह्मादि जीववर्ग जसा मदधीन असून सत्य आहे, तशींच तीं प्रकृत्यादिकही सत्यच आहेत; मिथ्या नव्हेत. तन्निमित्तक बाधक मला नसतें ज्याप्रमाणें एकाद्या रथावर छत्र,चवरी,पानपात्र वगैरे धरणारे व सारथी वगैरे बसलेले असतात; पण ते रथिक ह्मणून घेत नाहींत. तद्वत् जीव, प्रकृती कर्म, काल हे निरंतर माझ्याठाई असले तरी जीवानें जीवन, प्रकृतीनें बंध, कर्मानें फल कालानें जरादि विकार,इत्यादि दोष मला प्राप्त होत नसतात. यावरून त्यांच्या हिताकरितां मात्र तीं माझा आश्रय करून राहतात; मी त्यांस आश्रय करून रहात नाहीं.॥४॥

## श्रीभगवान् दृष्टांतसहित आपली व्याप्ति दाखवितात.

"**यथामहांतीति**" जशीं मोठीं पृथिव्यादि पंचमहाभूतें स्वकार्यभूत लहान मोठीं शरीरें, इंद्रियें, घट, पट, इत्यादि पदार्थांत व्यापून असलीं तरी तद्व्यतिरिक्त स्थलांतही व्यापून असल्यानें त्यांस प्रविष्ट व अप्रविष्ट असेंही ह्मणतात. तसा मी अनंत देश कालादिकांत व्याप्त असल्यानें त्या भूतांत प्रविष्ट आणि अप्रविष्ट असेंही मला ह्मणतात.॥५॥ उक्त व्याप्तीचें स्पष्टीकरण करून उपदेश संपवितात. "**एतावदेवेति**" तत्व जाणण्याची इच्छा करणाऱ्या त्वां इतकेंच जाणिलें पाहिजे कीं, संपूर्ण जीवादि वस्तु असलेल्या ठिकाणीं किंवा नसलेल्या ठिकाणींही मीच सर्वदा सर्व ठिकाणीं व्यापून प्रवर्तक व स्वतंत्र आहे. ॥ ६ ॥ श्रीभगवान् वरदान देतात "**एतन्मतामिति**" चित्तैकाग्र्यानें हें मी सांगितलेलें तत्व निश्चय जाण, त्यायोगें तूं केव्हांही संशयी न राहतां यथार्थ ज्ञानी होशील.७

## इति चतुःश्लोकी भागवतार्थ समास.

## अणुभाष्यार्थ.

श्रीमन्मध्वाचार्य यांणीं स्वीय भक्तजनांस निज द्वैत सिद्धांतसार काढून सुलभ रीतीनें समजण्याकरितां श्रीमद्ब्रह्मसुत्र भाष्यार्थाचा अणुभाष्यनामक चार अध्यायांचा ग्रंथ सद्वैष्णवांस प्रतिदिनीं पारायणोपयोगी रचिला आहे. तो तात्पर्यासह येथें लिहितों. "**नारायणमिति**" या आद्य मंगल पद्यांतील नारायण शब्दाला चार विशेषणें गुणपूर्णत्व, निर्दोषत्व, ज्ञेयत्व, मुक्तगमनार्हत्व अशीं दिलीं आहेत. पूर्वोक्त चारही अर्थ प्रतिपादन करणारे चार अध्याय या ग्रंथांत असून नारायणपदाचेंही उल्लेखित चार अर्थ होतात, अशा गुणपूर्णत्वादि विशेषणयुक्त श्रीनारायणातें नमन करून त्या नारायणाभिन्न गुरुरूप श्रीवेदव्यासांना नमून श्रीव्यासदेवकृत ब्रह्ममीमांसा सूत्रार्थ सांगतो. ॥१॥

॥ श्रीवेदव्यासायनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ हरिः ॐ ॥ नारायणं गुणैः सर्वैरुदीर्णं दोषवर्जितं ॥ ज्ञेयं गम्यं गुरूंश्चापि नत्वा सूत्रार्थ उच्यते ॥१॥ विष्णुरेव विजिज्ञास्यः सर्वकर्तागमोदितः ॥ समन्वयादीक्षतेश्च पूर्णानंदोंतरः खवत् ॥२॥ प्रणेता ज्योतिरित्याद्यैः प्रसिद्धैरन्यवस्तुषु ॥ उच्यते विष्णुरेवैकः सर्वैः सर्वगुणत्वतः ॥३॥ सर्वगोप्ता नियंता च दृश्यत्वाद्युज्झितः सदा ॥ विश्वजीवांतरत्वाद्यैर्लिंगैः सर्वैर्युतः स हि ॥४॥ सर्वाश्रयः पूर्णगुणः सोक्षरः सन हृदब्जगः ॥ सूर्यादिभासकः प्राणप्रेरको दैवतैरपि ॥५॥ ज्ञेयो न वेदैः शूद्राद्यैः कंपकोन्यश्च जीवतः ॥ पतित्वादिगुणैर्युक्तस्तदन्यत्र च वाचकैः ॥६॥ मुख्यतः सर्वशब्दैश्च वाच्य एको जनार्दनः ॥ अव्यक्तः कर्मवाक्यैश्च वाच्य एको मितात्मकः ॥७॥ अवांतरं कारणं च प्रकृतिः शून्यमेव च ॥ इत्याद्यन्यत्र नियतैरपि मुख्यतयोदितः॥ शब्दैरतोनंतगुणो यच्छब्दा योगवृत्तयः ॥८॥ इति प्र०

---

## प्रथमाध्यायतात्पर्य.

"विष्णुरेवेति" मुमुक्षु साधु जनांनीं श्रीविष्णुच सर्वोत्तमत्वानें विचारार्ह तोच सर्व जगत्कर्ता संपूर्ण वेद प्रतिपादित ह्मणजे उपक्रमादि लिंगानीं जाणावें. त्या हरि परमात्म्यास अपरोक्षतः पाहतां येत असल्यानें सर्व शब्दांनीं अवाच्य, निराकार, निर्गुणत्व सांगू नये तो पूर्णानंद सर्वांतर्यामी आकाशाप्रमाणें अलिप्त असून व्याप्त जगन्नियामक असतो. २ इतर वस्तुवाचक ज्योतिरादी शब्दांनीं तोच श्रीविष्णु मुख्यवाच्य होय. कारण, तत्तद्गत सर्व गुण त्याच्या अधीन आहेत. ३ तो सर्वव्यापी, सर्व संहारकर्ता, सर्व नियामक संपूर्णपणानें जाणतां येणें अशक्य सर्व जीवांत प्रेरकत्वादि चिन्हयुक्त आहे ॥४॥ सर्वाश्रय, पूर्णगुण व देहहानि, दुःखप्राप्ति, अपूर्णत्व, अस्वातंत्र्य इत्यादि चतुर्विध नाशरहित, सर्व हृद्गत, सूर्य,

श्रौतस्मृतिविरुद्धत्वात्स्मृतयो न गुणान्हरेः ॥ निषेद्धुं शक्नुयुर्वेदाः नित्यत्वान्मानमुत्तमं ॥ १ ॥ देवतावचनादापोवदंतीत्यादिकं वचः ॥ नायुक्तवाद्यसन्नेव कारणं दृश्यते क्वचित् ॥२॥ असज्जीवप्रधानादिशब्दा ब्रह्मैव नापरं ॥ वदंति कारणत्वेन क्वापि पूर्णगुणो हरिः ॥३॥ स्वातंत्र्यात्सर्वकर्तृत्वान्नायुक्तं तद्वदेत् श्रुतिः ॥ भ्रांतिमूल-

---

आणि मुख्यप्राणादि सर्व देवता प्रेरक आहे. ॥५॥ सर्व देवांनीं जाणण्यास योग्य, शूद्रांनीं वेदद्वारा जाणण्यास अयोग्य, सर्व रमाब्रह्मादि जगत् कांपविणारा, सर्व रमाब्रह्मादि जीवगणांपासून अत्यंत भिन्न, जगत्पालकत्वादि गुणयुक्त, अव्यक्त कर्म वाचकत्वादि इतर वाचक शब्दानेंही मुख्यत्वानें प्रतिपादित, भक्ताचे जन्मादि दोष दूर करणारा, नंतर अवतार घेणारा, प्रकृति शून्य इत्यादि अन्यत्र प्रसिद्ध शब्दांनीं तत्तद्गुण स्वाधीन असल्यानें मुख्यत्वानें प्रतिपादित, अमुख्य कारणास प्रेरणा करणारा, संपूर्ण मंगलगुणयुक्त, सर्व शब्दवाच्य श्रीविष्णूच होय. ६।७।८

इति प्रथमाध्यायार्थः

## आतां द्वितीयाध्याय तात्पर्य.

" श्रौतस्मृतीति " श्रुत्यनुकूल स्मृति विरुद्ध असलेल्या पाशुपत, गाणपत, सौर, शाक्त इत्यादि ( शिव, गणपति, सूर्य, शक्ति इत्यादिकांस सर्वोत्तम सांगणाऱ्या ) निर्मूलस्मृति श्रीहरीचे सर्वोत्तमत्वादि गुण निषेध करण्यास समर्थ नव्हेत, वेद अपौरुषेय, नित्य, निर्दोषी, असल्यानें उत्तम प्रमाण होय. वेदांत मृत्तिका, उदक इत्यादि जडपदार्थांस ( मृदब्रवीत्, आपोब्रुवन् ) असंभावित वचनाक्रियादि व्यवहार सांगितले आहेत, ते अंतर्गत देवतापर जाणावे. यदर्थ वेदोक्त हे कदापीही अयोग्य होणार नाहीं. असत शशशृंगादिकांपासून कोणतेंही कार्य होणें नसल्यानें वेदांतील असत जीव, प्रधान, इत्यादि शब्दांनीं पूर्णगुण, स्वतंत्र सर्व कर्ता, श्रीहरीच जगत्कारण सांगितला आहे. श्रुति अयोग्य बोलणार नाहीं. इतर पाशुपतादिक वेदविरुद्ध सिद्धांत भ्रांति

तया सर्वसमयानामयुक्तत: ॥ ४ ॥ न तद्विरोधाद्वचनं वैदिकं शंक्यतां व्रजेत्॥आकाशादिसमस्तं च तज्जं तेनैव लीयते ॥५॥ सोनुत्पत्तिलयः कर्ता जीवस्तद्वशगः सदा॥ तदाभासो हरिः सर्वरूपेष्वपि समः सदा ॥६॥ मुख्यप्राणश्चेंद्रियाणि देहश्चैव तदुद्भवः ॥ मुख्यप्राणवशे सर्वं स विष्णोर्वशगः सदा ७ सर्वदोषोज्झितस्तस्माद्भगवान्पुरुषोत्तमः। उक्ता गुणाश्चाविरुद्धास्तस्य वेदेन सर्वशः ८ इ. द्वि. ॐ शुभेन कर्मणा स्वर्गं निरयं च विकर्मणा ॥ मिथ्याज्ञानेन च तमो ज्ञानेनैव परं पदं ॥ १ ॥ याति तस्माद्विरक्तः सन् ज्ञानमेव समाश्रयेत् ॥

---

मूलक झाल्यानें अयोग्य जाणावे. त्यांच्या विरोधानें वेदास अप्रामाण्य सांगू नये; आकाशादि संपूर्ण जगत् त्या श्रीहरीपासूनच उत्पन्न होऊन तोच या संपूर्ण जगाचा नाश करणारा आहे त्या श्रीहरीस उत्पत्ति, नाश, जरा, अज्ञान इत्यादि दोष नसून संपूर्ण ब्रह्मादि जीवसमुदाय तदधीन आणि त्याच्या चेतनत्व व हस्तपादादिरूप किंचित् सादृश्य युक्त जाणावा. श्रीहरीचा अवतार व मूलरूप यांत भेद नसून स्वातंत्र्यादि अनंत सद्गुण परिपूर्ण मूलरूपच श्रीरामकृष्णादि अवताररूपें जाणावीं. मुख्यवायु व इंद्रियें आणि देह वगैरे सर्व प्रपंच श्रीहरी परमात्म्यापासूनच उत्पन्न झाला असून श्रीमुख्यप्राणापेक्षां कनिष्ठ असलेला सर्व प्रपंच मुख्यप्राणाच्या अधीन आहे, व तो मुख्यप्राण सर्वदा श्रीविष्णूच्या आधीन असतो. ॥७॥ ह्मणून तो श्रीविष्णु सर्व दोषगंधरहित ह्मणून वेदांनीं सांगितलेलें श्रीविष्णूचे ज्ञानानंदादि गुणांस कोणताही विरोध येत नाहीं. ॥ ८ ॥

इति द्वितीयाध्यायार्थः

## आतां तृतीयाध्यायार्थतात्पर्य.

"शुभेनेति" सत्कर्मानें हा जीववर्ग स्वर्गगामी, व वाईट कर्म करणारा नरकगामी आणि जीव व ईश हा एकच. ईश हा निर्गुण, निराकार सर्व शब्दांनीं अवाच्य मिथ्या ज्ञानानें उत्थान नसलेल्या तमोनामक घोर नरकीं जातो. श्रीहरी

सर्वावस्थाप्रेरकश्च सर्वरूपेष्वभेदवान् ॥ २ ॥ सर्वदेशेषु कालेषु स एकः परमेश्वरः ॥ तद्भक्तिस्तारतम्येन तारतम्यं विमुक्तिगं ॥३॥ सच्चिदानंद आत्मेति मानुषैस्तु सुरेश्वरैः ॥ यथाक्रमं बहुगुणैर्ब्रह्मणात्वखिलैर्गुणैः ॥ ४ ॥ उपास्यः सर्ववेदैश्च सर्वैरपि यथाबलं ॥ ज्ञेयो विष्णुर्विशेषस्तु ज्ञाने स्यादुत्तरोत्तरं ॥५॥ सर्वेपि पुरुषार्थाः स्युर्ज्ञानादेव न संशयः ॥ न लिप्यते ज्ञानवांश्च सर्वदोषैरपि क्वचित् ॥६॥ गुणदोषैः सुखस्यापि वृद्धिर्‍हासौ विमुक्तिगौ ॥ नृणां सुराणां मुक्तौ तु सुखं क्लृप्तं यथा क्रमं ॥७॥ इति तृ०

---

सर्वोत्तम तो आणि त्याची पत्नी लक्ष्मी हीं नित्यमुक्त ब्रह्मा, वायु, शेष, गरुड, रुद्र. इत्यादि संपूर्ण तृणादि जीववर्ग संसारी, बद्ध, दुःखी इ. श्रीहरिसर्वोत्तमत्वज्ञानानें योग्यता तारतम्यानुरूप मुक्त होणारा पंचभेद संसारांत तसेंच मुक्तींत देखील सत्य, नित्य, अशा यथार्थ ज्ञानानें सर्वोत्तम श्रीविष्णुलोकीं जाऊन संसारमुक्त होतो. करितां वरील यथार्थ ज्ञानाचा विरक्तिपूर्वक आश्रय करावा. जागृत, स्वप्न, सुषुप्त्यादि सर्वावस्था प्रेरक, सर्व अवताररूपांनीं अभिन्न, सर्व देशकालीं मुख्य ईश्वर श्रीविष्णूच होय. त्याची भक्ति स्वस्वयोग्यतानुरूप ब्रह्मादि जीवगण करीत आले आहेत, करितां मुक्तींत देखील उच्चनीचत्वरूप तारतम्य असतेंच; मनुष्यांनीं सत ( निर्दोष ). चित् ( ज्ञानात्मक ), आनंद ( सुखात्मक ), आत्मा (सर्व व्यापी, सर्व सद्गुणपूर्ण ) ह्मणून चार गुणयुक्त आहे ह्म. श्रीविष्णूची उपासना करावी, देवांनीं आपापल्या योग्यतेला अनुसरून ज्ञात होतील तितक्या गुणांनीं उपासना करावी, चतुर्मुख ब्रह्मदेवानें सर्व अनुरूप गुणांनीं उपासना करावी. सर्वांनीं यथाशक्ति सर्व वेदांनी श्रीविष्णु जाणून उपासना योग्यतानुरूप केली असतां अनुरूप ज्ञान उत्पन्न होतें. सर्व ऐहिक पारलौकिक पुरुषार्थ श्रीहरी ज्ञानानेंच प्राप्त होतात. ज्ञानी जन कोणत्याही दोषांनीं लिप्त होत नाहींत; गुण व दोषांनीं मुक्तींत आनंदवृद्धि व ऱ्हास ज्ञान्याला होतात. मानवांला व सुरांला नियमित सुख तें मुक्तींत आहे.

इति तृतीयाध्यायार्थः

ॐ विष्णुर्ब्रह्म तथा दातेत्येवं नित्यमुपासनं ॥ कार्यमापद्यते ब्रह्म तेन यात्यपरोक्षतां ॥ १ ॥ प्रारब्धकर्मणोन्यस्य ज्ञानादेव परिक्षयः ॥ अनिष्टस्योभयस्यापि सर्वस्यान्यस्य भोगतः ॥ २ ॥ उत्तरेपूत्तरेष्वेवं यावद्वायुं विमुक्तिगाः ॥ प्रविश्य भुंजते भोगांस्तदंतर्बहिरेव वा ॥३॥ वायुर्विष्णुं प्रविश्यैव भोगांश्चैवोत्तरोत्तरं॥ उत्क्रम्य मानुषा मुक्तिं यांति देहक्षयात्सुराः ॥४॥ अर्चिरादिपथा वायुं प्राप्य तेन जनार्दनं ॥ यांत्युत्तमा नरोत्ताद्या ब्रह्मलोकात्सहामुना ॥५॥ यथासंकल्पभोगांश्च चिदानंदशरीरिणः ॥ जगत्सृष्ट्यादिविषयं महासामर्थ्यमप्यृते ॥६॥ यथेष्टशक्तिमंतश्च विना स्वाभाविकोत्तमान् ॥ अनन्यवशगाश्चैव वृद्धिन्हासविवर्जिताः ॥ दुःखादिरहिता नित्यं मोदंतेविरतं सुखं ॥७॥ पूर्णप्रज्ञेन मुनिना सर्वशास्त्रार्थसंग्रहः ॥ कृतोयं प्रीयतां तेन परमात्मा रमापतिः ॥८॥नमो नमोशेषदोषदूरपूर्णगुणात्मने ॥ विरिंचशर्वपूर्वेड्यवंद्याय श्रीवराय ते ॥९॥ इति श्रीमत्कृष्णद्वैपायनकृतब्रह्मसूत्राणुभाष्ये श्रीमदानंदतीर्थभगवत्पादाचार्यविरचिते चतुर्थोध्यायः समाप्तः ॥ ४ ॥

---

## चतुर्थाध्यायतात्पर्य

" विष्णुर्ब्रह्मेति " श्रीविष्णु गुणपूर्ण, निर्दोष, सर्व वेदप्रतिपाद्य, मुक्त्यादि फलदाता, अशी निरंतर उपासना केल्यानें चतुर्मुख ब्रह्मद्वारा अपरोक्ष ज्ञान पावतो; त्या अपरोक्ष ज्ञानानें प्रारब्धकर्मव्यतिरिक्त मुक्तीस जाण्यास प्रतिबंधभूत असलेलीं पुण्यपापें यांपासून मुक्त होतो. प्रारब्धकर्म भोगल्यानें नष्ट होतें. वायुदेवापर्यंत मुक्तींत जाणाऱ्यांनी स्वस्वोच्च प्रवेशद्वारा वा [illegible] लागतें; तो वायुदेव श्रीविष्णुप्रत नेतो. त्यानंतर ते उच्च प्रवेशांनीं गेलेले श्रीहरीच्या स-

अथ मध्वाष्टकं ॥ अज्ञाननाशाय सतां जनानां कृतावताराय वसुंधरायां ॥ मध्वाभिधानाय महामहिम्ने हताघसंघाय नमोनिलाय ॥ १ ॥ येन स्वसिद्धांतसरोजमध्दा विकासितं गोभिरलं विशुद्धैः ॥ दुस्तर्कनीहारकुलं च भिन्नं तस्मै नमो मध्वदिवाकराय ॥ २ ॥

---

क्षुरादि अंगांपासून उत्पन्न झालेले देव श्रीविष्णुचे देहांत प्रवेश करून अथवा बाहेर श्रीविष्णुपासून सर्वदा भिन्न होत्सातेच स्वयोग्यतानुसार भोग भोगतात. मनुष्य देहापासून उत्क्रमण पोहोंचून मुक्तींत जातात अर्चिरादि मार्गानें वायूप्रत पोहोंचून तद्द्वारा विष्णुप्रत व मानव श्रेष्ठ चतुर्मुख ब्रह्मलोकीं जावून ब्रह्मासह मुक्तींत जातात. मुक्तींत गेलेले ब्रह्मादि सर्व जीवगण ज्ञानानंदात्मक देहयुक्तहोत्साते स्वेच्छानुरूप भोग भोगतात. केवल जगत्सृष्टिकर्तृत्वादि, तथा लक्ष्मीपतित्व, कौस्तुभधारित्व श्रीविष्णूचे स्वातंत्र्यादि महा सामर्थ्यावांचून स्वयोग्यता तारतम्यास अनुसरून स्वेच्छाधीनहोत्साते देशकालादि निमित्तक, नाशादि दोषरहित निरंतर सुख पावतात; याप्रमाणें पूर्णप्रज्ञ ह्मणजे श्रीमन्मध्वाचार्य यांणीं सर्व शास्त्रार्थाचा सारसंग्रह केला आहे. त्याणें [ ग्रंथ करण्यानें ] परमात्मा लक्ष्मीपति तुष्ट होवो.

## ग्रंथांतीं मंगल.

" नमोनमोइति " निखिल दोषरहित, सद्गुणभरित ब्रह्मरुद्रादि जीववर्गस्तुत्य, सर्व वंद्य, श्रीलक्ष्मीपाति नारायणाकारणें नमस्कार असो. आदरपूर्वक नमस्काराची द्विरुक्ति केली आहे.

## इति चतुर्थाध्यायार्थः

श्रीहरिसर्वोत्तम ज्ञान जसें आत्यंतिक मुक्तिरूप परम पुरुषार्थ देणारें होतें, तद्वत् मतस्थापक आदिगुरुवर्य " श्रीमन्मध्वाचार्य " यांचेंही माहात्म्य श्रीहरिभक्तिदायक परमसाधन होय. करितां

## श्रीन्मध्वाष्टकसार्थ लिहितों.

" अज्ञाननाशायेति " सज्जनांचें अज्ञान नाश करण्याकरितां भूमिवर अवतार घेतलेला उत्कृष्ट महिमायुक्त, नाशितपापसमुदाय, श्रीवायुदेवावतारभूत श्रीमध्वनामक गुरूंकारणें नमस्कार असो. १ "येनेति" ज्याणें स्वीय द्वैतसिद्धांत रूपकमल निर्मल अशा वेदवाणीनें प्रफुल्लित केलें, आणि दुष्ट अद्वैतमतादि

प्रपन्नतापप्रशमैकहेतुं दुर्वादवादींधनधूमकेतुं॥निरंतरं नि-
र्जितमीनकेतुं नमाम्यहं मध्वमुनिं प्रकांडं॥३॥शांतं महांतं
नतपादुकातं कांतं नितांतं कलितागमांतं॥ स्वांतं नयंतं त्रि-
पुरारिकांतं कांतं श्रियो मध्वगुरुं नमामि॥ ४ ॥ पुनान-
नाम्ने मुरवैरिधाम्ने संपूर्णनाम्ने समधीतसाम्ने ॥ संकीर्ति-
ताधोक्षजपुण्यनाम्ने नमोस्तु मध्वाय विमुक्तसम्ने ॥ ५ ॥
सन्मानसंसज्जनताशरण्यं सन्मानसंतोषितरामचंद्रं ॥ स-
न्मानसंव्यक्तपदं प्रशांतं नमाम्यहं मध्वमहामुनीशं ॥६॥
संस्तूयमानाय सतां समूहैश्चंद्रायमानाय चिदंबुराशेः ॥
दीपायमानाय हरिं दिदृक्षोरलं नमो मध्वमुनीश्वराय॥७॥
गुणैकसिंधुं गुरुपुंगवं तं सदेकबंधुं सकलाकलापं ॥ मनो-
जबंधुं नतपादपद्मं नमाम्यहं मध्वमुनिं वरेण्यं ॥ ८ ॥
मध्वाष्टकं पुण्यतमं त्रिसंध्यां पठंति यद्भक्तियुता जना ये

---

कुतर्करूप हिमवृंद छेदिलें अशा त्या मध्वगुरूकारणें ह्य. (सूर्याकारणें) नमस्कार असो. ॥२॥ "प्रपन्नेति" शरणागत तापत्रय नाशनाविषयीं मुख्यकारण, दुष्ट अद्वैतादिवादजन्य ज्ञानरूप शुष्क काष्ठ दहनाविषयीं अग्निसमान निरंतर जितकामादि षड्वर्ग अशा मुनिश्रेष्ठ श्रीमध्वमुनींतें नमस्कार असो. ॥३॥ "शांतमिति" भगवन्निष्ठचित्त, महा महिमाविशिष्ट, रुद्रादिकांनीं वंदितचरण, अत्यंत सुंदर, संपूर्ण अपौरुषेय व पौरुषेय आगमार्थ जाणलेला, श्रीलक्ष्मीपति हरिप्रत चित्त लावून ध्यान करणार, रुद्रचित्ताल्हादक मूर्ति, अशा श्रीमध्वमुनींतें नमन करितों. ॥४॥ " पुनाननाम्नेइति " पवित्रकारक नाम असलेला, श्रीहरि मुख्यसानिध्यास योग्य, अनेक शब्दार्थगुणयुक्त अधीत सामवेद, श्रीहरीचें पुण्य नाम निरंतर कीर्तन करणारा, मुक्तगुणशेखर अशा श्रीमध्वाकारणें नमस्कार असो. ॥५॥ " सन्मानसामिति " निर्मल चित्त सज्जनरक्षक, सद्भक्तिपूर्वक, श्रीरामचंद्रास तोषविलेला, सज्जन बहुमानानें अभिव्यक्त स्वरूप अत्यंत भगवन्निष्ठ मुनिश्रेष्ठ अशा श्रीमध्वमुनींतें नमस्कार करितों ॥६ ॥ " संस्तूयमानायेति "

तेषामभीष्टं वितनोति वायुः श्रीमध्वनामा गुरुपुंगवोयं ॥९॥ परमपुरुषश्रीचरणसरोरुहमधुकररूपकमानसमुदितं॥ गुरुकुलतिलकं श्रीमदानंदतीर्थयोगिवरमहं सततं वंदे ॥१०॥ इति श्रीत्रिविक्रमपंडिताचार्यविरचितं मध्वाष्टकं समाप्तं ॥ श्रीमध्वेशः प्रीयतां ॥

---

आचम्य प्राणानायम्य देशकालौ संकीर्त्य॥अन्नसंस्कारार्थं आत्मशुद्ध्यर्थं पंचसूनादोषपरिहारार्थं गृहसिद्धान्नद्रव्येण पावकाग्नौ अग्न्यंतर्गत श्रीपरशुरामप्रेरणया श्रीपरशुरामप्रीत्यर्थं सायंप्रातःवैश्वदेवाख्यं होमं करिष्ये ॥ इति

---

सज्जन समूहांनीं सम्यक् स्तविलेला, ज्ञान समुद्रास वृद्धिदायक चंद्रतुल्य, श्रीहरि दर्शनापेक्षी यांस दीपवत् प्रकाशक मुनीश्वर श्रीमध्वाकारणें नमस्कार असो. ॥७॥ " गुणैकसिंधुमिति " श्रीहरिज्ञानभक्त्यादि गुणसमुद्र, गुरुश्रेष्ठ सज्जनांसमुल्य बांधवभूत, सकल विद्या संपूर्ण, मदनवत् भगवत्पुत्र स्थानीय, रुद्रादि जीववर्गांनीं नमस्कृत चरणारविंद मुनिश्रेष्ठ अशा श्रीमध्वमुनीकारणें नमस्कार करितों. ॥८॥ " मध्वाष्टकमिति " हें पवित्रकारक मध्वाष्टक श्रीहरिप्रसादपात्र मध्वमुनिभक्ति युक्त होऊन जे लोक त्रिकालीं पठण करितात त्यास हा गुरुश्रेष्ठ श्रीमध्वनामक वायुदेव अत्यंत हित करितो ॥९॥ " परमेति " सर्वोत्तम श्रीहरिचरण कमला प्रत भ्रमरतुल्य चित्त असलेला, नित्य प्रकाशयुक्त, गुरुकुलश्रेष्ठ, श्रीमदानंदतीर्थ योगिश्रेष्ठ मध्वमुनीतें निरंतर चित्तीं धारण करितों. ॥१०॥

इति श्रीत्रिविक्रम पंडिताचार्य विरचित मध्वाष्टकस्य तात्पर्य संपूर्ण

श्रीमद्धनुमद्भीममध्वांतर्गत रामकृष्णवेदव्यासात्मक श्रीलक्ष्मीहयग्रीवार्पणम॰

## आतां वैश्वदेवविधान सांगतों.

हें वैश्वदेवविधान संपूर्ण देवतृप्तिकारक होय. त्यायोगें अन्नसंस्कार, आत्मशुद्धि तथा पंचसूनादोष परिहार होतो.

कंडणी पेषणी चुल्ली उदकुंभी प्रमार्जनी ॥ पंचसूना गृहस्थस्य दोषो भवति सर्वदा ॥ तद्दोषपरिहारार्थं वैश्वदेवादिकं चरेत् ॥ गृहस्थो वैश्वदेवाख्यं कर्म प्रारभते द्विजः॥ अन्नस्याप्यात्मनश्चैव संस्कारार्थमि

होष्यते ॥ गृहसिद्धान्नमादाय अधिश्रित्यानले च तत् ॥ प्रोक्ष्योद्वास्य घृताभ्यक्तं हृदि सव्यं निधाय च ॥ त्रिधा विभज्य पकान्नं समीपेऽग्नौ निधाय च ॥ पर्यग्निकरणे कृत्वा सिद्धान्नस्याप्ययं विधिः ॥ "

अर्थ–पंचसूनादोष हे धान्यनिमित्तक होय. ह्मणजे धान्य कांडते वेळीं व दळत असतां, किंवा वांटत असतां, तथा विस्तव पेटविते वेळीं, आणि पाणी भरते वेळीं व झाडत असतां व सारवत असतां, एवं अन्न तयार करण्यास या पांचही कर्मांची जरूरी असून त्यायोगें अल्पतर प्राण्यांची पांच प्रकारानें हत्यानिमित्तक दोष गृहस्थाश्रम्यास होतो. तद्दोष परिहारार्थ वैश्वदेवकर्म सायं-प्रातः एक तंत्रानें अथवा सायंकाळीं प्रत्येक तदुक्त विधानानें करावें. हें कर्म अन्न व आत्मशुद्ध्यर्थ सांगितलें आहे. गृहसिद्धान्न घेवून अग्न्यावाहनादिपूर्वक घृतमिश्राहुती सव्य हस्त हृदयावर ठेवून त्रिधा विभक्त अन्नांतील एक भागानें वैश्वदेव करावा. आचमनप्राणायाम वगैरे वर सांगितल्या प्रकारानें करून अन्त्यंत-र्यामि श्रीपरशुराम मूर्ति श्रीहरिप्रीत्यर्थ प्रातःकाळीं व सायंकाळीं निरनिराळा वैश्वदेव करणें असल्यास प्रातः वैश्वदेवाख्यं कर्म करिष्ये, सायं वैश्वदेवाख्यं कर्म करिष्ये असा भिन्न भिन्न संकल्प त्या त्या काळीं करावा. एकतंत्रानें करणें अस-ल्यास सूर्यादि ब्रह्मपर्यंत दश आहुती देऊन नंतर अग्नये स्वाहा प्रजापतये स्वाहा एवं १२ आहुती द्याव्या. निराळा करणें असल्यास सायंकाळीं अग्नये स्वाहा येथपासून ब्रह्मणे स्वाहापर्यंत दश आहुती द्याव्या. सूर्याला आहुती देण्याची गरज नाहीं;

"अथाग्निकार्यं वक्ष्यामि कुंडे वा स्थंडिलेपि वा॥ वेद्यां वाप्यायसे पात्रे मृन्मये वा नवे शुभे ॥ "

या उक्तीवरून वैश्वदेवास कुंड, स्थंडिल, वेदी इत्यादिकांची जरूरी असते.

" अकृत्वा वैश्वदेवं तु योऽन्नं भुंक्ते द्विजाधमः ॥ स भुंक्ते हि कृमीन्स-र्वान्काकयोनिषु जायते ॥"

अर्थ–जो ब्राह्मणाधम वैश्वदेव न करितां भोजन करितो, तो तें अन्न-रूप सर्व कृमी भक्षितो. या पाप निमित्तानें अन्य जन्मीं काक योनींत उत्पन्न होतो.

" यदि स्याल्लौकिके पाकस्ततैवाग्नौ प्रहूयते॥ गृह्याग्नौ पचनं चेत्स्यात् होमं तत्रैव चाचरेत् ॥ यस्मिन्नग्नौ पचेदन्नं तस्मिन्होमं समाचरेत् ॥ "

अर्थ–लौकिकाग्नींत पाक केला असेल तर त्या अग्नींतच हवन करावें, गृह्याग्नींत पाक केला असल्यास तेथें, तात्पर्य ज्या अग्नींत पाक केला असेल, त्या अग्नींतच वैश्वदेव करावा.

**" वैश्वदेवे तु सर्वान्नं पवित्रं लवणं विना ॥ दत्वा विष्ण्वाहुतीः पूर्वं मंत्रैरष्टाक्षरादिभिः ॥ वैश्वदेवं प्रकुर्वीत अन्यथा किल्बिषी भवेत् ॥ "**

अर्थ–वैश्वदेवाला लवण मिश्र पदार्थांवांचून अन्य सर्वान्न पवित्र होय; अष्टाक्षरादिकानें विष्ण्वाहुति आधीं देऊन नंतर इतर द्याव्या. असें न केल्यास दोषी होतो.

**" विष्णोर्नैवेद्यशेषेण वैश्वदेवं समाचरेत् ॥ विष्णोराहुतिमुत्सृज्य वैश्वदेवं करोति यः ॥ देवतास्तन्न गृण्हंति वैश्वदेवो निरर्थकः ॥ "**

अर्थ–श्रीविष्णूस अर्पित अन्नादिकानें वैश्वदेव करावा आणि वैश्वदेव कालींही श्रीविष्णूस अष्टाक्षरादिकानें आहुती द्याव्या, त्या न देतां वैश्वदेव करून इतर देवतादिकांस आहुती दिल्यास देवता त्या आहुति घेत नाहींत; इतकेंच नव्हे, वैश्वदेव देखील निरर्थक होय. [ आतां येथें सहज एक शंका उत्पन्न होते कीं, ] श्रीविष्णूच्या नैवेद्यशेषानें वैश्वदेव केल्यास एकदां नैवेद्य केलेलेंच अन्न पुनः आहुतिरूपानें वैश्वदेव कालीं श्रीविष्णूस अर्पण केल्यासारखें होतें, तर याविषयीं प्रमाण **स्मृतिकौस्तुभांत वैश्वदेव प्रकरणीं** वरीलप्रमाणें ब्रह्मदेवाचा आक्षेप आला असतां श्रीविष्णूनें समाधान केल्याबद्दल इतिहास दाखविला आहे. तो असा. " **ब्रह्मोवाच** " —

**" छिंधि सर्वज्ञ देवेश संशयं मे महत्तरं ॥ विष्णोर्नैवेद्यशेषेण वैश्वदेवादिकं चरेत् ॥ इत्युक्तं तु त्वया पूर्वं तत्र मे संशयो महान् ॥ त्वदर्पितान्नं देवेश देवानामुचितं नृणां ॥ भक्तानां मोक्षदं यस्मात्तस्मात् ग्राह्यं तु मन्मुखैः ॥ त्वदर्पितं तु नैवेद्यं कथं त्वं पुरुषोत्तम ॥ गृण्हासि मोहाधिष्ठाने त्वदुच्छिष्टं यतः पुरा ॥ "**

अर्थ-ब्रह्मदेव म्ह० हे सर्वज्ञ देवश्रेष्ठ नारायणा, तुझ्या नैवेद्यशेषानें वैश्वदेव करावा, असें पूर्वीं तूं सांगितलें आहे तर त्वदर्पित अन्नादिक त्वद्भक्तभूत अस्मदादिक देवांस, आणि मनुष्यांस मोक्षदायक असल्यानें गृहण करणें उचितच होय. तुझ्या प्रतिमा शालग्रामादि अधिष्ठानांत एकदां अर्पण केलेंचें उच्छिष्टभूत तूं पुनः वैश्वदेवांतील आहुतिरूपानें स्वीकारितोस असा ब्रह्मदेवास आलेला महा संशय निवृत्त्यर्थ श्रीपतिनारायण सांगतो. श्रीपतिरुवाच—

संकल्प्य ॥ तदंगस्थंडिलादि करिष्ये ॥ जुष्टोदमूनाआत्रेयोवसुश्रितोग्निस्त्रिष्टुप् अग्निप्रतिष्ठापने विनियोगः ॐ जुष्टोदमूनाअतिथिर्दुरोणइमंनोयज्ञमुपयाहिविद्वान् ॥ विश्वाअग्नेअभियुजोविहत्याशत्रूयतामाभराभोजनानि ॥ इत्यग्निं प्रतिष्ठाप्य ॥ एह्यग्नेराहूगणोगौतमोग्निस्त्रिष्टुप् ॥ अग्न्यावाहने विनियोगः ॐ एह्यग्नइहहोतानिषीदादब्धः सुपुरएताभवानः ॥ अवतांत्वारोदसीविश्वमिन्वेयजामहेसौमनसायदेवान् ॥ इत्यक्षतैरावाह्य आच्छादनं दूरीकृत्य ॥ समस्तव्याहृतीनां परमेष्ठी प्रजापतिः प्रजापतिर्बृहती गायत्री अग्निप्रतिष्ठापने विनियोगः ॥ ॐ भूर्भुवःस्वरों (श्रीवेदव्यासात्मककुंडे)विष्णुवीर्यात्मकपावकनामाग्निं प्रतिष्ठापयामि ॥ इति ॥( तदनंतरं कुंडे स्थंडिले वाऽग्निं प्रतिष्ठाप्य)॥ प्रोक्षितेंधनानि निक्षिप्य वेणुधमन्या प्रबोध्य ध्यायेत् ॥ चत्वारिश्रृंगागौतमोवामदेवोग्निस्त्रिष्टुप् ॥ अग्नि-

---

साधुसाधु महाभाग श्रृणुष्व कमलोद्भव ॥ त्वया पृष्टं प्रवक्ष्यामि श्रृणु च्चावहितोभव ॥ यथाग्नौ संस्कृताज्यं वा प्रागग्नावेव हूयते ॥ मदर्पितं प्रगृण्हामि यज्ञहोमद्विजादिषु ॥ असंगोहं महाभाग तस्मान्मे नास्ति कर्मणः ॥ बद्धत्वं पुरुषश्रेष्ठ मा शंका ह्यत्र पुत्रक ॥ ॥ निवेदितान्नशेषेण ये यजंति द्विजादिषु ॥ सर्वस्थं मां समुद्दिश्य ते स्मृताः कर्मकौशलाः ॥ अयोग्यं तु यथा होमे घृतं संस्कारवर्जितं ॥ ऋते समर्पणं प्राज्ञ यज्ञादौ विफलं भवेत् ॥ अहं यदि न गृण्हामि तेषां तु ग्रहणं कुतः ॥ भक्तानामदनार्थाय गृण्हामि कमलासन ॥ तस्मान्नैवेद्यशेषेण ददतां नास्ति पातकं ॥ पितृन्देवांस्तथा विप्रान्नुद्दिश्य पुरुषर्षभ ॥ मम नैवेद्य शेषेण नो यजंति मनीषिणः ॥ अधिष्ठानेषु देवेश ते यांति ह्यधरं तमः ॥ प्रतिमायामर्पितं मे नार्पयेत् प्रतिमांतरे ॥ अग्निविप्रादधिष्ठाने तर्पयेत्तु मदाज्ञया ॥ उभयत्रापि गृण्हामि नैकवारं पुनः पुनः ॥ इति ॥

मूर्तिर्ध्याने विनियोगः ॥ ॐ चत्वारिशृंगात्रयोअस्यपादा-
द्वेशीर्षेसप्तहस्तासोअस्य ॥ त्रिधाबद्धोवृषभोरोरवीतिमहोदे-
वोमर्त्याँआविवेश ॥ एषाहिदेवः प्रदिशोनुसर्वाःपूर्वोहिजा-
तःसउगर्भेअंतः॥ सविजायमानः सजनिष्यमाणः प्रत्य-
ङ्मुखस्तिष्ठतुविश्वतोमुखः ॥ अग्ने वैश्वानर शांडिल्यगोत्र
पावकनाम मेषध्वज मेषारूढ प्राङ्मुखो देव मम सन्मुखो
भव सुप्रसन्नो भव वरदो भव ॥ इति ध्यात्वा ॥ परिस-
मूहनपर्युक्षणे कृत्वा ॥गृहसिद्धान्नमादाय अनले आधिश्रित्य
उदग्उद्वास्य अभिघार्य सव्यहस्तं हृदि निधाय पर्यग्निक-
रणं कृत्वा प्रोक्ष्य समीपेग्नौ निधाय त्रेधा विभज्य दक्षिण-
भागस्थमन्नं देवयज्ञार्थं गृहीत्वा वैश्वदेवाहुतीर्जुहुयात् ॥
देवयज्ञो नाम वैश्वदेवः ॥ विश्वानिनइतितिसृणामात्रेयोव-
सुश्रुतोग्निस्त्रिष्टुप् ॥ अग्न्यर्चने विनियोगः ॥ ॐ विश्वा-
निनोदुर्गहाजातवेदः ॥१॥ ॐ सिंधुंननावादुरितातिपर्षि
॥२॥ ॐअग्नेअत्रिवन्नमसागृणानः॥३॥ॐअस्माकंबोध्य-
वितातनूनां ॥४॥ ॐ यस्त्वाहृदाकीरिणामन्यमानः॥५॥
ॐ अमर्त्यंमर्त्योजोहवीमि ॥६॥ ॐ जातवेदोयशोअ-
स्मासुधेहि ॥७॥ ॐप्रजाभिरग्नेअमृतत्वमश्यां ॥८॥ इति
अष्टऋग्भिः अष्टदिक्षु अक्षतैरर्चयेत् ॐ यस्मैत्वंसुकृतेजा-
तवेदउलोकमग्नेकृणवःस्योनं ॥ अश्विनंसपुत्रिणंवीरवंतं-
गोमंतंरयिंनशतेस्वस्ति ॥ इति अंजलिं बध्वा नमस्कृत्य॥
अथ अग्निस्थश्रीपरशुरामध्यानं ॐ अंगारवर्णमभितोऽड-
बाहिः प्रभाभिर्व्याप्तं परश्वधधनुर्धरमेकवीरं ॥ ध्यायेदजेश-

या भारद्वाज संहितोक्तीनें विष्णु व्यतिरिक्त देव, पितर, अग्नि, विप्र इत्यादिकांस श्रीविष्णु नैवेद्यानेंच तृप्त करावें, अन्यथा दोषी होतो.

## आतां श्रीपरशुराम ध्यान.

अग्निसमान वर्ण, निजप्रभांनीं चोहींकडे ब्रह्मांड व्याप्त करणारा, कुठार आणि धनुष्य धारण केल्लेला, स्तवन करणार, ब्रह्मादि सुरगणांनीं परिवृत, स्वात्म-स्वरूप दाखविणारा, श्रीपरशुराम अभ्यंतर्यामी ध्यान करावा सर्व दोष संहारक, अग्नींत असुन सर्व दाह करणारा, नित्यानंदयुक्त, अग्निसमान वर्ण, परशुधारी भार्गवराम जाणावा. ह्याप्रमाणें ध्यान करून आहुति द्याव्या; तो क्रम ॐ ॐ **नमो नारायणाय** या मंत्रानें ८, **पुरुषसूक्तानें** १६, ॐ ॐ **नमो भगवते वासुदेवाय** या मंत्रानें १२, ॐ ॐ **विष्णवे नमः** या मंत्रानें ६ ॥ एवं वर उल्लेखिलेप्रमाणें ह्या आहुति देऊन नंतर सूर्यादि आहुति द्याव्या. सिद्ध अन्नांतील एक अन्नानें वैश्वदेव केल्यास सर्व भक्ष्यभोज्यादिकही पवित्र होतें. भिन्न भिन्न पाक असेल तर भिन्न भिन्न वैश्वदेव करावा. ह्याविषयीं प्रमाण

" व्रीह्याद्यनेकद्रव्यस्य पाकश्चेदेककालतः ॥ तदा पाकैकद्रव्यस्य वैश्वदेवादिके कृते ॥ सर्वस्यापि कृतं तत्स्यात् न पृथग्वैश्वदेवकं ॥ अन्नस्यैकस्वामिकस्य वैश्वदेवे कृते सति ॥ अन्यस्यापि हि सर्वस्य कृतं स्यात् वैश्वदेवकं ॥ " ॥ इति ॥

## यापुढें वैश्वदेवाधिकारी कोण असें वर्णितात.

" अविभक्ता विभक्ता वा पृथक् पाकं द्विजातयः ॥ कुर्युः पृथक् पृथक् यज्ञं भोजनात् प्राक्दिने दिने ॥ विभक्तानां तु पाकैक्ये ज्येष्ठएव समाचरेत् ॥ पुत्रो भ्राता तथा शिष्य ऋत्विक् श्वशुरमातुळाः ॥ पत्नी वा श्रोत्रियो ज्ञातिर्वैश्वदेवादिकर्मिणः ॥ "

अर्थ—अविभक्त अथवा विभक्त असले तरी पृथक् पाक असल्यास प्रतिदिनीं भोजनापूर्वी प्रत्प्रत्येक वैश्वदेव करावा. विभक्त असून एक पाक असल्यास ज्येष्ठच वैश्वदेवास अधिकारी होय. पुत्र व बंधु, तथा शिष्य आणि ऋत्विज सासरा व मातुल किंवा पत्नी श्रोत्रिय अथवा स्वज्ञाति ब्राह्मण वैश्वदेवाधिकारी होतो.

" जुहुयात् सर्पिषाभ्यक्तं तैलक्षारविवर्जितं ॥ यत् किंचिज्जुहुयादग्नौ तत्सर्वं त्यागपूर्वकं ॥ स्मरन्नग्निगतं रामं तत्तद्देवं सनामकं ॥ द[illegible]कं पयसाभ्यक्तं तदभावेंवुनापि वा ॥ पयोदधिघृतैर्वापि वैश्वदेवं स्रुवेणतु हस्तेनान्नादिकं कुर्याज्जलैरंजलिनांजलीन ॥ "

पुरुहूतमुखैः स्तुवद्भिरावीतमात्मपदवीं प्रतिपादयंतं ॥ संहर्ता सर्वदोषाणामग्निस्थः सर्वदाहकः ॥ नित्यानंदोग्निवर्णश्च रामः परशुभृत्सदा ॥ इति ध्यात्वा ॥ आहुतिक्रमः॥अष्टाक्षरेण मंत्रेण पुरुषसूक्तेन षोडश॥ततो व्याहृतिभिर्हुत्वा वैश्वदेवो विधीयते ॥ अष्टावष्टाक्षरेणैव पुरुषसूक्तेन षोडश ॥ द्विषट्षडक्षरेणैव वैश्वदेवं समाचरेत्॥ अष्टाक्षरेण ८ ॥ पुरुषसूक्तेन १६ ॥ द्वादशाक्षरेण १२॥ विष्णुषडक्षरेण ६ इतिहुत्वा ॥ ॐ सूर्याय स्वाहा सूर्याय इदं न मम ॥१॥ ॐ प्रजापतये स्वाहा प्रजापतय इ०२ ॐ सोमाय वनस्पतये स्वाहा सोमायवनस्पतय इ०॥३॥ अग्नीषोमाभ्यां स्वाहा अग्नीषोमाभ्यामि०॥४॥ॐ इंद्राग्निभ्यां स्वाहा इंद्राग्निभ्यामि० ॥ ५ ॥ ॐ द्यावापृथिवीभ्यां स्वाहा द्यावापृथिवीभ्यामि० ॥६॥ ॐ धन्वंतरये स्वाहा धन्वंतरय इ० ॥७॥ ॐ इंद्राय स्वाहा इंद्राय इदं० ॥८॥ ॐ विश्वेभ्यो देवेभ्यः स्वाहा विश्वेभ्यो देवेभ्यइ० ॥९॥ ॐ ब्रह्मणे स्वाहा ब्रह्मणेइ० ॥१०॥ ॥ अग्नेरलंकरणं ॥ ॐ अग्नये स्वाहा अग्नये इ० ॥१॥ ॐ प्रजापतये स्वाहा प्रजापतये इ०॥२॥ॐ सोमाय वनस्पतये स्वाहा सोमाय वनस्पतय इ० ॥३॥ इति पूर्ववत् ब्रह्मांतं पृथक् वैश्वदेव करणे रात्रावपि दद्यात् सर्वप्रायश्चित्तार्थं व्याहृतिहोमं होष्ये ॥ इति संकल्प्य ॥ ॐभूः स्वाहा अग्नये अनिरुद्धाय इदं न मम ॥१॥ ॐभुवः स्वाहा वायवे प्रद्युम्नाय इ० ॥२॥ ॐस्वः स्वाहा सूर्याय संकर्षणाय इ० ॥३॥ ॐ भूर्भुवः स्वःस्वाहाप्रजापतये वासुदेवाय इदं न मम॥४॥इति परि-

समूह्य ॥ अग्नये नमः गंधं समर्पयामि अक्षतान्स० पुष्पं स० धूपं, दीपं, नैवेद्यं, तांबूलं, दक्षिणांस० नीराजनं स० ॥ कुर्मस्तआयुरजरंयदग्नेयथायुक्तो जातवेदोनरिष्याः ॥ अथावहसिसुमनस्यमानोभागंदेवेभ्योहविषः सुजातः ॥ ॐ अग्निस्तुविश्रवस्तमंतुविब्रह्माणमुत्तमं ॥ अतूर्तंश्रावयत्पतिंपुत्रंददातिदाशुषे इति मंत्रपुष्पांजलिं समर्प्य ॥ विज्योतिषेत्यस्यजान्वोवृषोग्निस्त्रिष्टुप् अग्निप्रार्थने विनियोगः ॥ ॐ विज्योतिषाबृहताभात्यग्निराविर्विश्वानिकृणुतेमहित्वा ॥ प्रादेवीर्मायाःसहतेदुरेवाःशिशीतेशृंगेरक्षसेविनिक्षे ॥ इति प्रार्थनां स० ॥ अग्ने त्वन्न इति चतसृणां गोपायनालोपायनावाबंधुसुबंधुश्रुतबंधुविप्रबंधुश्चैकैकर्चाअग्निर्द्विपदाविराट् अग्न्युपस्थाने विनियोगःॐ अग्नेत्वंनोअंतमऽउतत्राताशिवोभवावरूथ्यः ॥वसुरग्निर्वसुश्रवाऽअच्छानक्षिद्युमत्तमंरयिंदाः सनोबोधिश्रुधीहवमुरुष्याणोअघायतःसमस्मात् ॥ तंत्वाशोचिष्ठदीदिवःसुम्नायनूनमीमहेसाखिभ्यः॥ ॐ चमेस्वरश्चमेयज्ञोपचतेनमश्च ॥ यत्तेन्यूनंतस्मैतउपयत्तेतिरिक्तंतस्मैते नमः अग्नये नमः ॐ स्वाति श्रद्धां मेधां यशः प्रज्ञां विद्यां बुद्धिं श्रियं बलं ॥ आयुष्यं तेज आरोग्यं देहि मे हव्यवाहन ॥ नामगोत्राद्युच्चारपूर्वकं त्रिवारं अग्न्यभिवादनं कुर्यात् ॥ मानस्तोकेतिमंत्रैर्विभूतिधारणं कुर्यात् ॥ प्रदक्षिणनमस्कारान् कृत्वा ॥ प्रमादात्कुर्वतां कर्म प्रच्यवेताध्वरेषु यत् ॥ स्मरणादेव तद्विष्णोः संपूर्णं स्यादिति श्रुतिः ॥ यस्यस्मृत्या०॥ मंत्रहीनं०॥ कायेन

वाचेति ॥ अनेन मया यथाज्ञानेन कृतसायंप्रातःवैश्वदेवहोमेन भगवान् यज्ञपुरुषांतर्यामिश्रीपरशुरामः प्रीयतां मम प्रीतो भवतु श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ मंत्रतंत्रस्वरवर्णलोपदोषप्रायश्चित्तार्थं नामत्रयमंत्रजपं करिष्ये ॥ अच्युतानंतगोविंदेभ्यो नमः इति ॥ गच्छ गच्छ सुरश्रेष्ठ स्वस्थाने यज्ञपूरुष ॥ यत्र ब्रह्मादयो देवास्तत्र गच्छ हुताशनेति ॥ वैश्वदेवविषयः ॥ ॥ ॥

---

आचमनप्राणायामपूर्वकं देशकालौ स्मृत्वा श्रीमन्मध्वाचार्याणां हृत्कमलमध्येनिवस्यनंतकल्याणगुणपरिपूर्णश्रीवेदव्यासप्रीत्यर्थं मध्वगुरूपूजां करिष्ये ॥ इति संकल्प्य ॥ अथ ध्यायेत् ॥ स्वांतस्थानंतशय्याय पूर्णज्ञानरसार्णसे ॥ उत्तुंगवाक्तरंगाय मध्वदुग्धाब्धये नमः ॥ श्रीमदानंदतीर्थेंदुर्भासतान्नो हृदंबरे ॥ यद्वचच्छंद्रिकास्वांतसंतापं विनिकृंतति ॥ इति ध्यात्वा ॥ ॐ भूः श्रीमध्वगुरून् आवाहयामि ॐभुवः श्रीमध्वगुरून् आवाहयामि ॐभूर्भुवःस्वः श्रीमध्वगुरून् आवाहयामि ॥ इति आवाह्य ॥ श्रीमध्वगुरुभ्यो नमः आसनं समर्पयामि ॥ श्रीमध्वगुरु-

---

**अर्थ**-घृतमिश्र आहुती द्याव्या, तैल, क्षारमिश्र वर्ज होय. जें कांहीं हवन करणें असेल ते अग्निगत भार्गवराम स्मरणपूर्वक देवता नाम उच्चारून हें तुवांच दिलेलें तुझेंच आहे; माझें नव्हे असें स्मरून दधि अथवा दुग्ध तें नसल्यास उदकमिश्र हवि द्यावें केवल पय, दधि, घृतानेंही वैश्वदेव करणें झाल्यास स्रुवानें करावा. अन्नादिक कठीण पदार्थानें. आणि जलानें कोरेते केळीं हस्तानेंच करावा.

इति वैश्वदेव विषयः

भ्यो नमः पाद्यं समर्पयामि " अस्मिन्राष्ट्रेश्रियमावेशयाम्यतोदेवीःप्रतिपश्याम्यापः ॥ दक्षिणंपादमवनेनिजेऽस्मिन्राष्ट्रइंद्रियंदधामि ॥ सव्यंपादमवनेनिजेऽस्मिन्राष्ट्रइंद्रियंवर्धयामि ॥ पूर्वमन्यमपरमन्यंपादाववनेनिजे ॥ देवाराष्ट्रस्यगुप्त्याअभयस्यावरुध्यै ॥ आपःपादावनेजनीर्द्विषंतं निर्दहंतुमे ॥ चरणं पवित्रं विततं पुराणं येन पूतस्तरति दुष्कृतानि ॥ तेन पवित्रेण शुद्धेन पाप्मानमरातिं तरेम॥ इति ऋग्भिः पाद्यं समर्प्य श्रीमध्वगुरुभ्यो नमः अर्घ्यं सम०॥ श्रीमध्वगुरुभ्यो नमः आचमनीयं स० ॥ श्रीमध्वगुरुभ्यो नमः स्नानं स०॥ श्रीमध्वगुरुभ्यो नमः वस्त्रं० ॥ श्रीमध्वगुरुभ्यो नमः गंधं स०॥ श्रीमध्वगुरुभ्यो नमः पुष्पं स०॥ श्रीमध्वगुरुभ्यो नमः धूपं स० ॥ श्रीमध्वगुरुभ्यो नमः दीपं स०॥ श्रीमध्वगुरुभ्यो नमः नैवेद्यं स० श्रीमध्वगुरुभ्यो नमः मंत्रपुष्पांजलिं समर्पयामि ॥ दीर्घतमामामतेयोजुजुर्वांदशमेयुगे । अपामर्थंयतीनांब्रह्माभवतिसारथिः ॥ इति मंत्रं पठेत् ॥ श्रीमध्वगुरुभ्यो नमः प्रदक्षिणां स० ॥ श्रीमध्वगुरुभ्यो नमः नमस्कारान्स० ॥ श्रीमध्वगुरुभ्यो नमः प्रार्थनां सम० " प्रथमो हनुमान्नाम द्वितीयो भीम एवच ॥ पूर्णप्रज्ञस्तृतीयस्तु भगवत्कार्यसाधकः ॥ ब्रह्मांताः गुरवः साक्षादिष्टं दैवं श्रियः पतिः॥ आचार्याः श्रीमदाचार्याः संतु मे जन्मजन्मनि ॥ येनाहमिहदुर्मार्गादुत्धृत्याभिनिवेशितः ॥ सम्यक्श्रीवैष्णवे मार्गे पूर्णप्रज्ञं नमाम्यहं ॥ पूर्णप्रज्ञो ज्ञानदाता मध्वो ध्वस्तदुरा-

नमः ॥ तत्वज्ञो वैष्णवाचार्यो व्यासशिष्यो यतीश्वरः ॥ सुखतीर्थाभिधानश्च जितामित्रो जितेंद्रियः॥आनंदतीर्थ-सन्नाम्नामेवं द्वादशकं पठेत् ॥ लभते वैष्णवीं भक्तिं गुरुभक्तिसमुद्भवां ॥नमस्तस्मै नमस्तस्मै नमस्तस्मैच वायवे॥ श्रीमदानंदतीर्थाख्याप्रख्याताय नमोनमः ॥ इति संप्रार्थ्य ॥ अनेन मया कृतेन श्रीमध्वगुरुपूजनेन भगवान् श्रीगुर्वंतर्गतश्रीवेदव्यासः प्रीयतां प्रीतो भवतु तत्सत्कृष्णार्पणमस्तु उक्तपूजातु श्रीविष्णुगंधतीर्थनिर्माल्यादिनैव कुर्यात् ॥ इति मध्वगुरुपूजा समाप्ता ॥ ॥

॥ अथ ब्रह्मार्पणं ॥

ब्रह्मार्पणं करिष्येति संकल्प्य ॥ ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणाहुतं ॥ ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्म समाधिना ॥ एको विष्णुर्महद्भूतं पृथग्भूतान्यनेकशः ॥ त्रीन्लोकान्व्याप्य विश्वात्मा भुंक्ते विश्वभुगव्ययः ॥ इति पठित्वा देशकालादिसंकीर्त्य अनेन ब्राह्मणसुवासिनीसमाराधनेन भगवान् श्रीलक्ष्मीनारायणः प्रीयतां प्रीतो भवतु तत्सत् श्रीकृष्णार्पणमस्तु इति ब्रह्मार्पणं कृत्वा ॥ ॥ ॥ गोग्रासदानं कुर्यात् ॥ सुरभी वैष्णवी माता नित्यं विष्णुपदे स्थिता ॥ गोग्रासं तु मया दत्तं सुरभि प्रतिगृह्यतां ॥ सौरभ्यः सहिता सर्वाः पवित्राः पापनाशनाः। प्रतिगृण्हंत्विमं ग्रासं गावस्त्रैलोक्यमातरः इति पठित्वा अनेन गोग्रासदानेन भगवान् गवांतर्गतश्रीगोपालकृष्णः प्रीयतां प्रीतो भवतु तत्सच्छ्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥

अथ भूतबलिविधिः ॥ वर्तुलमंडलोपरि भूतयज्ञेन यक्ष्ये इति संकल्प्य ॥ अवशिष्टतृतीयभागान्नेन बलिं दद्यात् ॥ तद्यथा ॥ स्वचांडालपतितभूतवायस्येभ्यः " ये भूताः प्रचरंतिदिवानक्तंबलिमिच्छंतोवितुंदस्यप्रेष्याः ॥ तेभ्योबलिपुष्टिकामोहरामिमयिपुष्टिंपुष्टिपतिर्ददातु स्वाहा ॥ दिवाचारिभ्योनक्तंचारिभ्यइदंनमम ॥ " इति मंत्रेण भूमौ अन्नं निक्षिपेत् ॥ अथ प्रार्थना ॥ श्वानौ हि शामशबलौ वैवस्वतकुलोद्भवौ ॥ ताभ्यां बलिं प्रदास्यामि रक्षेतां पथि सर्वदा॥यमोसि यमदूतोसि वायसोसि महाबल (नमोस्तुते) सप्तजन्मकृतं पापं सर्वं भक्षंति वायसाः ॥ गोदोहनमात्रं तत्र स्थित्वा अतिथिप्रतीक्षां कुर्यात् ॥ प्रक्षाल्य पाणिपादावाचम्यपश्चाज्जपेत् ॥ ऐंद्रवारुणवायव्या याम्यनैऋतिकाश्च ये ॥ वायसाः प्रतिगृण्हंतु भूमौ पिंडं मयार्पितं ॥ ॐ शांतापृथिवीशिवमंतरिक्षंद्यौर्नोदेव्यभयन्नोअस्तु ॥ शिवादिशःप्रदिशउद्दिशोनआपोविश्वतःपारपांतुसर्वतः ।शांतिः शांतिः शांतिः सर्वारिष्टनिरस ( सर्व ) नमस्तु ॥ इति भूतबलिविधिः ॥ न ग्रहा न च कूष्मांडा पिशाचोरगराक्षसाः दृष्ट्वा शंखोदकं मूर्ध्नि विद्रवंति दिशो दश ॥ शंखमध्ये स्थितं तोयं भ्रामितं केशवोपरि ॥ अंगलग्ना मनुष्याणां ब्रह्महत्यां व्यपोहति ॥ ॥ ॥

शालग्रामोद्भवं तीर्थं तीर्थं च द्वारकोद्भवं ॥ तुलसीशंखतोयं च पौरुषं सूक्तमेव च ॥ एतानि पंचतीर्थानि पंचपातकनाशनं ॥ तिकारो दैत्यहानार्थं थकारो मोक्षसाधनं

॥ अक्षरद्वयसंयुक्तं नाम्ना तीर्थमिहोच्यते ॥ आजन्मकृत पापानां प्रायश्चित्तं यदीच्छसि ॥ शालग्रामशिलावारि पापहारि निषेव्यतां ॥ विष्णुपादोदकं पुण्यं पीत्वा यस्तु स्वमस्तके॥प्रक्षेपणं प्रकुर्वीत ब्रह्महत्यां व्यपोहति ॥ यस्तुविष्णुपदस्तीर्थं न पिबेत्पापकर्मतः ॥ केवलं शिरसा गृण्हन्सगच्छेन्नरकं ध्रुवं ॥ यः पुमान्मंदबुद्धित्वात्पीत्वा विष्णुपदोदकं ॥ न करोति यदा मूर्ध्नि तमाहुर्ब्रह्मघातकं ॥ पादोदकं भगवतो लब्ध्वा भागवतस्य च॥ तिष्ठन्नेवाथ वासीनः पिबेच्छुद्धिपरो जनः ॥ वस्त्रयुग्मेन हस्तेन गृहीत्वा तीर्थमब्जज ॥ चुलकं तुलसीमिश्रं पिबेत्पादोदकं मम ॥ वस्त्रं च त्रिगुणीकृत्य पाणौ पाणिं च विन्यसेत् ॥ तत्र तीर्थं प्रतिष्ठाप्य त्रिःपिबेच्छब्दवर्जितं ॥ आद्यं कायविशुद्ध्यर्थं द्वितीयं धर्मसाधनं ॥ तृतीयं मोक्षदं प्रोक्तं एवं तीर्थं त्रिधा पिबेत् ॥ अकालमृत्युमथनं सर्वव्याधिविनाशनं ॥ सर्वपापोपशमनं विष्णुपादोदकं शुभं ॥ विष्णुपादोदकं पीत्वा पश्चादशुचिशंकया ॥ यः क्षालयेत्करौ मोहात्तमाहुर्ब्रह्मघातकं ॥ शालग्रामजलं पीत्वा कोटियज्ञ फलं लभेत् ॥ तस्मादष्टगुणं पापं भूमौ बिंदुनिपातनात् ॥ तुलसीमिश्रितं तोयं एकादश्यां कदाचन ॥ न ग्राह्यं विष्णुभक्तैस्तु व्रतं नश्येच्च पार्वति ॥ अवैष्णवस्य हस्ताच्चुदिव्यदेशाद्युपागतं ॥ हरेः प्रसादं तीर्थांबु यत्नतः परिवर्जयेत् ॥ यथा पादोदकं पुण्यं निर्माल्यं चानुलेपनं॥ नैवेद्यं धूपशेषं च पुण्यारार्तिस्तथाहरेः ॥ विष्णोरंगारशे-

ण योंगानि परिमार्जयेत् ॥ दुरितानि विनश्यंति व्या-
त्यो यांति खंडशः ॥ ॥ ॥ ॥

ाचम्य प्राणानायम्य देशकालौ संकीर्त्य श्रीविष्णुप्रे०
विष्णुप्री० प्राणाग्निहोत्रं करिष्ये ॥ इति संकल्प्य ॥
भूर्भुवःस्वः ॐ तत्सवितुर्वरेण्यं० सत्यंत्वर्तेनपरिषिंचामि
ष्णो अन्नं रक्षस्व इति प्रातः ॥ ऋतंत्वा सत्येनेति सायं
इति विशेषः ॥ ततः ॐ भूपतये नमः ॐ भुवनप-
ये नमः । ॐ भूतानां पतये नमः । ॐ भूतये नमः।
ति प्रातः ॥ ॐ चित्रायनमः ॐ चित्रगुप्तायनमः ।
ॐ यमायनमः ॐ यमधर्मायनमः ॥ इति सायं ॥ इति
तुर्धा बलिं दत्त्वा॥अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमा-
श्रितः॥ प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधं ॥ उत्तिष्ठ
ोहितपिंगलाक्ष अग्निवर्ण अजपुरुषः सत्योदेवता गाय-
त्रीच्छंदः अमृतोपस्तरणमसि स्वाहा॥इति तीर्थं प्राश्य॥
चप्राणाहुतीर्गृण्हीयात् ॥ ॐ प्राणाय स्वाहा ॐ अपा-
नाय स्वाहा । ॐ व्यानाय स्वाहा । ॐ उदानाय स्वाहा
ॐ समानाय स्वाहा इति प्राणाहुतीर्गृहीत्वा ॥ भोज-
च्चरं ॥ अमृतापिधानमसि स्वाहेतिकिंचिदपः प्राश्य ॥
गंडूषादिशुद्धोदकेन मुखं संमृज्य हस्तौ पादौ
ाचम्य ।तीर्थं प्राश्य मुखविशुध्यर्थं तुलसीदलत्रयं.
॥ इति चित्राहुतिक्रमः ॥ ॥

तात्पर्य--प्रातःस्नान झाल्यानंतर पूर्व दिवशीं ठेविलेलें निर्माल्यपूजेचें तीनदां घ्यावें आणि मध्यान्ह पूजेनंतर व सायं पूजेनंतरही तीन तीन तसेंच भोजनोत्तर एकेक वेळीं तीर्थबिंदू भूमीवर न पडेल अशा व्यवस्थेनें घ तीर्थ घेतल्यानंतर मस्तकावर धारण करावें. तीर्थ घेते वेळीं पिण्याचा शब्द हो कामा नये. आणि मस्तकावर व कर्णांत तसेंच नाभिस्थानीं विष्णुनिर्मा धारण करावें; व श्रीविष्ण्वर्पित अंगारा, अक्षत, गंध, प्रसाद इ० प्रत स्वीकारावा. एकादशीदिनीं गंधोदक तुलसी इत्यादिरहित केवळ तीर्थ ए स्वीकारावें. वैष्णव व्यतिरिक्त लोकांकडून तीर्थ, प्रसाद वगैरे केव्हांही स्वीकार नये; विष्ण्वर्पित अन्नादि श्रीलक्ष्मी, मुख्यप्राण व श्रेष्ठ गुरु यांस अर्पण केल्यानं स्वीकारावें शिवाय इतर देवांस अर्पित असा श्रीविष्णुप्रसादही घेऊं नये. विष् अर्पण केल्यावांचून कोणत्याही देवतेस अन्नादि अर्पण करूं नये. याप्रमा वैष्णवधर्मशास्त्राचे नियम आहेत.

